# मावळची मुशाफिरी

गोविंद गारे



REFBK-0026138

संदर्भ ग्रंथ
८९७
२६९३८
२५५१८०

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

सूचना .—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

२०/११/९९
1/1/2000
५/२/2000
23/2/2000
7/3/2000

( क्र. मा. पहा )
१००००–११–८९

# मावळची मुशाफिरी

डॉ गोविंद गारे

REFBK-0026138

इंद्रायणी साहित्य
पुणे

प्रकाशक / मुद्रक ·
श्याम दयार्णव कोपर्डेकर
इंद्रायणी साहित्य
२७३, शनवार पेठ, पुणे-३०

प्रथमावृत्ती ११ जाने ९०

© डॉ गोविंद गारे

मुखपृष्ठ ल म कडू

मूल्य २० रु.

मुद्रणस्थळ
स्मिता प्रिंटर्स
(प्रमोद वि बापट)
१०१९, सदाशिव पेठ, पुणे-३०

टाइपसेटिंग
प्रमोद प्रिंटर्स
(प्रमोद वि बापट)
विद्याधर अपार्टमेंट्स,
११२०, सदाशिव पेठ
पुणे ३०

ज्यांनी माझ्या लेखनाला प्रोत्साहन दिले,

व

लेखक म्हणून मला उभे केले,

त्या प्रिय

**श्री. अनंतराव पाटील**

(माजी संचालक दै. विशाल सह्याद्री व माजी खासदार)

यांना सप्रेम सविनय अर्पण

# अनुक्रमणिका

लेखकाचे मनोगत / ५
१ सह्याद्रीच्या कुशीतील मावळी प्रदेश / ९
२ मावळ मुळशीचा परिसर / १२
३ भोर-भाटघर आणि तोरणा-राजगडचा परिसर / १७
४ सातारा–कोल्हापूर जिल्ह्यातील दुर्गांचा मावळी प्रदेश / २२
५ शिवनेर-जुन्नर प्रांताखालील मावळे / २६
६ इतिहासप्रसिद्ध नाणेघाट-कुकडेश्वर परिसर / ३४
७. क्षेत्र भीमाशंकर वनवैभवी प्रदेश / ३८
८ हरिश्चंद्रगडचा रमणीय पहाडी प्रदेश / ४२
९ नयनरम्य भंडारदरा, रतनगड आणि शैल कळसूबाई ते त्र्यंबकगड / ४६
१० साल्हेर-मुल्हेरचा ऐतिहासिक परिसर / ५२
११ ज्ञानेश्वर-तुकारामाची भक्तिभूमी / ५६
१२ सह्याद्रीच्या शाहीरी खुणा / ६१
१३. शिवनेरीची शाहीरी परंपरा / ६७
१४ सह्याद्रीतील घाटमाथ्यावरील आदिवासी समाज / ७४
१५. वनश्रीने नटलेला सह्य पर्वत / ८३
१६ सह्याद्रीच्या डोंगर-दऱ्याखोऱ्यामधील पशु-पक्षी / ८८

# लेखकाचे मनोगत

सन १९६४ चा काळ होता तो गावागावात ग्रामगौरव होत होते सर्व गाव साक्षर झाले की, ग्रामगौरव करण्याचा उपक्रम त्या वेळी महाराष्ट्रात चालू झालेला होता माझे गाव जुन्नर तालुक्यातील आदिवासी भागात डोंगर-दऱ्याखोऱ्यात नाणेघाटाच्या जवळ आहे १९६१ साली अलिटालिया विमानाला माझ्या गावाजवळच दौंड्या डोंगरावर अपघात झाला व विमानातील सर्वच्या सर्व ९४ लोक मरण पावले त्यामुळे अनेक लोकाना दौड्या डोगर व निमगिरी गाव माहीत झाले त्या काळी माझ्या गावची रहदारी पावसाळ्यात तालुक्याच्या गावापासून तुटत असे नदीला पूल नसल्यामुळे व नदी- नाले दुथडी भरून वाहू लागल्यावर पावसाळ्यातील तीन-चार महिने वाहतूक बद होत असे आजही वाहतुकीच्या स्थितीत फार मोठा बदल झालेला नाही आता नदीला पूल बाधण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही या भागात आता कुकडी नदीवर माणिकडोह गावाजवळ धरण झालेले आहे व धरणाच्या कडेकडेने रस्ते काढलेले आहेत

माझा गाव साक्षर झाल्यामुळे जिल्हा परिषदेमार्फत १९६४ साली गावचा 'ग्रामगौरव' होता पुण्यातून निघणाऱ्या दैनिक विशाल सह्याद्रीचे त्या वेळचे सपादक श्री अनतराव पाटील, त्या वेळचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री शकरराव उरसळ व उपाध्यक्ष श्री शिवाजीराव काळे वगैरे, जिल्ह्यातील अनेक मान्यवर मडळी या कार्यक्रमासाठी जमली होती मी त्या वेळी बी ए. पास होऊन एम ए. च्या दुसऱ्या वर्षाला शिकत होतो डोंगर-दऱ्याखोऱ्यातील माझा गाव पाहून अनेकाना प्रथम धक्का बसला आदिवासी गाव असून ते पूर्ण साक्षर झाले हे एक आश्चर्यच होते गावात ७ वी पर्यत शाळा होती. गावाला नळाने पाणीपुरवठा केलला होता या भागातील माझे गाव शिक्षणाचे केंद्र ठरले होते त्याच गावाचा बी ए. पर्यंत शिकलेला मी एकच उमेदवार होतो. "आमच्या गावातील हा मुलगा बी ए. पर्यंत शिकून आता एम ए. चा अभ्यास करतोय व त्याला आणखी पुढे शिकण्याची जिद्द आहे," असे कोणीतरी पाहुण्याना सागितले, हे ऐकून जमलेल्या मडळींना आश्चर्य वाटले

'ग्रामगौरव' म्हणजे खरा साक्षरतेचा गौरव लोक आता शिकू लागले होते आणि बोलूही लागले होते. त्याचा हा गौरव होता या ग्रामगौरव कार्यक्रमाच्या निमित्ताने

माझी श्री. अनतराव पाटील याच्याशी ओळख झाली. पुढे त्यांच्या या ओळखीचा मला खूप उपयोग झाला. किंबहुना माझ्या आयुष्याला एक नवे वळण देण्यात त्यांनी मला मोलाची मदत केली मी शिकलेला आहे हे ऐकून त्यांनी मला जवळ बोलवून घेतले व "पुण्याला आल्यानतर मला भेटा" असे सागितले. पुण्यास परत आल्यानतर मी त्यांना दैनिक विशाल सह्याद्रीच्या कार्यालयात भेटलो प्रथम त्यांनी माझी आदराने चौकशी केली व मला सागितले की, "तुमच्या गावातील, तुमच्या भागातील आदिवासी समाजाबद्दल काही तरी लिहा दैनिक विशाल सह्याद्रीतून ते मी प्रसिद्ध करीन " अनतरावाची ही सूचना ऐकून मला आनद झाला. आपण लिहिलेले वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार यावर माझा विश्वासच बसत नव्हता. त्या काळी मला लिखाणाचा आत्मविश्वास नव्हता काय लिहावे, कसे लिहावे हे फारसे कळत नव्हते परतु अनतरावांच्या सूचनेवरून मी २-३ लेख लिहिण्याचा प्रथम प्रयत्न केला. हे लेख सह्याद्रीतील मावळी प्रदेशावर लिहिले. अनतरावांना ते लिहून दाखविले अनतरावानी लेख काळजीपूर्वक वाचले व लेख चागले आहेत असे ते म्हणाले मला प्रथम ते खरेच वाटत नव्हते. कारण माझ्या लिखाणात व्याकरणदृष्ट्या व ऱ्हस्व-दीर्घ दृष्ट्या खूपच चुका असत. शुद्ध मराठी बोलण्याचे व लिहिण्याचे वळण मला कुठे असणार. परतु अनतरावांनी माझ्या ह्या उणिवावर बोट ठेवले नाही व त्या क्षणाला मला नाउमेदही केले नाही. त्या क्षणाला मला त्यांनी नाउमेद [illegible] कदाचित मी आज उभा आहे तसा झालो नसतो. माझ्यावर अनतरावांचे हे थोर उपकारच आहेत. 'तरुणांना लिखाणासाठी कसे तयार करावे, त्यांच्याकडून लिहून कसे घ्यावे, त्यांच्या नेमक्या चुका कोठे होतात,' यांची अनंतरावांना चागलीच कल्पना होती. त्यामुळे मला ते सावरू शकले व उभे करू शकले. माझे २-३ लेख स्वीकारल्यानतर अनतरावानी दैनिक विशाल सह्याद्रीतून 'मावळची मुशाफिरी' या माझ्या लेखमालेला मोठी प्रसिद्धी दिली. त्यामुळे सर्वसामान्य वाचकांचे लक्ष माझ्या लेखमालेकडे वेधले गेले पहिला लेख प्रसिद्ध झाला तो दिवस गुरुवार ६ फेब्रुवारी १९६४ होता. त्या लेखाच्या सुरुवातीला सपादकांनी माझा फोटोही छापलेला होता या लेखमालेमुळे मला बरीच प्रसिद्धी मिळाली. त्या प्रसिद्धीतूनच मला पुढील लिखाणाची चालना व स्फूर्ती मिळाली. त्यामुळे वाचन वाढले व लेखमालेतील पुढील लेख लिहिण्यासाठी मी सह्याद्रीतील मावळी प्रदेशात ठिकठिकाणी पदयात्रा सुरू केल्या. निरनिराळ्या ठिकाणांची, प्रदेशांची, स्थळांची व लोकांची त्या

निमित्ताने माहिती मिळविली व याच सकलित माहितीच्या आधारावर ही लेखमाला लिहिली. 'मावळची मुशाफिरी' या लेखमालेत मी एकूण १४ लेख लिहिले. या लेखमालेतील हे सर्व लेख त्या काळी खूप गाजले आणि अनेक लोकांनी पत्र लिहून माझे अभिनदन केले.

अनतरावाच्या या सहकार्यामुळे माझ्यातील लेखक जागा झाला आणि त्यानतर पुढे सतत काही ना काही तरी लिहीत राहावे याची एक नवी दिशा मला या लिखाणातूनच प्राप्त झाली मी एम ए. झाल्यानतर बेकार बसण्यापेक्षा काही तरी काम करावे या अपेक्षेने अनतरावाना भेटलो अनतरावाच्या लक्षात माझी अडचण आणून दिली त्यानी मला दै. विशाल सह्याद्रीच्या कार्यालयात कामावर घेतले "मी देईन त्या पगारावर काम कर" अशी त्याची सूचना मला आजही आठवते त्या काळात 'पगार इतका मिळावा' अशी माझी कोणतीही अपेक्षा नव्हती वर्षभर मी दैनिक विशाल सह्याद्रीत काम केले माझा एम ए. चा निकाल लागला त्या वेळी मी दै. विशाल सह्याद्रीत काम करत होतो मी अनतरावाना हे सांगण्यासाठी गेलो तेव्हा त्याना खूप आनद झाला त्यानी सर्वांना पेढे वाटले. त्या वेळी त्यानी लगेचच दैनिक विशाल सह्याद्रीत "गोविंदा एम ए झाला", या नावाने खास लेख लिहिला त्या लेखात त्यानी माझे खूप कौतुक केलेले होते

पुढे मी पीएच. डी. साठी गोखले अर्थशास्त्र सशोधन सस्थेत दाखल झालो सस्थेच्या वतीने पुढील शिक्षणासाठी ब्रिटिश कौन्सिलची फेलोशिप घेऊन मी इग्लडला वर्षभर शिकून आलो गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र सस्थेत ११ वर्षे नोकरी केली व त्यानतर सचालक म्हणून आदिवासी सशोधन व प्रशिक्षण सस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या शासकीय सस्थेचा कार्यभार साभाळला शासनाने माझे या क्षेत्रातील काम लक्षात घेऊन मला 'भारतीय प्रशासन सेवेत (आय ए. एस)' समाविष्ट केले. माझी भारतीय प्रशासन सेवेत (आय एस. एस ) निवड झाल्याची बातमी अनतरावानी वृत्तपत्रात वाचली व एक दिवस अचानक ते माझ्या कार्यालयात माझे अभिनदन करण्यासाठी आले मी आय ए एस झालो हे ऐकून त्याना खूप आनद झाला होता त्यांनी मन भरून माझे अभिनदन केले अनतरावाच्या एवढ्या जिव्हाळ्याचा अर्थ मी आजही उमगलो नाही काही माणसे मनाने किती थोर आणि मोठी असतात त्याचा प्रत्यय मला त्याच्या ठिकाणी आला त्यानी मदतीचा हात दिलेल्या माणसाच्या आयुष्याचे काही तरी चीज झाल्यानतर त्यांना केवढे समाधान

प्राप्त झालेले होते ते या प्रसगाचे वेळी मला जाणवले

'मावळची मुशाफिरी' या नावाने १९६४ मध्ये दैनिक विशाल सह्याद्रीतून प्रसिद्ध झालेली माझी ही लेखमाला आज पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहे २५ वर्षांपूर्वी लिहिलेले लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध करताना त्यामध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या, फेरफार करून या सर्व लेखाचे एक छोटेसे पुस्तक मी वाचकांच्या पुढे सादर करीत आहे. मला कल्पना आहे की, या लेखामध्ये अद्यापही खूप उणिवा आहेत. पण शेवटी कुठे ना कुठे तरी मर्यादा घालावी लागते. तशी मर्यादा मी घालून घेतली आणि त्यामुळे माझे सर्व लेख सकलित स्वरूपात 'मावळची मुशाफिरी' या नावाने, पुस्तकरूपाने वाचकाच्या पुढे येत आहेत. माझे मित्र श्री. श्याम कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, पुणे ह्यांच्यापुढे या पुस्तकाच्या प्रसिद्धीची कल्पना मी मांडली त्याना ती आवडली व त्यांनी माझे पुस्तक प्रसिद्ध करण्याची तयारी दर्शविली व शब्द दिल्याप्रमाणे पुस्तक प्रसिद्ध केले, याबद्दल त्याचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत पुस्तकात काही उणिवा राहिल्या असल्यास वाचक माझी ही अपूर्णतः साभाळून घेतील, अशी अपेक्षा करतो. धन्यवाद!

पुणे
दि. ३०-५-८९

डॉ. गोविंद गारे

*

# १. सह्याद्रीच्या कुशीतील मावळी प्रदेश

शाखा

'सह्याद्री पर्वत' हे महाराष्ट्राचे भूषण आहे तो महाराष्ट्राचा मानबिंदू आहे सह्याद्रीने आम्हाला कोकण दिले, देश दिला, घाट-माथे दिले, मावळे दिले, कृष्णा, भीमा, गगा (गोदावरी) ह्या नद्या दिल्या. सिंहगड, शिवनेरी, राजगड, रायगड, प्रतापगड ही शिवतीर्थे निर्माण केली. सुदर सुदर कोरीव लेण्यानी महाराष्ट्राला गुफून काढले अजन, काचन, करवदीचा काटेरी मुकुट दिला घाट चढणारे, कडे तोडणारे शूर आणि कणखर मावळे आपल्या कुशीत निर्माण केले राष्ट्रधर्म शिकविणारे व ज्ञानाचा कलश वाहणारे महान सत महाराष्ट्राला दिले शाहीर दिले थोर कलाकार दिले. सह्याद्रीने महाराष्ट्र मायभूमीसाठीच नव्हे, तर हिंदवी स्वराज्यासाठी लढणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजाना अगारखाद्यावर खेळविले व उभा महाराष्ट्र जागा केला आणि जयशभो । हरहर महादेव । ह्या गर्जनानी उभा महाराष्ट्र जागा केला

शकर हा सह्याद्रीचा स्वामी आणि विशेषत घाटमाथ्याचा त्याचा पुत्र खडोबा पठाराचा स्वामी मावळामध्ये राहणारे सर्व लोक शकर, महादेव, खडोबा याना पूज्य मानतात. भक्तिभावाने त्याची सेवा करतात म्हणूनच खडोबाची जागृत देवस्थाने आणि बारा ज्योतिर्लिगापैकी भीमाशकर व त्र्यबकेश्वर ही सुप्रसिद्ध ज्योतिर्लिगे सह्याद्रीच्या कडेकपारी विराजमान झाली आहेत सह्याद्रीच्या कुशीत कोठेही जा-दऱ्याखोऱ्यामध्ये, कडेकपारी, गगातीरी- शकराचे स्थान आढळल्याशिवाय राहणार नाही सह्याद्री पर्वताच्या कोणत्याही पर्वत पठारी शाखेत गेलात, तरी शकराचे स्थान व महत्त्व कमी झालेले नाही सातमाळ व बालाघाट श्रेणीच्या दरम्यानचे खोरे गोदावरीचे. त्र्यबकेश्वर त्याचा स्वामी. बालाघाट व महादेव पर्वत ह्या श्रेणीच्या दरम्यानचे खोरे भीमानदीचे भीमाशकर त्याचा स्वामी आणि महादेवाच्या डोंगराच्या दक्षिणेकडील खोरे कृष्णेचे महाबळेश्वर त्याचा स्वामी गोदावरीची वृत्ती सात्विक, कृष्णेची वृत्ती तामस तर भीमा या दोन्हींचा समन्वय साधते. गगथडी (गोदाकाठ) ही प्रभूरामचंद्राची, भीमथडी पढरीनाथाची तर कृष्णाथडी तुळजापूरच्या भवानीमातेची.

गगथडीचा ज्ञानेश्वर, कृष्णाथडीचा नामदेव तर भीमथडीने याचा समन्वय तुकारामामध्ये केला गगथडीचे नासिक धर्मक्षेत्र, कृष्णाथडीचे सातारा वीरक्षेत्र तर भीमथडीचे पुणे हे कर्मक्षेत्र.

महाराष्ट्रातील मावळांची व देशावरील प्रदेशाची विभागणी अशी झाली असली तरी सह्याद्रीचा सलग असा घाटमाथा हरिश्चद्र गडापासून दक्षिणेस सुरू होतो घाटमाथ्याची पश्चिम सीमा नाणेघाट, भीमाशकर, राजगड, प्रतापगड, विशालगड यावरून भूधरगडापर्यंत गेली आहे पूर्वसीमा जुन्नर, पुणे, सातारा, कोल्हापूर या महाराष्ट्रातील प्रसिद्ध राजधान्यावरून गेली आहे सिंहगड, शिवनेरी, राजगड, प्रतापगड ही शिवतीर्थे याच भागात विराजमान झालेली आहेत

'घाटमाथा' ही सज्ञा कोकणच्या सहकायनिच वापरण्यात येते कोकण व देश याच्या दरम्यान असलेल्या अनेक घाटाच्या वाटेवरून या भागाला घाटमाथा हे नाव देण्यात आले आहे. देशाला व कोकणाला एकत्र करण्याच्या कामी सह्याद्रीतील घाटानी व पायवाटानी प्राचीन काळापासून आजपर्यंत फार मोठी कामगिरी बजावली आहे यातील काही घाट अतिशय बिकट आहेत तळकोकणातील व घाटमाथ्यावरील लोकाशिवाय या घाटाचा वापर करण्यास दुसरे लोक फारसे धाडस करत नाहीत हे घाट वाहतुकीच्या दृष्टीने सुधारले तर देश आणि कोकण यांमध्ये अनेक मार्गाने रहदारी वाढेल.

महाराष्ट्रातील मावळ भाग म्हटला की थेट नासिक जिल्ह्यातील त्रिबकेश्वरपासून सातारा-कोल्हापूरपर्यंतचा सह्याद्रीचा पूर्वेकडील डोंगराळ भाग डोळ्यासमोर येतो सह्याद्रीमुळे देश आणि कोकण असे दोन भाग झाले. सह्याद्रीतील दऱ्याखोऱ्यामुळे देशावर घाटमाथे, मावळे आणि नेरे अशी नैसर्गिक विभागणी पडली कळसूबाईच्या दक्षिणेकडील हरिश्चद्रगडापासून फोंडा घाटापर्यंत पठाराचा प्रदेश तो घाटमाथा त्याची लाबी २०० मैल व रुंदी २० मैल घाटमाथ्यालगत पूर्वेकडील उतारावरील काही नद्याच्या खोऱ्याना मावळ, नेरे अशी सज्ञा आहे. मावळत्या दिशे (पश्चिमे) कडील पर्वतमय दरीखोरी, नद्याचा प्रदेश तो मावळभाग मलय या सस्कृत शब्दापासून मावळ शब्द बनला. "मलय-मयल, मल्ले, माळव (वर) मावळ"

मावळाच्या नैसर्गिक परिस्थितीचा विचार करून महमद गवानने कारभाराच्या दृष्टीने व लवकर महसूल गोळा करण्याच्या दृष्टीने हा प्रदेश ५२ भागात

विभागला त्याला ५२ मावळाचा प्रदेश असे म्हणतात या प्रत्येक भागाचा कारभार पाहण्यासाठी महमद गवानने एक एक सरनाईक ठेवून त्याला सैन्य बाळगण्यासबधी व कारभाराबाबत सर्व अधिकार दिलेले होते. जुन्नर हे मध्यवर्ती ठिकाण पाहून ५२ मावळाची राजधानी जुन्नर येथे ठेवण्यात आली होती जुन्नर येथील ५२ चावडीमधून मावळाचा कारभार चालविला जात होता ५२ चावडीचे या ठिकाणावर आज जुन्नर म्युनिसिपालिटीचे कार्यालय उभे आहे

सिंहगडचा पोवाडा गाणाऱ्या अगिनदास शाहीराने आपल्या पोवाड्यांत बारा मावळे जुन्नर विभागाखाली व बारा मावळे पुणे विभागाखाली असल्याचे म्हटले आहे म्हणजे पुणे जिल्ह्याच्या कारभाराखाली त्या वेळी एकूण २४ मावळे होती पुण्याखालील बारा मावळाची नावे वृक्ष, वेली व नद्याच्या नावावरून पडली आहेत, असे अनेक तज्ज्ञाचे मत आहे पुणे प्रान्ताखालील बारा मावळांत १) अदर २) नाणे ३) पवन ४) घोटन ५) पौड ६) मुळे ७) गुजन ८) वेळखड ९) भोर १०) शिवतर ११) हिरडस १२) मोसे ह्या मावळाचा समावेश होतो. त्यापैकी अदर, पवन, मुळे या मावळाची नावे अनुक्रमे त्या त्या भागातून वाहणाऱ्या इद्रायणी पवना आणि मुळा ह्या नद्यांच्या नावावरून पडली आहेत.

जुन्नर प्राताखालील मावळात १) शिवनेर २) जुन्नर ३) भीमनेर ४) घोडनेर ५) भामनेर ६) मीननेर किवा मीन्नेर ७) मूळ्नेर ८) पेहरनेर ९) सगमनेर १०) अकोलनेर ११) पिंपळ्नेर १२) सिन्नेर ह्या मावळाचा समावेश होतो. नीर म्हणजे नदी आणि नेर म्हणजे त्या नदीवर वसलेले गाव किंवा तो विशिष्ट प्रदेश, या अर्थाने विचार केल्यास 'जुन्नर' नाव कसे पडले हा एक चर्चेचा विषय होईल विद्वानानी अनेक मते त्यासबधी माडली आहेत आज तरी 'शिवनेर आणि जुन्नर' ही नेरे या विभागात प्रचलित नाहीत. 'कुकडनेर व मढनेर' नावाची नेरे या भागांत प्रचलित आहेत

*

## २. मावळ मुळशीचा परिसर

पुणे प्राताखालील मावळाची उत्तरेकडील सुरवात मावळ तालुक्यातील अदर-मावळपासून होते महाराष्ट्रातील प्रसिद्ध कार्ला लेण्याच्या उत्तरेकडील आध्र नदीचे खोरे म्हणजेच अदरमावळ ही नदी भीवपुरीच्या माथ्यावरील डोगरात उगम पावते पुढे ती डोगर-दऱ्याखोऱ्यातून वाहत वाहत येऊन राजपुराजवळ इद्रायणीला येऊन मिळते याच नदीवर मोठे धरण बाधण्यात आले आहे या खोऱ्याला आध्र (अदर) मावळ म्हणतात. शककर्ता शालीवाहन ज्या कुळात जन्माला आला, त्या सातवाहन, महाराष्ट्र महावशाचे मूळस्थान आध्र (अदर) मावळात आहे असे लोक सागतात वडेश्वर हे प्रमुख ठिकाण या भागात असून त्या ठिकाणी 'शकराचे मदिर' आहे. 'नाण मावळ' हे इद्रायणीचे खोरे नाणे हे एक गाव इद्रायणी नदीच्या उत्तर तीरावर खडाळ्याच्या समोर आहे या गावच्या नावावरून या मावळाला नाणे मावळ असे म्हणत असावे पवना नदी मावळ तालुक्यातील तुग किल्ल्याच्या उत्तरेकडील डोंगरात उगम पावते व पुण्याजवळ दापोडी-बोपोडी येथे मुळा नदीस येऊन मिळते. चिचवडच्या पलीकडे पवनेच्या तीरावर पवनाळे नावाचे खेडे आहे. या खेड्याच्या नावावरून या खोऱ्याला 'पवनमाळ' असे नाव आहे हेच ते पवनमावळ. अलीकडे पवना नदीवर मोठे धरण बाधले आहे पवना धरणाच्या जलाशयात पवना नदी आज विलीन झाली आहे

ही तीनही मावळे ऐतिहासिक व सास्कृतिकदृष्ट्या महाराष्ट्राच्या इतिहासात फार महत्त्वाची ठरली आहेत ऐतिहासिक पुणे शहराच्या अगदी पश्चिम घाटमाथ्यावर ही मावळे असल्यामुळे इतिहासात त्याना अनन्य साधारण महत्त्व होते याच मावळामध्ये चाकणचा भुईकोट किल्ला, लोहगड, तुग व तिकोनी हे किल्ले असून कार्ले, भाजे, बेडसे ही प्राचीन लेणी आहेत तुग म्हणजे कठीणगड आणि तिकोना म्हणजे वितडगड तुगगडावर श्री तळजाईचे मदिर आहे व पाणी पुरवठ्यासाठी जलाशय आहे अगदी टोकावर श्री तुगीदेवीचे मदिर आहे. तिकोनी गडाचा आकार त्रिकोणी आहे गडावर चार दरवाज्याची मालिका लागते. गडावर

श्री त्र्यबकेश्वर महादेवाचे मदिर आहे बाले किल्ल्याच्या खालच्या भागात श्री तळजाईचे मंदिर आहे तिकोनी किल्ल्यावर एक उपेक्षित लेणे आहे हे लेणे सातवाहनोत्तर असावे चाकणच्या भुईकोट किल्ल्यावरून फिरगोजी नरसाळा जुन्नर प्रांताखालील भीम व भामनेराच्या प्रदेशावर व अदर, पवन, नाणे आणि घोटण ह्या मावळावर देखरेख ठेवीत असे लोहगड व राजमाची येथील मजबूत किल्ल्याचाही उपयोग या मावळावर देखरेख करण्यासाठी केला जात असे मराठी गोळी लागून 'इस्टूर फाकडा' याच पवन मावळात भुईसपाट झाला असा इतिहास आहे

या भागात लोणावळा विभागातील लेणी प्रसिद्ध आहेत लोहगडावर भाजे व बेडसे ही लेणी आहेत ही लेणी बौद्धकालीन राजानी बाधलेली आहेत कोडाण, भाजे, कार्ले आणि बेडसे ही लेण्याची श्रेणी ख्रि पू. दोन शतकापासून इ स च्या पहिल्या शतकाच्या काळात कोरलेली आहेत कोडाण, भाजे व बेडसे या लेण्याचा कालखड ख्रि पू. पहिले शतक आहे, तर कार्ले लेणीचा कालखड ख्रि नतर पहिल्या शतकाचा आहे, भाजे येथील लेणी हीनयान बौद्धपथाची लेणी आहेत या बौद्ध लेण्याशेजारी एका जल-प्रपाताजवळ एक सूर्यगुफा आहे ऐरावतावर आरूढ झालेला इद्र आणि सात-वाहनाना विशेष पूज्य असणारा भगवान सूर्यनारायण आपल्या सज्ञा व छाया या पत्नीबरोबर चार घोड्याच्या द्विचक्री रथात आरूढ झालेला दिसतो

लोहगड हे प्राचीन लष्करी ठाणे असावे गडावर एका अज्ञात साधूची समाधी आहे वनदेव म्हणून लोक त्याची पूजा करतात गडावर शेखअमर व त्याचा मुजावर याच्या कबरी आहेत लोहगडाच्या पहिल्या दरवाजाचे नाव गणेशदरवाजा असून त्यानतर नारायण व हनुमान दरवाजे आहेत हनुमान दरवाजा त्यापैकी जुना आहे बाकी दरवाजे नाना फडणीसानी इ स १७८९ मध्ये बाधले दरवाज्यामध्ये दोन भुयारे आहेत धान्यकोठारे म्हणून पूर्वी त्याचा वापर होत असे. महादरवाज्यातून आत गेल्यावर माडीवजा इमारत आहे त्यातील थडगे हे औरगजेबाच्या मुलीचे असल्याचे लोक सागतात गडावर सदर आणि कोठ्या आहेत टेकडीवर मोठे तळे आहे हे नाना फडणीसाने बाधले आहे, असा उल्लेख आहे लोहगड हा प्राचीन दुर्ग आहे हा किल्ला सातवाहन काळात अस्तित्वात आला असावा त्यानतर किल्ल्यावर १४९१ मध्ये निजामशाहीचा सस्थापक मालिक अहमद याने त्याचा ताबा घेतला १६३७ साली त्याचा ताबा अदिलशाहीकडे गेला १६४८ सालात

शिवाजी महाराजानी त्याचा ताबा मिळविला. मिर्झा राजे जयसिंगाशी झालेल्या तहात जे २३ किल्ले शिवाजी महाराजानी मोगलांना दिले, त्यात लोहगडाचा समावेश होता १६७० मध्ये शिवाजी महाराजांनी हा किल्ला पुन्हा मिळविला शिवाजी महाराजाच्या मृत्यूनतर हा किल्ला पुन्हा मोगलानी घेतला आणि १७१३ मध्ये कान्होजी आग्रे यानी तो पुन्हा स्वराज्यात आणला नाना फडणीसाची या किल्ल्यावर पकड होती नानाच्या मृत्यूनतर त्याची नववी पत्नी जिऊबाई येथे होती त्यानतर जिऊबाई मेणवली येथे राहिली १८१८ सालात ४ मार्च रोजी हा किल्ला इग्रजांच्या ताब्यात गेला

उल्हास नदीच्या मर्कट पर्वताच्या दरीत राजमाचीच्या श्रेणीमध्ये पहिल्या पदावर तुटलेल्या कड्याच्या पायथ्याशी ख्रि पू दोनशे वर्षांपूर्वीची कोंडाण्याची लेणी असून तिची पडझड झाली आहे चार लेण्याचा हा गट उल्हासनदीकाठच्या ठाकूरवाडीजवळ अगदी तळात आहे हा भाग एका बाजूला असल्याकारणाने ह्या लेणीकडे लोकाचे विशेष लक्ष गेलेले नाही कलते खाब, झुकत्या भिंती, खोदकामात अर्ध्या उठावाच्या चैत्याकार गवाक्षाची व वेदिकाची योजना, स्तूपावर विस्तीर्ण हर्मिका आणि चैत्याच्या अर्धवर्तुळाकार छताला फासळ्यासारख्या लाकडी काड्या ही या लेण्याची प्राचीनत्वाची वैशिष्ट्ये आहेत

मळवली गावच्या उत्तरेला कार्ले लेणी आहे, तर दक्षिणेला भाज्याची लेणी आहे प्राचीन लेण्यात दिसणारी सर्व वैशिष्ट्ये या लेण्यामध्ये पाहावयास मिळतात पवनमावळामध्ये कामशेतपासून पाच मैलावर बेडशाची लेणी आहेत कलते खाब, झुकत्या भिंती, कड्या, गवाक्षी इ. प्राचीन शिल्पकलेची वैशिष्टये या लेण्यात प्रामुख्याने दिसतात महाराष्ट्रामध्ये 'सिंह' असलेले दोन स्तभ आहेत. त्यांपैकी कार्ले-चैत्यासमोरील एका स्तभाचा त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल हा स्तभ ४५ फूट उच असून एकसधी आहे बैठक वर्तुळाकृती असून त्या बैठकीला १६ कोन आहेत व त्यावर सिंहाच्या आकृत्या बसविलेल्या आहेत 'अग्निमित्रजनक' याने हा स्तभ कोरविला असावा, असा तज्ज्ञाचा कयास आहे बेडसे लेण्यातील 'पर्सिपोलिटन धर्तीचे खाब' व 'साडेतीन खाब' अद्वितीय आहेत त्याच्या अग्रभागी चौफळी चौकोनी बैठकीवर दोन्ही बाजूना परस्परविरोधी तोंड करून हत्ती, बैल, घोडे यांच्या जोड्या आहेत त्यांवर अलकाराने यथापूर्ण सजविलेल्या स्त्री-पुरुषाच्या मूर्ती असून ह्या सर्व प्रतिकृती सजीव आहेत, असा भास होतो.

कार्ले येथील लेणी बौद्ध चैत्यात विस्तीर्ण झालेली असून त्यांची सख्या ३७ आहे भाजे व बेडसे लेण्यामध्ये त्याची सख्या २७ व २६ आहे परतू त्याची रचना कार्लेच्या लेण्याएवढी रेखीव, सरळ व मजबूत नाही तेथे ऐश्वर्य आहे, कला आहे, पण डामडौल, कौशल्याचे प्रदर्शन व मूर्तीची गर्दी नाही 'वैजयतीचा भूपाल सेठी' हा ह्या लेणीचा कर्ता असे इतिहासतज्ज्ञाचे म्हणणे आहे. भाजेच्या लेणीत शेवटी 'सूर्यगुफा' आहे ती १८७९ साली माती-दगड काढून साफ केली. ही गुफा ब्राह्मणी लेण्याचे वैशिष्ट्य आहे तेथे इद्र व सूर्य याच्या प्रतिमा आहेत. पुष्पमाला धारण करून इद्र हत्तीवर आरूढ झालेला आहे त्याच्या हाती अकुश आहे त्याच्या दोन बायका जवळच असून एक चौरी ढाळते तर दुसरीने छत्र हातात धरले आहे रथ राक्षसाला तुडवीत चालला आहे, असा पौराणिक देखावा दाखविला आहे ब्राह्मणी लेण्याची यावरून कल्पना येते

या परिसरात राजमाची हा प्रसिद्ध किल्ला आहे. श्रीवर्धन व मनरजन हे राजमाचीचे बाले-किल्ले समजले जातात, बालेकिल्ल्याच्या खालच्या पठाराभोवती तटबदी आहे किल्ल्याच्या माचीवर उढेवाडी नावाचे गाव आहे उढेवाडीजवळच 'उदयसागर' नावाचा तलाव आहे. हा तलाव इ स १८०० मध्ये राजपुरीच्या देशमुखानी बाधलेला आहे तलावाच्या पश्चिमेला कळशीदार मदिर आहे मनरजन बालेकिल्ल्यावर किल्लेदाराच्या वाड्याचे जोते, छप्पर नसलेली परतू भक्कम इमारत व पाण्याची टाकी अद्याप शाबूत आहेत श्रीवर्धन हा राजमाचीचा सुमारे ९०० मीटर उचीचा बालेकिल्ला आहे त्यावर देवडी आहे देवडीला प्रशस्त खाब आहेत श्रीवर्धनच्या टाक्यात सुमारे ४ मीटर उचीचा लोहस्तभ पडलेला आहे मनरजनाच्या पायथ्याशी भैरवनाथाचे मदिर आहे व त्यावर जलधारा सोडणारे हत्ती आहेत किल्ल्यावर सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, कदब, बहामनी, आदिलशाही, शिवशाही, पेशवाई आणि इग्लीशशाही ह्या साऱ्याच्या खुणा दिसतात

मुळशीच्या मावळतीकडे अन् लोणावळ्याच्या पूर्वेकडे एक डोगराळ मावळ भाग आहे त्याला कोरबारचे असे नाव आहे श्री शकरराव जोशी यानी मुळशी सत्याग्रह केला, त्या वेळी इकडील भागाचा बराच इतिहास प्रसिद्धीला आला त्यात खावड खोरे, जुने मुरुम, चिमण मावळ इत्यादी मावळाचा उल्लेख सापडतो पण त्याच्या स्थान-निश्चितीबद्दल नक्की सागता येत नाही मुरुमखोरे गुजण मावळाचा भाग समजला जातो राजगडावर मुरुमदेव नावाचे स्थान आहे. या

स्थानावरून हे नाव पडले असावे, असे श्री. ग ह खेर याचे म्हणणे आहे कोरबारसे या मावळाचा उल्लेख श्री जोशी यानी त्याच्या लिखाणात केला आहे हा भाग पौड मावळाचाच एक भाग समजला जातो. कोळवण व कोरी गडाचे दरम्यानचे भागाला कोरबारसे हे नाव असावे

'कोरबारसे' मावळात कोरीगड आणि धनगड असे दोन किल्ले आहेत वाहतुकीच्या अडचणीमुळे हे किल्ले मागे पडले आबवणे हे गडाच्या माथ्यावरचे गाव आहे ही पूर्वी पेठ होती गडाचा माथा सुमारे ९५० मीटर उचीवर आहे गडावर जाण्याचे दोन मार्ग आहेत राजवाट आणि आबवणे गावाकडील वाट गडाला गणेश दरवाजा आहे गडावर एकूण ६ तोफा आहेत. पैकी दोन गणेश दरवाजाच्या आत आहेत सर्वांत मोठी तोफ 'लक्ष्मी' गडदेवता श्री कोरीबाईच्या मदिराजवळ आहे. देवी प्रसन्नवदनी, चतुर्भुजी व शस्त्रसज्ज आहे ११ मार्च १९१८ मध्ये हा किल्ला इग्रजाच्या हाती पडला त्या वेळी देवीचे सर्व जडजवाहीर व सुवर्णालकार इग्रजानी नेले गडावर दोन तळी आहेत दोन्ही तळ्यात काळे विंचू व स्पज जातीचे प्राणी आढळतात गडाला चहुबाजूनी तटबदी आहे दक्षिणेकडील बुरुजाची भक्कम तटबदी सर्वांच्या लक्षात राहते

धनगड किल्ल्यावर गारजाई देवी आहे मदिराजवळ मोठा तोफगोळा पडलेला आहे काही शिल्पे पडलेली आहेत चौकोनी दीपमाळही उभी आहे हे दोन्ही किल्ले महादेव कोळी सामताकडून निजामशाहीकडे, नतर आदिलशाहीकडे व त्यानतर शिवशाहीकडे आले पेशवाई सपल्यावर अखेर इग्रजांनी हे किल्ले ताब्यात घेतले.

*

# ३. भोर भाटघर आणि तोरणा-राजगडचा परिसर.

पुण्याच्या पश्चिमेकडील मुळशी परिसराला लागून दक्षिणेकडे भोर, भाटघर, वेल्हेमहल, सिंहगड हा परिसर आहे. इतिहासात प्रसिद्धीला आलेला मावळी प्रदेश तो हाच. या परिसरात सिंहगड, राजगड, रायरेश्वर, रोहिडा, तोरणा, इत्यादी बलाढ्य किल्ल्याची राग उभी आहे. या प्रदेशातूनच मुळा, मुठा इत्यादी नद्याचा उगम झालेला आहे खडकवासला, भाटघर, मुळशी, पानशेत, वरसगाव ही धरणेही याच परिसरात बाधण्यात आलेली आहेत

मावळापैकी शिवतर मावळ घाटमाथ्याच्या पूर्वेस आहे. वेळवण खोऱ्यातून किवा वाघेघोळी या घाटाच्या मार्गाने या मावळात जाण्यासाठी रस्ता आहे. कारभाराच्या दृष्टीने हा भाग वेगळा मानल्यामुळे त्याला मावळ किंवा खोरे म्हणत असावेत

पुण्याच्या नैऋत्येकडे सिंहगड दिसतो. हाही मावळ प्रदेशात आहे हा प्राचीन गड आहे. समुद्रसपाटीपासून सिंहगडाची उची १३१८ मीटर (सुमारे ४३२२ फूट) आहे. सिहगडचे मूळचे नाव कोढाणा गडावर कौंडण्येश्वराचे प्राचीन देवालय आहे हा किल्ला मुसलमानी अमदानीपूर्वी नागनाथ नावाच्या कोळी सरदाराच्या ताब्यात होता त्याने तो किल्ला मुसलमानापासून आठ महिने लढविला. शेवटी रसद तुटल्यावर नाइलाजास्तव हा किल्ला सोडणे नागनाथाला भाग पडले तीनशे वर्षांपूर्वी शहाजी राजे भोसले याना कोंढाण्यानजीकची जहागिरी मिळाली शहाजी कधी आदिलशाहाकडे तर कधी मोंगलाकडे नोकरी करत, त्यामुळे किल्ल्याची सत्ता बदलत असे शहाजी राजानी जिजाबाई आणि पुत्र शिवाजी याना पुढे पुण्याजवळील जहागिरीवर धाडले. तेव्हा त्याचे कारभारी दादाजी कोंडदेव होते तानाजी मालुसरे याच्यामुळे या गडाला विशेष प्रसिद्धी मिळाली १६७२ मध्ये तानाजीने शेलार मामाच्या सहकार्याने हा गड सर केला त्या लढाईत उदयभानू राठोड हा गडाचा मोगल सरदार मारला गेला त्यानतर या पराक्रमाची पुनरावृत्ती १६९३ मध्ये विठोजी कोरके व नावजी बलकवडे यानी केली १७०० मध्ये छत्रपती राजाराम महाराजाचे गडावर

निधन झाले. १४ एप्रिल १७०३ मध्ये औरगजेब हा बलदड गड पाहण्यासाठी गडावर आला व त्याने गडाचे नाव 'बक्षिदाबक्ष" असे ठेवले १८१८ मध्ये इग्रजानी गडावर ताबा मिळविला या गडावर लोकमान्यानी वास्तव्य केले आणि मौलिक ग्रथ लिहिले आज गडावर दूरदर्शनचा उच मनोरा सगळ्याचे लक्ष वेधून घेतो गडावर पाण्याची टाकी, गणेश टाके, रत्नशाळेचा चौथरा, हनुमत ही ठिकाणे आहेत बालेकिल्ल्यावर कौंडिण्येश्वराचे मदिर, नरवीर तानाजीची छत्री, अमृतेश्वर, देवटाके याचा परिसर आहे गडावर राजारामाची समाधी आहे शिवाजी महाराजाच्या पूजेतील दोन शिवलिंगे आहेत राजारामाच्या पादुका आहेत

मुळा, मुठा ह्या मावळाची नावे त्या त्या नदीच्या काठी असणाऱ्या गावावरून पडली असावीत गुजण मावळ म्हणजे गुजण नदीचे खोरे गुजवणी नदी राजगडाच्या उत्तरेकडील डोंगरात गुजवणे या खेड्यानजीक उगम पावते व अळंदे ह्या खेड्यानजीक नीरेस मिळते वेळवड खोऱ्यातील वेळवड नदी भाटघर धरणात विलीन झालेली आहे हिरडस मावळ म्हणजे नीरा नदीचे खोरे नीरेच्या काठावर असलेल्या हिरडोशी गावावरून हे नाव या मावळला पडले. या भागात हिरड्याची झाडे विपुल आहेत त्यावरून हे नाव पडले असावे, असाही काहीचा तर्क आहे

'रोहीड खोरे' हे एक मावळ. रायरेश्वरच्या मदिरात स्वराज्य स्थापनेचा शपथविधी शिवाजी महाराजानी केला. या गडाची उची सुमारे ३५०० फूट आहे भोरच्या दक्षिणेला ८ कि मी वर हा गड आहे रोहिडा (विचित्र गड) किल्ल्याला तीन दरवाजे आहेत त्यातून आत गेल्यावर रोहिड मल्ल ऊर्फ भैरोबाचे मदिर आहे किल्लेदाराचा वाडा किवा सदर आहे. गडाला सात बुरूज आहेत गडाला सर्व बाजूनी तटबदी आहे गडावर जुन्या घरठाण्याचे अवशेष व जोती आढळतात. गडावर वाघजाई व चतुर्भुजा देवीच्या मूर्ती आहेत जोरमावळ हा मावळी प्रात मोऱ्याच्या आधिपत्याखाली या मावळाचा कारभार चाले खोडबर मावळे हे सर्वांत लहान मावळ एकूण दहा-बारा गावे मिळून हा एक छोटासा पेठा किवा महाल होता शिवाजी महाराजाची मूळची जहागिरी खोडेंबर म्हणजे खेड-शिवापूरचा भाग किवा शिवगगा नदीचे खोरे ही होती

भोर तालुक्यात रायरेश्वर हे गिरीस्थान आहे बारा मावळाचे मुऱ्हा रायरेश्वर हे श्रद्धास्थान मानले आहे. कान्होजी जेधे, बाजी पासलकर, तानाजी मालुसरे, येसाजी कक, सूर्याजी काकडे, बादल ही सारी मडळी याच परिसरातील रायरेश्वर येथे

तीन खणांचे पूर्वाभिमुख देवालय आहे देऊळ अधारे व कोंदट आहे वैराटगड, पाडवगड, कमळगड, महाबळेश्वर, राजगड, रायगड, तोरणा इ दुर्गांचे रायरेश्वरावरून दर्शन घडते

या परिसरातील श्री छत्रपती शिवाजी राजाचा आवडता किल्ला म्हणजे राजगड स्वत छत्रपतीच्या वाड्याचे आवार आजही गडावर त्याच्या वास्तव्याची साक्ष देते राजारामाचा जन्म, सईबाईचा मृत्यू इत्यादी अनेक कौटुबिक घटना राजगडावर घडल्या आहेत त्यामुळे महाराजाचा किल्ल्यावर फार जीव होता. राजगडाचे प्रमुख चार भाग आहेत बालेकिल्ला, पद्माची, सुवेळा माची आणि सजीवनी माची. राजगडाचा आकार पख पसरलेल्या पक्ष्यासारखा आहे. पद्ममाची विस्तीर्ण आहे. तेथील कौलारू मदिर व पद्मावतीची मूर्ती आजही उभी आहे त्याशिवाय हवालदाराचा वाडा, पद्मावती जलाशय, राजाचा वाडा, रत्नशाळा, घोडतळे, सदर व दरवाजे येथे अवशेषरूपाने दिसतात पद्ममाचीवर डुबा, कवचधारी पुरुषमूर्ती, नदी, घराचे चौथरे आढळतात बालेकिल्ला हे राजगडाचे वैशिष्ट्य. बालेकिल्ल्याचा दरवाजा कोसळला आहे परतु गुहा शाबूत आहे बालेकिल्ल्यावर जननीचे मदिर, ब्रह्मर्षींचे मदिर, चद्रकोर टाके इ अवशेष आढळतात राजगड १७०४ मध्ये औरगजेबाने जिकला किल्ल्याचे नाव त्याने 'नबीशाहगड' असे ठेवले. या गडावर औरगजेबाचे सैन्य मुक्कामाला होते १० मार्च १७०४ हा औरगजेबाचा ८९ वा वाढदिवस साजरा झाला. त्या दिवशी तोरणा गडावर चाल करून त्याने तो जिंकला गडाचे मूळ नाव मुरुबदेव बालेकिल्ल्यावर ब्रह्मेश्वराचे मदिर आहे. किल्ल्यातील ती मूळ वास्तू आहे गडाच्या दोन्ही तटास बारा बुरूज आहेत

या परिसरातील प्रसिद्ध गड म्हणजे तोरणा किंवा प्रचड-गड त्याची उची ४६०० फूट म्हणजेच १४०० मीटर एवढी आहे. गडावर तोरणाची झाडे खूप असल्याने या गडाला तोरणा हे नाव पडले असावे शिवाजी महाराजानी तोरणा ताब्यात घेतल्यावर त्याचे नाव बदलले व प्रचडगड असे ठेवले किल्ल्याला ७ मेटे होती त्यांची नावे आजही प्रचलित आहेत गडावर श्री तोरणाजाई ही देवी आहे १६४७ मध्ये शिवरायानी तेथे भगवा झेंडा फडकविला शिवरायांनी तोरण्याची दुरुस्ती केली त्या वेळी त्याना गडावर २२ हडे सोन्याच्या मोहरा सापडल्या. जेथे मोहरांचे धन मिळाले तेथेच अष्टभुजा महिषासुरमर्दिनी श्री. तोरणाजाईची स्थापना झाली

आहे मदिराजवळ तोरणटाके, तोरणेश्वर महादेवाची घुमटी आहे. गडावर मेंगाईचे मदिर आहे मदिरासमोर दिवाणखान्याचे अवशेष आहेत. पूर्वेकडे झुझारमाचीच्या बाजूला वेताळ, ढालकाठीची जागी म्हसोबा टाके आहे गडाला अनेक बुरूज आहेत अनेक माच्या आहेत त्यात बुधला माची प्रसिद्ध आहे पूर्वेस तहारवाडी, झुझारमहाल नावाची जागा आहे. त्याला तळघर आहे. त्यात हजारो लोक बसू शकतील एवढी ऐसपैस जागा आहे

मावळातील प्रमुख किल्ले ही लढाईची प्रमुख ठिकाणे होती किल्ला काबीज झाला की, मावळ काबीज होई सर्व खजिना लुटला जाई यावरून किल्ल्याचे महत्त्व अनन्यसाधारण होते, याची कल्पना येते श्री छत्रपती शिवाजी महाराजानी तोरणा किल्ला प्रथम सर केला व स्वराज्याचे तोरण बाधले तोरणा किल्ल्यावर महाराजाना मोठा धनसचयच मिळाला या धनाचा वापर महाराजानी स्वराज्याची मुहूर्तमेढ भक्कम करण्यासाठी केला तोरण्याची डागडुजी केली इ स १६४५ मध्ये राजगड किल्ला महाराजानी बाधला तोरणा किल्ल्याला पूर्वी प्रचडगड असे म्हणत. या किल्ल्यावरून गुजन, कानद व वेळवड या मावळावर देखरेख ठेवण्यात येई. हिरडस व रोहीड खोऱ्यावर रोहिडा उर्फ चित्रगड या किल्ल्यावरून नजर ठेवण्यात येई हे किल्ले काही प्राचीन, काही अर्वाचीन आहेत अभीर, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव ह्या साम्राज्यकर्त्यांनी धर्मकृत्यासाठी ह्या तटबदी केलेल्या आहेत, या अर्थाचा उल्लेख नाणेघाटातील लेण्यामध्ये सापडतो महाराष्ट्रावर अनेक अतिक्रमणे झाली त्यातील काही सह्याद्रीच्या वेगवेगळ्या घाटांद्वारे व पायवाटाद्वारे झाली. या घाटातील येण्या-जाण्यावर देखरेख ठेवण्यासाठी घाटाजवळ किल्ल्याची उभारणी केली असावी जसे नाणेघाटजवळ जीवधन किल्ला, लोणावळा घाटाजवळ लोहगड व राजमाची किल्ला

लेणी खोदण्याची प्रथा सातवाहन काळापर्यंत चालत आलेली दिसते त्यानतर महाराष्ट्रात कोठेच लेणे खोदण्यासबधी उल्लेख सापडत नाही. काही उल्लेख सापडतात ते फक्त यादव कुळातील देवळासबधी यादव काळात हेमाडपती देवळे बाधण्याची प्रथा मोठ्या प्रमाणावर सुरू झाली महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आजही हेमाडपती देवळे दिसतात यादव काळातील ह्या स्मृती पाडवकालीन आहेत असे लोकाना वाटते

मावळाचा कारभार पाहण्यासाठी सरदार असत परतु हे सरदार एकमेकांना

जुमानत नसत श्री. छत्रपती शिवाजी महाराजानी सर्व सरदाराना एकत्र आणले. स्वराज्याचे व एकजुटीचे महत्त्व त्याना पटविले तरीदेखिल फदफितुरी होतच राहिली. कान्होजी जेधे प्रथम शहाजीला व नतर शिवाजी महाराजाना मिळाला त्याने मातब्बर मराठी सरदार छत्रपती शिवाजीकडे वळविले, पण सभाजीचे कालात जेधे पुन्हा मोगलाना फितूर झाले खडोजी खोपड्याने शिवाजीला पकडून देतो असा दिमाखी विडा उचलला होता धनाजी-सताजीचे वैर विकोपाला गेले वाई प्रांत मिळावा म्हणून सूर्याजी पिसाळने फितुरी केली साताराचा किल्ला मोगलानी काबीज केल्यावर बाबाजी डफळे यांनी मोगलाचे निशाण प्रथम किल्ल्यावर लावले फदफितुरीची अशी कितीतरी उदाहरणे सागता येतील फदफितुरीमुळे तोटे झाले खरे, परतु ह्या कारवायामुळे मावळ्याची शक्ती, क्षात्रतेज, अभिमान व शूरत्व कायम पणाला लागले "आधी लगीन कोंडाण्याचे मग लगिन रायबाचे" हे तानाजीचे बोल तर "बचेंगे तो और भी लढेंगे" हे दत्ताजीचे बोल, महाराष्ट्रधर्माची ग्वाही देतात महाराष्ट्राला शक्ती, भक्ती आणि वीरश्री मावळ्या वीरांनी दिली

*

# ४. सातारा-कोल्हापूर जिल्ह्यांतील दुर्गांचा मावळी प्रदेश

सह्याद्रीतील मावळामध्ये अनेक राजे राज्य करून गेले त्याच्या खुणा आजही ठिकठिकाणी उभ्या आहेत चालुक्याचे राज्य सपुष्टात येण्याच्या वेळेस भोज राजाने जोर केला परिस्थितीचा योग्य फायदा घेऊन त्यानी किल्ल्याची उभारणी केली पन्हाळा, पाडवगड, कल्याणगड, भूधरगड, रागणा, खेळणा, विशालगड, अजिंक्यतारा, समानगड इ किल्ले त्यानी उभे केले परतु दुर्दैवाने इ स १२०९ मध्ये भोज राजाचा पराभव सिंघण यादवाने केला व कोल्हापूर राज्यातील शिलाहार घराणे धुळीस लावले पुढे अल्लाउद्दीन खिलजीने शकरदेव यादवाचा पराभव केला व देवगिरीवर आपले बस्तान बसविले हिदूचा छळ, जिझियाकर, हिदूच्या देवस्थानाची फोडतोड व धर्मछळ याला कटाळून शेवटी शकरदेवाचा मेहुणा हरिपालदेव याने रामदेवरायाचा मत्री राघव याच्या सहाय्याने बड पुकारले लढाया सुरू केल्या पण अल्लाउद्दीन खिलजीच्या प्रचड सैन्याला तो तोंड देऊ शकला नाही

शकरदेवाचे राज्य कोल्हापूरच्या घाटमाथ्यापर्यंत पसरले होते सगमेश्वराच्या दक्षिण बाजूस असलेल्या खेळणा ऊर्फ विशाळगड किल्ल्यावर त्याची राजधानी होती भोजशिलाहाराने हा किल्ला इ स १२०० मध्ये बाधला त्याची लाबी ३२०० फूट तर रुदी १०४० फूट आहे त्यावर ६४० चौ फू भूपाल तलाव आहे ३००० फूट लाब व १००० फूट रुद असा विस्तृत माथा त्याला लाभला आहे हा एक अजोड किल्ला आहे गडावर वीर बाजीप्रभूची समाधी आहे तसेच मलिक रैहान या बहामनी सरदाराचे थडगे आहे. छत्रपती राजारामाच्या पत्नी अबिका ऊर्फ अहिल्याबाई महाराजाच्या पागोट्याबरोबर गडावर सती गेल्या ते ठिकाणही गडावर आहे

शिवाजी महाराजानी जावळीच्या चद्रराव मोऱ्याचा पराभव केल्यावर या भागात देखरेख ठेवण्यासाठी जावळीच्या घाटमाथ्यावर व पश्चिम कड्यावर भक्कम जागेवर इ. स. १६५७-५८ मध्ये प्रतापगड किल्ला उभारून स्वराज्याची ताकद

वाढविली हा किल्ला नैसर्गिक दृष्ट्या इतका भक्कम आहे की, शत्रूच्या अफाट सैन्याला तो एकटाच तोंड देऊ शकतो सह्याद्रीतील नाक्यावर हे ठिकाण असून उत्तर व पश्चिम बाजूला उच कडे आहेत हा भाग डोंगरी लढाया, गनिमी युद्ध या दृष्टीने उपयुक्त असल्यामुळे श्री छत्रपती शिवाजी महाराजाना तो पचप्राण वाटे इग्लीश इतिहासकारानी त्याला पूर्वकडील जिब्राल्टर असे सबोधले आहे याच किल्ल्यावर १० नोव्हेंबर, १९५९ मध्ये शिवरायानी अफझलखानाचा वध केला. या वेळी रणदुल्लाखानाच्या हाताखालीच तयार झालेले कान्होजी जेधे शिवरायाच्या बाजूने होते त्याच्या बरोबर कक, मालुसरे, बादल, हे नव्या दमाचे सरदार, बाजीप्रभू व फुलाजी प्रभू देशपाडे, नेताजी पालकर अशी अनेक मडळी मदतीला होती इ स १६५९ ते १८१८ या प्रदीर्घ कालखडात इ स १६८९ मधील काही महिन्याचा कालखड सोडला तर हा किल्ला शत्रूला कधीच मिळाला नाही प्रतापगडच्या परिसरात जवळच्या जावळीच्या मोऱ्याचे ठाणे, कोयनेवरचा शिवनिर्मित पूल, पारघाट, रडतोंडीचा घाट, निसणीघाट, तानाजी स्मारक, पोलादपूरचे परमानदाचे स्मारक, चद्रगड, मकरदगड, मगळगड, हातलोटघाट व त्यापलीकडे महीपत सुमार आणि रसाळगड, चतूरबेट, घोणसपूर व झोलाईची खिड हा वनराईने भरलेला प्रदेश मनाला मोहून टाकतो

महाड, पोलादपूर किंवा वाई-महाबळेश्वरहून आले की, कुभरोशी किंवा वाडा नावाचे गाव लागते गडाच्या आग्नेयेस पार नावाचे खेडे आहे दोन्ही गावामधून प्रतापगडावर जाता येते दक्षिणेच्या टेहळणी बुरजाखालून जाणारी वाट तटबदीत लपलेल्या पश्चिमाभिमुख महाद्वारातून आत शिरते महाद्वाराशिवाय गडाला आणखी पाच दरवाजे आहेत. गडावर मुख्य आकर्षण श्री भवानीमातेचे मदिर हे आहे श्वेतगडकी, त्रिशूलगडकी व सरस्वतीच्या त्रिवेणी सगमावरील उत्कृष्ट शिलेतून मूर्ती घडविलेली आहे अष्टभुजा महिषासुरमर्दिनी ही अतिशय देखणी मूर्ती आहे देवीच्या उजव्या बाजूस सूर्य, डाव्या बाजूस चद्र आणि मस्तकी शिवलिग आहे डाव्या हातात शख, ढाल, धनुष्य आहे व एका हाताने महिषासुराची शेडी पकडलेली आहे महिषासुराच्या एका बाजूस नाग व दुसऱ्या बाजूस सिह आहे देवीच्या उजवीकडील हातात खड्ग, बाण व चक्र आहे व एका हातातील त्रिशूळ महिषासुराच्या शरीरात खुपसला आहे देवी प्रथम राजगडी व नतर प्रतापगडी आणून तिची प्रतिष्ठापना केली देवीचे मौल्यवान दागिने १९२९

साली दरोडेखोरानी चोरले या मदिरात नितळ पारदर्शक असे हातभार उचीचे स्फटिकाचे शिवलिंग आहे शिवभवानीच्या डाव्या हातात भवानीची अतिशय प्राचीन व सुदर मूर्ती आहे सभामडप, कीर्तनमडप, गाभारा व समोर सुदर दीपमाळ आहेत बालेकिल्ल्यावर समर्थांनी स्थापलेले हनुमान मदिर आहे. बालेकिल्ल्याच्या दारावर श्रीराम अशी अक्षरे कोरलेली आहेत गडावर केदारेश्वराचे स्वयभूस्थान आहे गडाचे दरवाजे आजही सूर्यास्ताला बद होतात व सूर्योदयाला उघडतात गडावर देवीचे तळे, तलावाचा बुरूज, केदार बुरूज, सूर्याबुरूज, कडेलोट, दिंडीचा दरवाजा, रेडे बुरूज, यशवत बुरूज व टेहळणीचा बुरूज अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत खुद्द गडावर शिवरायाचा वाडा होता. तिथे आता शिवपुतळा बसविलेला आहे खानाच्या वधानतर त्याची कबर बाधली होती १८९५ साली निजामानी तिचा जीर्णोद्धार केला खानाच्या शेजारी सय्यदवडाची कबर आहे ही स्थळे खूप नीटनेटकी व देखणी आहेत.

कृष्णाकाठी वसलेल्या वाई शहराजवळच पाडवगड किल्ला आहे किल्ल्याचा माथा १४०० मीटर उचीवर आहे गडाच्या मध्यभागी श्री पाडवजाईचे मदिर आहे. गडाच्या माथ्यावरून प्रसिद्ध माढरादेवीचे स्थान, वाई आणि मेणवलीचा परिसर, कृष्णाकाठ, पाचगणी, महाबळेश्वर व आजूबाजूचा सर्व परिसर विलोभनीय वाटतो पन्हाळ्याचा शिलाहार भोजराजा (दुसरा) याने या गडाची उभारणी केली. शिवशाहीत सामील होण्यापूर्वी हा किल्ला विजापूरकराच्या ताब्यात होता पाडवगडाच्या जवळच्या धावडी गावाच्या हद्दीत काही दुर्लक्षित लेणी आहेत लेण्याशेजारी गुहा आहेत त्यातील शिवलिंग प्रेक्षणीय आहे. गुहेशेजारी ८ खोल्याचा विहार आहे पाडवगडाशेजारी 'माढरदेवी' हे सुदर पर्यटनस्थळ आहे कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिम पट्ट्यात पन्हाळा हा प्रसिद्ध किल्ला आहे या किल्ल्याची उभारणी शिलाहारवशीय भोजराजाने केली असावी, असा तज्ज्ञाचा अदाज आहे कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिमभाग हा देखिल प्रसिद्ध मावळी प्रदेश आहे. इतिहासात प्रसिद्धीला आलेला असा हा परिसर आहे १६५९मध्ये शिवाजी महाराजानी पन्हाळगड ताब्यात घेतला त्याला ते दक्षिणेचा स्वामी समजत पन्हाळा आज तालुक्याचे ठिकाण आहे पन्हाळ्याला तीन दरवाजा, चार दरवाजा, वाघ दरवाजा, राजदिंडी, अशा अनेक वाटा आहेत पन्हाळा परिसरात लक्ष्मीमदिर, ताराबाईचा राजवाडा, सज्जाकोठी, कलावतींचा सज्जा, दुतोडी बुरूज, दौलता बुरूज, काळी

बुरूज, गगा, सिंधू सरस्वती ह्या धान्यकोठ्या, सदोबाचे तळे, सोनाळे तळे, सोमेश्वर तलाव, सभाजी देवालय, अशा अनेक गोष्टी गडावर पाहण्यासारख्या आहेत

रागणा ऊर्फ प्रसिद्धगड किल्ला हा एक प्रचड गड आहे हा किल्ला कोल्हापूरच्या शिलाहार राजानी बाधला असावा त्याची लाबी १६०० मीटर व रुदी ९०० मीटर एवढी आहे गडाला शिवाजी दरवाजा, यशवत दरवाजा, तळ्याची वाट, ससेवाडीची वाट अशा चार वाटा आहेत गडावर श्री रागणाबाईचे मदिर आहे मदिरासमोर दीपमाळ आहे. चौथऱ्यावर हनुमानाची मूर्ती आहे. कोल्हापूर जिल्ह्यात भूदरगड तालुक्यात हा किल्ला आहे बहिरवनाथाच्या जागृत देवस्थानामुळे हा किल्ला प्रसिद्ध आहे किल्ल्याला दोन दरवाजे आहेत गडावर मोटा तलाव आहे तलावाकाठी शकराची दोन मदिरे, व भैरवनाथाचे मदिर आहे गडावर थोडी झाडी आहे त्याच्या फाद्यावर व तटबदीवर आर्कीडस ही वनस्पती विपुल प्रमाणात सापडते गडावरून दूधगगा, वैनगगा नद्याची खोरी, राधानगरीचे दाट अरण्य व आबोली घाटाचा परिसर व निसर्गरम्य शोभा दिसते

*

# ५. शिवनेर-जुन्नरचा ऐतिहासिक ठेवा

पुणे प्रांताप्रमाणेच जुन्नर प्रांत इतिहासात प्रसिद्धीला आला. अनेक राजांच्या राजवटी जुन्नर प्रांताने पाहिलेल्या आहेत. कोणत्याही राजवटीत जुन्नर प्रांताला स्थैर्य लाभले नाही अनेक राजवटींच्या खुणा मात्र आजही जुन्नर प्रांतामधील मावळांमध्ये पाहावयास मिळतात जुन्नर प्रांताखाली एकूण बारा मावळे समाविष्ट झालेली होती त्यात जुन्नेर, शिवनेर, मीननेर (मीन्नेर), कुकडनेर, मढनेर, मूळनेर, (मळनई) पेहेरेनर (प्रवरानेर), अकोलनेर, पिंपळनेर, घोडनेर, भीमनेर, भामनेर यांचा समावेश होता मावळांचीही नावे गावांच्या आणि नदीच्या नावावरून प्रचलित झाल्याचे दिसते. येथे नेर-नीर म्हणजे पाणी, नदी या अर्थाने हा शब्द आलेला आहे

जुन्नर नावासंबंधी (काहींच्या मते) 'जार्णनगर-जुण्ण (प्राकृरूप) जुनेनगर, जुन्नेर' अशी उत्पत्ती लावण्यात येते परंतु या उत्पत्तीत नगर शब्दाला कोठेच स्थान नाही आणि अर्थाअर्थी त्याचा काहीच संबंध पोहोचत नाही काहींच्या मते जुन्नरजवळ मीना नदी आहे व तिच्या खोऱ्यास मीन्नेर म्हणतात शक जातीच्या लोकांनाही 'मीन' असे नाव होते, तेव्हा 'मीन-नगर-मीन्नेर' असे येथील शक लोकांच्या वस्तीवरून हे नाव पडले असावे व त्यावरून जुन्नेर असा अपभ्रंश झाला असावा असे स आ जोगळेकर यांचे मत आहे टॉलेमी ज्याला तगर म्हणतो ते त्रिगिरीवरून झाले असल्यास त्या परिसरात लेण्याद्री, मानसोड (जे पाहण्यासाठी मान मोडेपर्यंत प्रयत्न करावा लागतो) व शिवनेर हे तीन गिरी आहेत काहींच्या मते आमेनगर, यावननगर यावरून जुन्नर हे नाव पडले असावे २४ मावळात हिंडून संशोधन करणारे आबा चांदोरकर यांच्या मते जुन्नर (खरे जुन्नेर) हे नाव वनस्पती व पाणी यांच्या संयोगापासून बनले आहे त्यांच्या मते 'जावक' हे नाव ज्या वृक्षास आहे त्याला मराठीत 'असणा' म्हणतात. त्याचे 'काटे असणा व पाले असणा' असे दोन प्रकार आहेत या औषधी वृक्षाचे दुसरे नाव सालई 'जीवजीवन' (स) पाणी, नदी, जावन, नार, जावकनार, जावनेर, जुन्नेर, जुन्नर' म्हणजे जावन नदीच्या काठचे गाव महाशात्रप नहपानची राजधानी 'मीन्ननगर' असे पेरिप्लस सांगतो आणि 'मीन्ननगर' म्हणजे 'जुन्नर' असा

विद्यासागर बरवले याचा तर्कआहे.

जुन्नरजवळच्या नदीचे नाव कुकडी आहे. ते कसे पडले हेही गमतीचेच आहे गोमातकात 'कुक (कु)ळी' गाव आहे हे नाव औषधी वेलीपासून पडले आहे त्याचे सस्कृत नाव ककोळ, काकोल आणि मराठी ककोळ किंवा कापूरचिनी या वेलीचा कापरासारखा सुवास येतो आणि हिच्या फळास 'ककोळ' असे नाव आहे खाल्ल्यावर ते शीतल वाटते ककोळ जेथे जास्त त्या नदीस ककोळी नाव पडले भोर मावळात 'ककोळ ओढा' असून तेथे पुष्कळ ककोळी फळे आहेत जुन्नर मावळातही ह्या वेली फार 'ळ' बद्दल 'ड' अदेश होतो त्याप्रमाणे 'ककोळिक (कु) कुळी क, कुकडी' असे नाव पडले असावे

पूर्वीच्या इतिहासात जुन्नर हे महत्त्वाचे ठिकाण होते कल्याण व नालासोपेरे या प्राचीन बदरातून होणारा व्यापार देशावर सलग्नरीतीने नाणेघाटाद्वारेच जुन्नरहून होत असे विशेषत· मिरी, मीठ, नारळ इत्यादी पदार्थ घाटानी देशावर येत असत व नतर निरनिराळ्या ठिकाणी जुन्नरमार्गे त्यांचा व्यापार होत असे जुन्नर हे एकच असे शहर आहे की काही काळ पेशव्याची राजवट सोडली तर त्याला राजकीय स्थैर्य लाभले नाही. प्राचीन काळी जुन्नर परिसरात शक लोक राज्य करत होते त्याच्या नहापानराजाची जुन्नर ही राजधानी होती ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकात हे शक उज्जयनीस होते पुढे ते सौराष्ट्र, गुजराथ, डाग, कल्याण, कार्ला, जुन्नर येथे आले अलोट दानधर्म, धर्मशाळा, घाट बाधणे, नानापरीची लोकसेवा त्यानी केली पण ते परकीयच राहिले गौतमीपुत्र सातकर्णी याने क्षत्रपाचा पराभव केला नाणेघाटाशी सबधित असा हा थोर राजा येथेच वावरला

जुन्नरच्या शिवपूर्वकालीन राजवटीतील अती प्राचीन अस एक शिल्प खुद्द जुन्नरमध्ये आहे सदर बाजारातील वेशीनजीकच्या दक्षिणेकडील बुरुजावर एक शिल्प आहे त्याच्या अर्थ असा की, 'इथल्या सत्ताधीशाकडे गजातलक्ष्मी आहे, शुकासारखी विद्वत्ता व वैराग्य आहे आणि वाघासारखे तळपणारे शूर सैनिक आहेत ' इ स पू ९० मध्ये जुन्नर ही क्षत्रपाचा राजा नहपान याची राजधानी होती त्याचा मत्री अमयवत्सगोत्री याचा उल्लेख लेण्याद्रीच्या शिलालेखात सापडतो नाणेघाटातील अद्‌बाह्यणी शिलालेखावरून व तोडाशी असलेले जकातीचे दगडी राजण व जुन्नरकडील मार्गावर असलेल्या विहिरी यावरून कल्याण, चौल, सोपोरे या कोकणातील बदराशी जुन्नरचा फार पूर्वीपासून सबध होता हे दिसून येते. या

भागातील लेण्याचा ठेवा हा एकट्या -दुकट्याचा नसून या भागातील आदिवासी, महादेव कोळी, मावळे, मराठे इत्यादी अनेक जनसमुदायानी इ स पूर्व पहिल्या शतकापासून इ स नतर नऊ शतके खपून अपूर्ण ठेवलेला असा हा महाराष्ट्राचा अमोल ठेवा आहे चालुक्य, राष्ट्रकूट, देवगिरीचे यादव, मोगल, मराठे व इग्रज याच्या अमदानीचा उमग, विकास, ऱ्हास जुन्नर परिसराने पाहिला आहे. शिवनेरी किल्ला माडवी, कुकडी व मीना या नद्याच्या सानिध्यात वसला आहे जुन्नर शहराच्या पश्चिमेस साधारणपणे अर्ध्या मैलावर, समुद्रसपाटीपासून ३३४२ फूट उचीवर व गावापासून हजार फूट उचीवर शिवनेरी किल्ल्याचे आरोहण झाले आहे शिवनेरी किल्ला त्रिकोणी असला तरी पूर्वेकडून तो एखाद्या प्रचड जहाजासारखा दिसतो शिवनेरी हे नाव कसे पडले यासबधी अनेक अदाज असले तरी शिवाजीचे किवा शिवभवानीचे नेर ते शिवनेर हे नाव सार्थ वाटते शिवभवानीमुळे जसे शिवाजी तसे शिवाजीवरून शिवनेर असे या खोऱ्याला व किल्ल्याला नाव पडले असावे

सास्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिकदृष्ट्या शिवनेरी व त्याच्या परिसरातील महत्त्व इसवीसनापूर्वीपासून सातत्याने टिकले आहे. या किल्ल्यावर पाच निरनिराळ्या राजकर्त्यांनी राज्य केल्याच्या खुणा अद्याप दिसतात तटबदी, कमानी, शिल्प व दरवाजे यावरून त्या दिसून येतात. प्रथम हा किल्ला बौद्ध धर्मीयाकडे व त्यानतर देवगिरीच्या यादव घराण्याकडे गेला. (११७० ते १३१८) हे अनुमान गडावरील गगा-यमुनाची टाकी, कमान, टाक्याच्या पायऱ्याची घडण, गणेशमूर्ती इत्यादींवरून काढण्यात येते. त्यानतरचा काळ मुस्लीमाचा. इ स १४४३ मध्ये मलिक उल तुजार ह्या बहामनी सरदाराने हा किल्ला व गाव 'महादेव कोळी' आदिवासीच्या ताब्यातून घेतला तोपर्यंत शिवनेरीवर महादेव कोळी लोकाचे राज्य होते इ स १४८५ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहीचा स्थापनकर्ता मलिक अहमद मलिकउल तुजारचा प्रतिनिधी म्हणून जुन्नरला आला. किल्लेदाराने किल्ला सोडला नाही त्यामुळे रागाने त्याने त्याची रसद तोडली पाच वर्षांचा महसूल व मुलुख ताब्यात घेतला. पुढील वर्षी मलिकउल तुजारचा खून झाला त्या वेळी मलिक अहमद कारभारासाठी जजिरा येथे होता तो ताबडतोब जुन्नरला आला व 'निजाम-उल्-मुलक बहरी' हा किताब घेऊन राजा झाला पुढील एक शतक हा किल्ला निजामशाहीच्या अमलाखाली आला पुढे इ. स १५९५

मध्ये दुसरा बहादूर शहा निजाम याने शिवाजीचा आजा मालोजी भोसले याना पुणे, सुपे, हे दोन प्रात, व शिवनेरी, चाकण हे दोन किल्ले दिले तरीपण हा किल्ला शहाजीकडे फार काळ राहिला नाही विजापूरकरानी शहाजीस नोकरीस बोलावले शहाजीने ते नाकारले तेव्हा विजापूरकराचा बादशहा महमद व मोगलाचा रणदुल्लाखान यानी शहाजीस जिंकण्याचा प्रयत्न केला तेव्हा नाइलाजाने शहाजीने होकार दिला व किल्ला स्वाधीन केला तो काळ साधारणपणे इ स १६३७चा असावा शिवनेरी किल्ल्यावर मुसलमानी राजवटीचे फार काळ वर्चस्व राहिले किल्ला मात्र प्रत्यक्षात महादेव कोळी लोकाच्याच ताब्यात होता शिवशाहीचा उदय झाल्यावर येथील महादेवकोळी लोक शिवाजी महाराजाना साथ देऊ लागल्याच्या कारणावरून किल्ल्यावरील त्याचे वर्चस्व काढून घेण्यात आले अनेकाचा त्या वेळी कडेलोट करण्यात आला महादेव कोळी लोकाना दहशत बसावी म्हणून शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी त्याची मोठी कत्तल करण्यात आली या कत्तलीत हजारो लोक मारले गेले त्याच्या मुडक्याचा ढिगारा करून त्यावर चौथरा (चबुतरा) बाधण्यात आला त्याची 'काळा चबुतरा' अशी इतिहासात नोंद आहे महादेव कोळी लोकाच्या सामुदायिक कत्तलीची ती एक काळी स्मृती आहे हा काळ इ स. १६५०चा असावा

शिवनेरीवर जाण्यास जुना मार्ग परदेशपुऱ्यातून होता आता नवीन पी डब्ल्यू. डी चा उत्तम रस्ता झालेला आहे या रस्त्याने जाऊ लागलो की, डाव्या बाजूला 'भातखळे' नावाचे ओसाड गाव लागते पुढे गेल्यावर 'पीरवाडी' तर खिडीतून गडाकडे जाताना डाव्या बाजूस 'जुने भातखळे' लागते त्या ठिकाणी पूर्वी बाजार भरत असे हेच ते पूर्वीचे बाजारी जुन्नर. पुढे गेल्यावर किल्ल्याची चढण सुरू होते गडावर जाण्याचे दोन मार्ग आहेत एक सातवाहनकालीन दगडी पायवाटेचा या वाटेने सात दरवाजे ओलाडावे लागतात. दुसरा मार्ग साखळीच्या वाटेचा शिवनेरीच्या कमरेत मेखलेप्रमाणे शोभणाऱ्या लेण्याच्या मालिकेतून जाणारा हा मार्ग आज किल्ल्याच्या वरपर्यंतच्या पायथ्यापर्यंत रस्त्याची व्यवस्था आहे पुढे पायवाटेनेच जावे लागते या भागातील गडासभोवती नेहमी वावरणारी मडळी अगदी कठीण वाटानी किल्ल्यावर जातात महादरवाजातून आत गेल्यावर परवानगी दरवाजा लागतो त्याच्या कमानीच्या दोन्ही अगास शरभाची चित्रे आहेत त्या शरभाच्या पायाखाली हत्ती आहेत. डाव्या हाताच्या शरभाच्या उजव्या पुढच्या पायाखाली कुत्र्याची आकृती,

तर उजव्या हाताच्या शरभाच्या उजव्या पुढच्या पायाखाली गडभेरूडाची आकृती कोरली आहे शरभ हा वाघ किंवा सिंहासारखा दिसणारा काल्पनिक पशू, तर गडभेरूड हा कर्नाटकाच्या राजसत्तेची निशाणी सागणारा द्वितोडी गरुडासारखा पण काल्पनिक पक्षी तिसऱ्या दरवाजाच्या कमानीच्या अशाच शिल्पचित्रावर शरभाच्या पायाजवळ इग्वाना म्हणजे घोरपडीसारखा प्राणी आहे किल्ल्यात प्रथम महादरवाजा दुसरा गणेश, तिसरा हत्ती, चौथा घडणीचा पीर, पाचवा सागवानी लाकडाचा शिपाई दरवाजा लागतो हा दरवाजा तटबदीचा उत्कृष्ट नमुना आहे त्याच्या उजव्या बाजूस वळल्यावर देवडीमधून शिवाबाईकडे जाता येते तेथून खोदीव पायऱ्या या वाटेने वर चढले की फाटक दरवाजा व कुलाबकर दरवाजा लागतो. तेथील अबरखाना प्रेक्षणीय आहे श्री शिवाईदेवीचे देऊळ आधुनिक आहे त्या ठिकाणी शिवाबाईची चतुर्भूज मूर्ती व तादळा अगदी नवीन आहेत जुनी मूर्ती व तादळा २२ डिसेंबर १९४५ मध्ये कोणीतरी माथेफिरूने फोडली पुढे २७ फेब्रुवारी १९४८ मध्ये सध्याची मूर्ती व तादळ्याची स्थापना झाली या देवळाचा जीर्णोद्धार महाराष्ट्र राज्य स्थापनेनतर १९६० साली शिवस्मारक समितीने केला शिवाबाईचे दर्शन घेतल्यावर आपण डाव्या बाजूने चढण चढून गेल्यावर सहावा फाटक व सातवा कुलाबकर असे दोन दरवाजे लागतात पुढे बालेकिल्ला व पायवाटेने गेल्यावर पायऱ्या पायऱ्याची चढण लागते ही चढण वर चढून गेल्यावर आपण गड चढून आल्यासारखे वाटते सभोवार त्या वेळी पाहावे पश्चिमेला नाणेघाट व जीवधन किल्ला, उत्तरेला हटकेश्वर, हडसरचा डोगरी किल्ला व हरिश्चद्रगड व सभोवताली तुळजा, मानमोडे, दुधारे लेण्याद्री, नवरानवरी इत्यादी कलाकृती दिसतात हा किल्ला फार भयानक वाटत नाही लहान मुले आणि स्त्रियासुद्धा त्याच्यावर जाऊ शकतात गडाच्या पूर्वेला जुन्नर शहर व पचलिंगाचे देऊळ, बाराबावडी व मोठी मशिद वगैरे प्रमुख ठिकाणे व जुन्नरचे बुट्टेपाटील हायस्कूल, शिवछत्रपती कॉलेज प्रशस्त स्वरूपात दिसतात

## गडाच्या माथ्यावरून

गडमाथ्यावरून आपण पुढे गेल्यावर प्रथम गगा-यमुनाची टाकी व उजव्या बाजूला कमान टाकी दिसते त्यासमोरच्या वास्तूच्या आत शिवाजी महाराजाचे जन्मस्थान लागते त्याहीपुढे बदामी तळे व उत्तरेस थेट कडेलोटाचा बुरूज लागतो

या बुरुजावरून पूर्वी लोकाना कडेलोट करण्यात येई. महादेव कोळी मावळ्या वीराचा या बुरुजावरून अनेक वेळा कडेलोट करण्यात आल्याचे इतिहासात अनेक पुरावे मिळनात  हा बुरूज कडेलोटासाठी १७६० पर्यंत उपयोगात आणला जात असे कमान टाके किवा मशीद याला आतील-बाहेरील दोन भाग असून आत उतरण्यास त्याला यादवकालीन पायऱ्या आहेत  कमानीच्या भिंतीवर शिलालेख आहेत. आज ते फारच पुसट दिसतात. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस बौद्ध लेणी व अबरखाना लागतो. कमानटाके किंवा मशीद मुर्तजा निजामशहाचा मुलगा बुऱ्हाण निजामशहाच्या कारकीर्दीत १६२५ मध्ये बाधली असा उल्लेख सापडतो  थेट उत्तरेस बदामी टाके आहे  ते ३३ पावले लाब-रुद व ८ फूट खोल बदामाच्या आकारासारखे भव्य आहे  बालेकिल्ल्यावर एक इदगा व घुमट आहे  घुमटावर अरबी व फारशी भाषेतील वचने कोरली आहेत  आत स्त्रीचे थडगे असून ते बहुधा दौलतखानाची आई दौलत बीबी हिचे असावे  किल्ल्याच्या पूर्व बाजूस कमान टाक्याखालील कड्यातून किल्ल्यावर जाण्यास पायऱ्या होत्या  परतु १८१८ साली मेजर एल्ड्रिजच्या सैन्याने त्या तोडल्या. त्या पायऱ्याच्या उजव्या अगास खडकात गणपतीची कोरीव मूर्ती आहे

ऐतिहासिक वास्तुशिवाय शिवनेरी किल्ला व त्याचा परिसर म्हणजे शिलालेखाचे व लेण्याचे आगरच आहे. प्रत्येक डोगर लेण्यानी कोरलेले आहेत शिवनेरी किल्ल्याच्या पश्चिम-पूर्व व दक्षिण कुशीत एकूण ६५ लेणी असून त्यापैकी ३ चैत्यगृहे आहेत  पूर्व कुशीत दोन गट आहेत  तेथील लेणी क्र  ३२ । १९, २३ । २४ मधून कमान टाक्याकडे जाण्यास रस्ते होते  त्याच्या सुरुवातीस दुर्ग, गणपती व बटूक याच्या मूर्ती कोरलेल्या आहेत  या लेण्याच्या डाव्या बाजूस दुसरा गट असून त्यात १४ लेणी आहेत. त्याना 'बारागडद' म्हणतात  त्यातील लेणीत १२ खोल्या आहेत  पश्चिमेकडील लेणी अवघड आहेत  त्याशिवाय पश्चिमेला तुळजागट, उत्तरेला लेण्याद्रिगट, मानमोडगट वगैरे अनके वास्तुशिल्पे शिवनेरीच्या परिसरात पसरलेली आहेत  गडावरून तुम्हाला हरिश्चद्रगडाची शिखरे, नाण्याचा अगठा ही सह्याद्रीची उच शिखरे दिसतील  जुन्नरच्या परिसरात पश्चिमेला मावळ भागात हिरडा व १५७ नबरी आबेमोहोर भात पिकतो  अशी ६४ गावे मावळ भागात आहेत  ओतूर येथे तुकोबा महाराजाचे गुरू चैतन्य महाराजाची समाधी आहे  नारायण गावाजवळ मीना नदीच्या काठी ज्ञानसागर ग्रथाचे

लेखक "सत हरिबाबा भोडवे' याची समाधी आहे अष्टविनायकापैकी एक गणेशमूर्ती लेण्याद्री येथे तर एक ओझर येथे आहे ओतूर येथे श्रावण महिन्यात मोठी यात्रा भरते मावळात कुकडेश्वर हे शकराचे आद्यस्थान आहे महाशिवरात्रीला तेथे मोठी यात्रा भरते येथील देऊळ हेमाडपती असून देवळाच्या भिंतीवर शिवताडव व चामुडा नृत्ये कोरलेली आहेत देवळाच्या दरवाज्यावर योगिनी आणि नवग्रह कोरलेले आहेत या देवस्थानाचा जीर्णोद्धार होणे आवश्यक आहे

खुद्द जुन्नर शहर ऐतिहासिक शहर आहे त्या ठिकाणी प्रामुख्याने ब्राम्हण व मुसलमान याची वस्ती आहे मावळाच्या सपत्तीवर हे शहर मोठे झालेले आहे मावळातील शेतकऱ्याना मात्र या शहरात काही मान नाही जुन्नर शहरात १३ पुरे, १२ वेशी असून दक्षिण बाजूस शिपाई मोहल्ल्याच्या मागे लाल दरवाज्याचे बाहेर दोन तळी असून त्यात जलविहार करण्याची सोय होती हल्लीच्या सराई पेठेला अझिझाबाद पुरा अशी सज्ञा होती शहरातील १८ हौदापैकी १२ हौदाना बारा बावडीच्या विहिरीचे खापरीच्या नळाने पाणी मिळे व शिवनेरीच्या पायथ्याशी असलेल्या दोन विहिरीतून ६ हौदाना पाणी मिळे शहराच्या दक्षिणेस जुना कोट नावाचा वाडा आहे तो साधारणपणे २२० यार्ड पूर्व-पश्चिम व ३०० यार्ड दक्षिणोत्तर आहे त्यामध्ये सर्व कोर्ट-कचेऱ्या असून त्याला तटबदी होती या गढीमध्ये चिमाजी अप्पाला नानासाहेब पेशव्याने कैदेत ठेवले होते. इ. स १६२३-२४ मध्ये बाधलेल्या दगडगढीचे अवशेष शिल्लक नाहीत ही गढी मालिकाबरने बाधली होती गावामध्ये गणपतीची व दत्ताची देवळे असून ती पेशवेकालीन आहेत बुधवार पेठेत जैनाचे प्रेक्षणीय मदिर आहे तर हबशी घुमट ही वास्तू जुन्नरच्या पूर्वेस आहे दर रविवारी जुन्नर येथे बाजार भरतो जुन्नर ही मावळाची बाजारपेठ असून भात, तादूळ, हिरडा, बटाटा, मिरची, भाजीपाला याचा त्या ठिकाणी मोठा व्यापार चालतो शिवाजी राजाच्या जन्मस्थानी शिवजयतीला लाखो लोक जमतात

महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाने शिवजन्मस्थानास भेट देऊन या शिवतीर्थांची व धारातीर्थांची दर्शनयात्रा पूर्ण केली पाहिजे शिवजयतीला तरुणानी मोठ्या सख्येने जुन्नरला भेट देऊन शिवनेरीचे दर्शन घेतले पाहिजे

आता अवधारा कथा गहन ।

जे कळा कौतुका जन्मस्थान ।

की अभिनव उद्यान । विवेकतरूचे ।

हो सत ज्ञानेश्वराची उक्ती या ठिकाणी सार्थ होते.

*

लेखक "सत हरिबाबा भोंडवे' याची समाधी आहे. अष्टविनायकापैकी एक गणेशमूर्ती लेण्याद्री येथे तर एक ओझर येथे आहे ओतूर येथे श्रावण महिन्यात मोठी यात्रा भरते मावळात कुकडेश्वर हे शकराचे आद्यस्थान आहे महाशिवरात्रीला तेथे मोठी यात्रा भरते येथील देऊळ हेमाडपती असून देवळाच्या भितीवर शिवताडव व चामुडा नृत्ये कोरलेली आहेत देवळाच्या दरवाज्यावर योगिनी आणि नवग्रह कोरलेले आहेत या देवस्थानाचा जीर्णोद्धार होणे आवश्यक आहे

खुद्द जुन्नर शहर ऐतिहासिक शहर आहे त्या ठिकाणी प्रामुख्याने ब्राम्हण व मुसलमान याची वस्ती आहे. मावळाच्या सपत्तीवर हे शहर मोठे झालेले आहे मावळातील शेतकऱ्याना मात्र या शहरात काही मान नाही जुन्नर शहरात १३ पुरे, १२ वेशी असून दक्षिण बाजूस शिपाई मोहल्ल्याच्या मागे लाल दरवाज्याचे बाहेर दोन तळी असून त्यात जलविहार करण्याची सोय होती हल्लीच्या सराई पेठेला अझिझाबाद पुरा अशी सज्ञा होती शहरातील १८ हौदापैकी १२ हौदाना बारा बावडीच्या विहिरीचे खापरीच्या नळाने पाणी मिळे व शिवनेरीच्या पायथ्याशी असलेल्या दोन विहिरीतून ६ हौदाना पाणी मिळे शहराच्या दक्षिणेस जुना कोट नावाचा वाडा आहे तो साधारणपणे २२० यार्ड पूर्व-पश्चिम व ३०० यार्ड दक्षिणोत्तर आहे त्यामध्ये सर्व कोर्ट-कचेऱ्या असून त्याला तटबदी होती या गढीमध्ये चिमाजी अप्पाला नानासाहेब पेशव्याने कैदेत ठेवले होते इ. स. १६२३-२४ मध्ये बाधलेल्या दगडगढीचे अवशेष शिल्लक नाहीत. ही गढी मालिकाबरने बाधली होती गावामध्ये गणपतीची व दत्ताची देवळे असून ती पेशवेकालीन आहेत बुधवार पेठेत जैनाचे प्रेक्षणीय मदिर आहे. तर हबशी घुमट ही वास्तू जुन्नरच्या पूर्वेस आहे दर रविवारी जुन्नर येथे बाजार भरतो जुन्नर ही मावळाची बाजारपेठ असून भात, तादूळ, हिरडा, बटाटा, मिरची, भाजीपाला याचा त्या ठिकाणी मोठा व्यापार चालतो शिवाजी राजाच्या जन्मस्थानी शिवजयतीला लाखो लोक जमतात

महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाने शिवजन्मस्थानास भेट देऊन या शिवतीर्थाची व धारातीर्थांची दर्शनयात्रा पूर्ण केली पाहिजे. शिवजयतीला तरुणानी मोठ्या सख्येने जुन्नरला भेट देऊन शिवनेरीचे दर्शन घेतले पाहिजे.

आता अवधारा कथा गहन ।
जे कळा कौतुका जन्मस्थान ।

की अभिनव उद्यान । विवेकतरूचे ।

ही सत ज्ञानेश्वराची उक्ती या ठिकाणी सार्थ होते

*

# ६. इतिहास-प्रसिद्ध नाणेघाट. कुकडेश्वर परिसर

जुन्नर शहराजवळील इतिहासप्रसिद्ध आणि महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेला शिवनेरी किल्ला तसा एकाकी नाही. शिवनेरीच्या पश्चिमेला नाणेघाटाशेजारी जीवधन, चावड ऊर्फ प्रसन्न गड, उत्तरेला हडसर आणि पूर्वेला नारायणगड हे किल्ले आहेत

चावड किल्ल्यावर मुसलमान अमदानीतील अवशेष आहेत पाण्याच्या टाक्या आहेत चावड किल्ल्याला 'जूड' असेही म्हणतात. तर काही ठिकाणी त्याचा उल्लेख प्रसन्नगड असा आहे या किल्ल्याचे वैशिष्ट्य असे की, ३० ते ४० मीटर उचीच्या कातळ माथ्याच्या या पठारी चौथऱ्याचे कडे अगदी सरळसोट आहेत किल्ल्यावर चढण्यासाठी माथ्याजवळच्या नाळेत कडा खोदून छोट्या पायऱ्या खोदल्या आहेत १८१८ च्या शेवटच्या मराठे-इग्रजाच्या युद्धात १ मे रोजी ब्रिटिशाची एक तुकडी चावड गावी आली त्या छोट्या तुकडीच्या प्रमुखाने किल्ला ताब्यात घेण्यास फर्माविले किल्लेदाराने नकार दिला. पण काही तासाच्या आतच तोफेच्या गोळ्याच्या माऱ्यामुळे किल्लेदार शरण आला व त्याने किल्ला ताब्यात दिला तोफेच्या माऱ्यामुळे गडावर जाण्याचे रस्ते निकामी झाले. आता गडावर [illegible]ली तोफ [illegible] कठडे, तुटक्या पायऱ्या, एवढेच काय ते इतिहासाचे पुरावे [illegible] आ[illegible] [illegible]ल्ल्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याची प्रवेशद्वारे. प्रवेशद्वारे कातळात खोदली आहेत प्रवेशद्वारावर विघ्नहर्त्या गणेशाच्या मूर्ती कोरल्या आहेत. गडावर प्रवेशद्वार शाबूद असलेले पण उद्ध्वस्त मदिर आहे. त्यात गडदेवता श्री चावडबाईची भग्नमूर्ती आहे देवळासमोर दीपमाळ आहे पठारावर एक बाधीव कुड एका बाजूला व खोदीव टाके दुसऱ्या बाजूला असणारे कमानीवजा तोरण आहे बाधीव कुडाच्या पूर्व व दक्षिण अगाला काही कोनाडे दिसतात गडावर सात तळ्यांचा सुदर समूह आहे ती सारी एका वर्तुळात खोदली आहेत

चावड गावाच्या पलीकडे पूर, शिरोली ही गावे आहेत. त्या परिसरात कुकडेश्वराचे सुदर मदिर आहे भीमा ते गोदावरी या नद्याच्या दरम्यान दहा नद्या आहेत. या नद्याच्या उगमाच्या आसपास एकेक शिवालय आहे. भीमेच्या काठी

भवरगिरी, घोडनदीवर वचपे गावाजवळ मीना नदीच्या तीरावरील पारुडे गावाजवळचे कुकडी नदीच्या उगमस्थानाजवळचे कुकडेश्वर, पुष्पावती नदीच्या उगमाजवळील खिरेश्वर गावाजवळचे नागेश्वर मंदिर, मुळा नदीच्या उगमाजवळील हरिश्चंद्र गडावरील हरिश्चंद्रेश्वर मंदिर, प्रवरेकाठचे रतनवाडीतील अनंतेश्वर मंदिर, कडवा नदीकिनारीचे टाकेद येथील सर्वतीर्थ मंदिर, बामच्या तीराचे बेलगाव येथील, वारणा नदीवरील तऱ्हळे येथील व वाकी नदीकाठचे श्रिंगळवाडीचे आणि गोदातीरावरील त्र्यंबकेश्वराच्या ज्योतिर्लिंग मंदिरेच्या पूर्वेस असणारे अहिल्या तीर्थानजीकचे मंदिर अशी ही १२ शिवस्थाने झंझराजाने बांधली असे म्हणतात हा राजा कोण होता, ही मंदिरे त्याने का बांधली याची माहिती मिळत नाही यातील प्रत्येक मंदिर वेगवेगळ्या धाटणीचे असले तरी शैली एकाच प्रकारची आहे ही मंदिरे १३ व्या शतकातील आहेत.

कुकडेश्वर मंदिर सभू (शंभू) डोंगराच्या कुशीत वनराईत, बारामाही झुळझुळ वाहणाऱ्या ओढ्याकाठी आहे. मंदिराच्या भिंतीवर व दरवाज्यावर शंकर-पार्वती, गणपती, देवी, नागशिल्प, कुबेर व यक्ष, पक्षी, वेलबुट्टी, श्रीफळे, कीर्तिमुखे व वराहशिल्प कोरलेली आहेत मंदिराचा बारमाही उत्सव महाशिवरात्रीला होतो या परिसरातील महादेव कोळी लोकाच्या सामाजिक बैठका व भंडारा (सामाजिक वनभोजनाचा कार्यक्रम) दत्तजयंतीच्या दिवशी कुकडेश्वर येथे होतो कुकडेश्वर स्थानकापासून जवळच दाऱ्याघाट, नाणेघाट, आंबोलीची नाळ, जीवधन किल्ला इत्यादी प्रेक्षणीय स्थळे आहेत

नाणेघाटाच्या पश्चिमेकडील टोकास नाण्याचा अंगठा असे म्हणतात, तो शिवनेरीवरून दिसतो घाटची नळी २५० फूट लांब व ७ ते १६ फूट रुंद असून तिचे टोक मुरबाड तालुक्यातील (ठाणे जिल्हा) शिंगराचे पठारावर निघालेले आहे.

वसिष्ठपुत्र चतुर्वर्ण सातकर्णी याच्या राजवटीच्या तेराव्या वर्षी कामवन येथील दामघोष याने हे टोक खोदले असा त्यावर उल्लेख आहे महाराष्ट्रातील एकच एक ऐहिक लेणे घाटाच्या नळीच्या डाव्या तोंडास आहे हे सर्वांत जुने ब्राम्हणी लेणे असून सिमुक शातक वाहनाचा मुलगा श्री शातकर्णी व त्याची सून नायनिका हिने हा लेख इ.स पू २२० च्या सुमारास कोरविला आहे ह्याला देवकुरू असे म्हणतात

त्यामध्ये सिमुकाचा पुतळा व त्याच्या नातेवाईकाच्या प्रतिमा व नावे होती पण

आज त्याचे फक्त पायच दिसतात. या शिलालेखात वैदिक व पौराणिक देवाना वदन केले असून धर्म, इद्र, सूर्य, चद्र, मरुत तसेच यम, वरूण, कुबेर, वासव या चार लोकपालास, शकर्षण, वसुदेव याना व त्यानतर अग्नधानपासून अश्वमेध यज्ञापर्यत कमीतकमी २२ यज्ञाचा उल्लेख आहे. खेडी, हत्ती, घोडी, रथ, गाई, कार्षपण नाणी इत्यादी देणग्याचा उल्लेख त्यामध्ये सापडतो. पुढे वेदिश्री या दक्षिणपथच्या राजाने नाणेघाट दुरुस्त केला व प्रवाशासाठी विश्रातिस्थाने निर्माण केली नाणेघाटातील जीवधन किल्ला १८२० साली इग्रजानी नादुरुस्त केला मुस्लीम व मराठी राजवटीत त्यावर कैदी ठेवत असत.

नाणेघाट व जीवधन ही नावे कशी पडली यासबधीचा इतिहास मनोरजक आहे नाणा व गुणा नावाचे दोघे भाऊ होते शातकर्णीच्या हुकमावरून त्याना हा घाट दुरुस्त करण्यासाठी फर्माविले गुणा दक्षिणेकडून व नाणा उत्तरेकडून काम करू लागले नाणाचे काम अवघड व कष्टाचे होते पण सतत प्रयत्नाने गुणाच्या आधीच त्याने ते पूर्ण केले त्यामुळे घाटाला नाणेघाट असे नाव पडले दुसरे मत असे की, नाणेघाटाच्या रस्त्यानी व घाटाजवळ नादुरकीची झाडे फार नादुरकीचे दुसरे नाव नाणे आणि तेच नाव या घाटास देण्यात आले असावे (नदीवृक्ष, णदिरुक्य, नांदरकी) नदा नावाची एक पर्वतीय देवीही आहे व हिमालयाच्या एका शिखराचे नावही नदादेवी शिखर आहे नदी-गाय, बैल या भागात गाय-बैलही भरपूर असून हिमालयात सापडणाऱ्या वस्तू व औषधे जीवकत, ककोळ, नदी या तीन औषधीही जुन्नर मावळात असल्याने हेही नाव समर्थनीय वाटते नाना (फडणीस) घाट असे काही लोक म्हणतात जीवधनाचीही उत्पत्ती अशीच आहे जीव(स) पाणी, धन, पैका, कैदी, धनहरी, नदीवृक्ष, नादुरकी धन्वयास ही एक औषधी वनस्पती, तसेच धनू ही वृक्षवेली, धान्वेन् रानडुक्कर, ध्वनिन एक जातीचा पाढरा बगळा हे सर्व या भागात आढळतात बिकट जागेत किल्ला बाधतात त्याला धन्वदुर्ग म्हणतात. तो धन्वदुर्ग म्हणजेच जीवधन किल्ला होय

नाणेघाटाच्या तोंडाशी खोदलेली टाकी, दगडी राजण, गणेश गुहा, नाण्याचा अगठा इ ठिकाणे प्रेक्षणीय आहेत. जीवधन हा किल्ला त्यापैकी एक अधिक जवळच्या व ऐनघाटाच्या तोडावर असलेला किल्ला या किल्ल्यावर घाटघर गावापासून जाता येते घाटघर हे गाव जीवधन किल्ल्याच्या पायथ्याशी आहे ६०० मीटर उचीच्या गडाचा माथा गाठायला दोन मार्ग आहेत पश्चिमेकडील दरवाजाची

वाट १८१८ नंतर इंग्रजांनी सुरुंग लावून फोडली. उभ्या कातळात खोदलेले भुयारी दार ही त्याची रचना. हा दरवाजा आता निकामी झालेला आहे. दुसरी वाट उगवतीच्या पूर्व दरवाजाची. किल्ल्यावर प्रवेशद्वारातून पुढे गेल्यावर मोठी कोठी दिसते. ती मंदिरवजा आहे. जवळच पाण्याचे टाके आहे. १८१८ च्या मराठे-इंग्रज युद्धात कोठीत भरपूर धान्य ठेवले होते. चकमकीत त्याला आग लागून त्याची राख झाली. आजही ती राख इथे पाहावयास मिळते. आयताकृती गडावर दक्षिणेस उद्ध्वस्त स्थितीत जीवाबाईचे वृंदावन आहे. जीवाबाईजवळ उभे राहिले की, पूर्वेला भैरवगड, दवंड्याडोंगर, ढाकोबा, वादरलिंग, नवरानवरीचा सुळका, कोकणकडा यांचे दर्शन होते. गडाच्या उत्तरमाचीत चवदार पाण्याचे एक भलेमोठे तळे (टाके) आहे.

या परिसरात दुसरा नाव घेण्यासारखा गड म्हणजे हडसर ऊर्फ पर्वतगड. या गडाचे समोर आता माणिकडोह धरण झालेले आहे. गडाचे प्रवेशद्वार अतुलनीय आहे. खडकात खोदून काढलेल्या बोगदेवजा प्रवेशमार्गाची ही दरवाजाची दुक्कल आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी खरी वाट उत्तरेकडून आहे. ती खडकातील सुमारे ३०० पायऱ्यांनी बनविलेली आहे. उभ्या कड्यात ठोकलेल्या लोखंडी कांबीवरून वर जाता येते. मधली गुहाही मुद्दाम जाऊन पाहावी अशी आहे. तळ्याजवळ चिरेबंदी बांधणीचे महादेवाचे मंदिर आहे. मंदिराबाहेर बसविलेला नंदी तर पाहण्यासारखा आहे. सभामंडपात सहा कोनाडे आहेत. कोनाड्यातील गणेशमूर्ती मारुती व गरूडमूर्ती प्रेक्षणीय आहेत. बालेकिल्ल्याच्या पश्चिम उतारावर खडकाच्या पोटात कोरलेल्या तीन गुहा आहेत. प्रत्येक गुहेच्या/कोठीच्या माथ्यावर गणेशशिल्प आहे. बालेकिल्ल्यावर पूर्वेस देवीचे मंदिर आहे व बुलंद बांधणीचा बुरूज आहे. किल्ल्याच्या बांधणीवरून हा किल्ला सातवाहनकाळात बांधला असावा, असा अंदाज करता येतो. १६३७ साली शहाजी महाराजांनी जे पाच किल्ले मोंगलांच्या हवाली केले, त्यात हडसर किल्ल्याचा उल्लेख आहे. पेशवाईच्या अस्तानंतर २५ एप्रिल, १८१८ ला जुन्नरचा पाडाव झाला व लगेचच मेजर एम. लिंडच्या हाताखाली तुकडीने हडसरचा ताबा घेतला. हडसर किल्ल्याच्या समोर पूर्वेला हरकेश्वर डोंगर आहे. तेथे हरकेश्वराचे मंदिर आहे. दक्षिणेला माणकेश्वराचे मंदिर आहे. पश्चिमेला तळेश्वराचे मंदिर आहे. तर उत्तरेला दूरवर हरिश्चंद्रगडाचे दर्शन घडते.

*

# ७. क्षेत्र भीमाशंकर : वनवैभवी प्रदेश

'डाकिन्या भीमाशकरम्'

सह्याद्रीच्या उच पठारावर समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उचीवर भीमनेर खोऱ्यात खोड-आबेगाव तालुक्याच्या पश्चिम सीमेवर आणि रायगड जिल्ह्याच्या पर्व सीमेला लागन श्री क्षेत्र भीमाशकर हे बारा ज्योतिर्लिंगापैकी [illegible]

आहे. पुण्यापासून हे अतर १२० कि.मी. दूर आहे पुणे-नाशिक रोडवरील मचर गावापासून ६२ कि मी. पश्चिमेला हे स्थान आहे. मचर, घोडेगाव, डिभा फाटा, पोखारी या मार्गाने घाट चढून सह्याद्रीच्या विस्तीर्ण पठारावरून वळणे घेत तळेघर, राजपूरमार्गे भीमाशकर येथे जाता येते.

दुसरा मार्ग (खेड) राजगुरुनगर, वाडा, डेहणे, भोरगिरीपर्यंत एस टी ची सोय आहे तेथून पुढे ६ कि मी. पायी घनदाट जंगलातून चढण चढावी लागते येथील तिसरा मार्ग कर्जत स्टेशन (सी आर.) ते खांडज (रायगड) पर्यंत एस.टी ने तर खांडजपासून काठेवाडीमार्गे १३ कि मी शिडी घाट व गणपती घाट मार्गे भीमाशकरपर्यंत जाता येते. चौथा मार्ग कर्जत ते नादगाव पर्यंत एस टी. ने जाऊन पुढे नादगाव चाफेवाडी मार्गे बैल घाटाने पायी चढण चढून भीमाशकर येथे जाता येते एस टी मार्ग सोडून कोकणातून खाडज व नादगावमार्गे चढण चढू लागलो तर सह्याद्रीचे आक्राळ-विक्राळ कडे, डोंगरकपारी, घनदाट झाडी व सुदर परिसर पाहून मनाला आनद होतो रमत-गमत दोन्ही मार्गाने चढण्यास सुमारे ४ तास लागतात

श्री क्षेत्र भीमाशकर येथे पावसाळ्यात २५० इच पाऊस पडतो त्यामुळे या ठिकाणास निसर्ग सौंदर्य व घनदाट वनराई लाभली आहे भीमाशकर परिसरात (१) हनुमान तळे (क्रीडातीर्थ) (२) सीताराम बाबाचा मठ (३) नागफणी टेकडी (पॉईंट) (४) बाँबे दर्शन पॉईंट (५) स्वयभू कमलजा माता मदिर (६) भीमा उगमस्थान (७) भगवान शकर मदिर (८) गुप्त भीमाशकर स्थान (९) सर्व तीर्थ मोक्ष कुड (१०) भाक भाष्य देवी (११) कोटेश्वर मदिर अशी प्रेक्षणीय स्थळे आहेत शिवाय या

परिसरात १०८ तीर्थ असल्याचेही लोक सांगतात

### भीमाशकर मदिर

भीमाशकर येथील शकराचे मदिर सुमारे ७०० वर्षांपूर्वीचे आहे श्रीमत पेशव्यानी या मदिराचा जीर्णोद्धार केला हे मदिर सपूर्ण दगडी असून वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना आहे मदिराचा कळस सोन्याचा आहे. पेशवे काळात श्रीमत चिमाजी अप्पा पेशव्यांनी वसईचा किल्ला जिकला, त्यावेळी या विजयाची आठवण म्हणून किल्ल्यावरील सर्वांत मोठी पोर्तुगीज घटा येथे आणून बांधली आहे. ती हत्तीवरून स्वत' चिमाजी आप्पानी येथे आणली भीमाशकरमाहात्म्यात भगवान शकराची कथा असून ती सबध पुराण व पद्मपुराण ह्या ग्रथात दिलेली आहे. दासबोध, गुरुचरित्र, सह्याद्री खड यात क्षेत्र भीमाशकराचा उल्लेख सापडतो

### पुराण कथा

त्रेता युगात त्रिपुरासुर नावाचा दैत्य येथे वास्तव्य करीत होता त्याने अतिकठोर तपश्चर्या करून भगवान शकरास प्रसन्न करून घेतले शकर प्रसन्न झाल्यावर त्रिपुरासुराने वर मागून घेतला त्याने 'तिन्ही लोकीचे राज्य (स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ) मला दे ' असा वर मागितला भगवान शकर तथास्तु म्हणाले. पुढे काही दिवसानी त्याची राक्षसी प्रवृत्ती जागी होऊन तो ऋषीमुनींना, सत-सज्जनाना त्रास देऊ लागला. त्यामुळे सर्व लोकांनी व ऋषी-मुनीनी देवाची प्रार्थना करून 'या सकटातून आमची सुटका करावी' अशी शकराला विनती केली त्रिपुरासुराला शकराचा वर असल्याने तो कोणाचेही ऐकेना त्या वेळी शकर कैलासात होते सर्व देवदेवता शेवटी कैलासात शकराच्या भेटीसाठी जाऊन 'दैत्याचा नाश करा' असे विनवू लागल्या या दैत्याने देखील अनेक दैत्य गोळा करून शकराबरोबर युद्ध सुरू केले शकराने सर्व देव-देवताना गोळा करून हे युद्ध लढविले भगवान शकरानी राक्षसास मारण्यासाठी महाकाय भीमरूप धारण केले हे युद्ध कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून १५ दिवस चालले. युद्धसमयी शकर थकले. दैत्याच्या मृत्यूसाठी सर्व देवानी शेवटी ब्रम्हदेवाची प्रार्थना करून आदिमाया शक्तीस बोलाविले. ही आदिमाया शक्ती म्हणजे **'श्रीकमलजा देवी'** होय येथील आदिवासींची ती कुलदेवता समजली जाते महादेव कोळी जमातीची ती कुलस्वामिनी आहे. पुढे शिव-शक्ती मिळून या त्रिपुरासुर

दैत्यांचा नाश त्यानी केला व त्यानतर भगवान शकर विश्रातीसाठी बसले. लढाई करून थकल्यामुळे त्यांच्या अगातून घाम वाहू लागला. त्या घामातूनच भीमानदीचा उगम झाला. श्री शकर जेथे विश्रातीसाठी बसले होते तेथे भीमा नदीचा उगम आहे.

त्रिपुरासुराचा वध झाल्याची बातमी त्या राक्षसाच्या बायकाना समजली त्या तात्काळ तेथे हजर झाल्या व भगवान शकराचे पाय धरून आक्रोश करू लागल्या. "देवा, तू हे काय केलेस?' आम्ही पतिव्रता स्त्रिया आहोत. आमच्या पातिव्रत्याचे काय?" भगवान शकराने त्याच्या पातिव्रत्याच्या महतीबाबत त्यांना वर दिला. व "या तीर्थक्षेत्री आजपासून तुमचे नाव माझ्या नावाअगोदर प्रथम सारे भक्तजन घेतील आणि हे क्षेत्र तुमच्या नावाने प्रसिद्ध होईल." असा वर दिला म्हणूनच या क्षेत्रास 'डाकिन्य भीमाशकरम्' असे नाव पडले कार्तिक शुद्ध १५ त्रिपुरी पौर्णिमेस त्रिपुरासुर राक्षसाचा वध झाला म्हणून त्रिपुरी पौर्णिमेस येथे मोठी यात्रा भरते महादेव कोळी जमातीचे लोक या यात्रेला मोठ्या भक्तिभावाने येथ जमतात.

## भीमा उगम व सौंदर्यस्थळे

भगवान शकर विश्रातीसाठी बसले तेथून घामाच्या रूपाने भीमा वाहू लागली तेथे 'शखिनी व डकिनी' या दोन्ही दैत्य स्त्रियांच्या मूर्ती असून तेथे भगवान शकराचे विश्रातिस्थान आहे

कमलजा मातेच्या मदिराच्या नैऋत्येस २ कि.मी. अतरावर जाबाली ऋषीचे आश्रमस्थान आहे तेथे भगवान शकर व पार्वती जलक्रीडा करण्यासाठी जात त्याला अलीकडे 'हनुमान तळे' असे म्हणतात तेथेच अंजली मातेचे मदिर आहे अजली माता तपश्चर्या करीत असताना तिथे तिला पुत्रप्राप्तीचा प्रसाद मिळाला व हनुमानाचा जन्म झाला, अशी दतकथा आहे सुमारे चाळीस वर्षांपूर्वी येथील घनदाट जगलात एकात ठिकाणी सीताराम महाराज नावाच्या साधूपुरुषाने १२ वर्षे तपश्चर्या केली त्या वेळी आजच्यासारखा रस्ता नव्हता अतिशय घनदाट जगल होते जगली जनावराची येथे सतत वर्दळ होती सीताराम बाबा एकटे राहून तपश्चर्या करीत. त्यानी येथे एक मठ बाधला ही त्याची तपोभूमी ठरली

हनुमान तळे व अजनी मातेच्या मदिरापासून पायवाटेने एक कि मी अतर चढून गेलो की नागाच्या फणीच्या आकाराची टेकडी आहे. त्यावरून रायगड व ठाणे जिल्ह्याचा भाग व सह्याद्रीची शिखरे दिसतात कोकणपट्टीचा भाग, हाजिमलगचा

डोंगर दिसतो. येथेच खाली कळवतणीचा महाल (कलावतीण) नावाचा डोगर दिसतो. हा भाग सर्वांत उच आहे माथेरान पॉईंटवरून माथेरान, मुरबाड शहर, सिद्धगड किल्ला दिसतो कोकणातील घरे चिमणीच्या विखुरलेल्या थव्याप्रमाणे दिसतात हे स्थान कमलजा मातेच्या मदिरापाठीमागे आहे भगवान शकराच्या मदिराच्या पूर्वेस गुप्त भीमाशकराचे ठिकाण आहे तेथे भगवान शकर शात व एकातवासात तपश्चर्या करीत असत अशी आख्यायिका आहे या ठिकाणास 'गुप्त भीमाशकर' असे नाव आहे मोक्षतीर्थ आणि सर्वतीर्थ ही तीर्थे भगवान शकराच्या मदिराजवळ असून तेथे स्नान केल्याने सर्व पापाचे क्षालन होऊन मनुष्य पापमुक्त होतो अशी लोकाची श्रद्धा आहे जवळच भोरगिरी गावाजवळ भीमा नदीच्या काठी कोटेश्वर हे शकराचे मदिर आहे ते अति प्राचीन व भव्य आहे तेथे 'भोरगड' नावाचा डोगर आहे त्यावर पाडवकालीन लेणी आहेत. ही सर्व लेणी पाहण्यासारखी आहेत त्यात उत्तम शिल्प आहेत

श्री क्षेत्र भीमाशकर परिसरात औषधी वनस्पती विपुल आहेत औषधी वनस्पतिसशोधक ह्या वनस्पतीचा पाला, कदमुळे शोधून नेतात असाध्य रोगावर या वनौषधींचा उपयोग होतो जगलात शुद्ध मध, शिकेकाई, हिरडा, बेहडा, मुरडा शेंग, गेळ, अजन, करप, आबा, वरस, सावर, कोहबळ, पाढरी, रोमटा, मळवा इत्यादी वृक्ष विपुल आहेत दुर्मिळ औषधी याच भागात सापडतात या प्रदेशात जाभळे, उबरे, तोरणे, करवदे विपुल प्रमाणात आहेत हा परिसर निसर्गसौंदर्याने नटला आहे येथील मध प्रसिद्ध आहे भीमाशकराच्या जगलात वाघ, बिबळे, साबर, रानडुक्कर, भेकर, कोल्हे, लाडगे, मोर, ससे, वानरे, अजगर, इगळी इत्यादी वनचर दिसतात. येथील जगली प्राण्यात 'शेकरू'- उडती खार नावाचा वैशिष्ट्यपूर्ण प्राणी आढळतो महाराष्ट्रातील वन्य प्राण्यात हा एक वैशिष्ट्यपूर्ण व दुर्मिळ प्राणी आहे श्री क्षेत्र भीमाशकर येथे महाशिवरात्र, त्रिपुरी पौर्णिमा, सोमवती अमावशा, श्रावण व कार्तिक महिन्यात यात्रा भरतात येथील आदिवासी महादेव कोळी याचे हे भीमाशकर हे एक पवित्र स्थान आहे

*

# ८. हरिश्चंद्रगडाचा रमणीय पहाडी परिसर

नगर, ठाणे आणि पुणे जिल्ह्यांच्या सरहद्दी ज्या ठिकाणी एकत्र मिळतात तिथेच एक विस्तृत पण रमणीय दुर्ग उभा आहे त्याचेच नाव हरिश्चद्र गड अणे-माळशेज घाट अन् टोलार खिड या मोक्याच्या मार्गांवर नजर ठेवणारा, योगी चागदेवाच्या पाऊलखुणा जपणारा, सत्यवचनी राजा हरिश्चद्राचा इतिहास जिथ घडला त्याची स्मृती जागवणारा, असा हा किल्ला नितात रमणीय आहे.

नाना जातीच्या पक्ष्याचा निवारा, हिरव्यागार झाडीचा कमरपट्टा ल्यायलेला, विपुल पाणी अन् असख्य लेणी, याशिवाय श्री हरिश्चद्रेश्वराच सुबक अन् शिल्पसौंदर्यान नटलेल मदिर आणि महाराष्ट्रातील एकमेव असा एक ते दीड हजार मीटर सरळ तुटलेला अन् डोळे फिरवणारा कोकणकडा. हे सारे प्रत्यक्ष पाहूनच आपण आश्चर्यचकित होतो गडाच्या पायथ्याला दक्षिणपूर्व दिशेला खिरेश्वर गावाजवळ नागेश्वराचे मदिर आहे हे यादवकालीन मदिर विशेष प्रसिद्धही नाही. पण मदिराच्या गर्भगृहाच्या दाराच्या माथ्यावर भगवान शेषशायी श्री विष्णू व त्याच्या परिवाराचे अप्रतिम शिल्प आहे बाहेरच्या मडपाच्या छताला सोळा 'शिल्प पट्ट' बसवले आहेत मूषकवाहन गणेश-गणेशानी, वृषभवाहन शिव-पार्वती, हसवाहन ब्रह्मा-सरस्वती, मयूरवाहन स्कद-षष्ठी, नरवाहन कुबेर-कुबेरी, मकरवाहन मदन-रती अशी बरीच काही शिल्प इथे आहेत डोळे खिळवून ठेवणारी ही शिल्पे मात्र तेलाने खराब होत आहेत

नागेश्वर मदिराजवळ एका ओढ्याकाठी जमिनीलगत एक लेणी आहे. तिचे छत दोन आडव्या ओळीतील बारा खाबानी तोलून धरले आहे उजव्या बाजूस एक खोली आहे जवळच एक बारमाही टाकेही आहे

खिरेश्वर गावातून थेट टोलार खिंडीत गेल्यावर खिडीच्या माथ्यावर एक वाघाचे चित्र कोरलेला, शेदूर फासलेला दगड आहे हा आहे येथील महादेव कोळी लोकाचा वाघदेव. पुढे कातळकडा आहे. या कातळकड्याच्या माथ्यावर थोडे बहुत बाधकामही आहे. तेथून मात्र हरिश्चद्रेश्वराच्या देवळापर्यंत जायला ३-४ कि.

मी. चालावे लागते

अकोले तालुक्यातून पाचनई मार्गे किंवा लव्हाळी गावाकडून किंवा कोहोणे कोथळेवाटेने गडावर येता येते हरिश्चद्र गडावर दोन बालेकिल्ले आहेत. एकाचे नाव हरिश्चद्र अन् दुसऱ्याचे तारामती. हरिश्चद्रगडावर थोडेसे बाधकाम अन् काही टाकी याखेरीज दुसरे काहीही नाही तर तारामती शिखराच्या पोटाशी माथ्यापासून ६० मीटर खाली अनेक लेणी आहेत पैकी एकात आसनस्थ श्रीगणेशाची २ मीटर उचीची मूर्ती आहे. तारामती शिखराखाली एक खोलगट भागात हरिश्चद्रेश्वराचे शैलशिल्प मदिर उभे आहे. जवळच डोंबाची अन् विश्वामित्राची घुमटीही आहे.

श्री हरिश्चद्रेश्वराचे मदिर तळापासून अदमासे १६ मीटर उचीचे आहे इतके विलोभनीय सुदर्शन अन् देखणे मदिर या रानात पाहून मन विस्मयाने थक्क होते मदिराच्या प्राकारात शिरताना दोन कीर्तिमुख आहेत विठ्ठल-रखुमाई, शिवपार्वती, नृसिंह, गणपती, देवी अशा अनेक मूर्ती उघड्यावर किंवा आजूबाजूच्या गुहात आहेत. कोरीव कामाचे दगडही अनेक आहेत मदिराच्या मागे दोन प्रशस्त गुहा मुक्काम करण्याजोग्या आहेत. तेथे थडगार पाण्याची टाकीही आहेत मदिराजवळ मगळगगेचा उगम आहे व तो प्रवाह मदिरासमोरून वाहतो त्यावर दगडी पूल आहे त्यावरूनच मदिरात प्रवेश होतो.

मगळगगेच्या प्रवाहाच्या दिशेने थोडेसे अतर गेले असता एक गुहा डाव्या हातास लागते त्यात कमरेइतक्या उचीच्या चौकोनी चौथऱ्यावर १ मीटर उच अन् २ मीटर लाब-रुद असे भव्य शिवलिंग आहे चौथऱ्यापासून छतापर्यंत ४ खाब होते पैकी एक पडला आहे, दोन अर्धवट उभे आहेत पण तेथपर्यंत जाणे मोठे कठीण आहे केदारलिगाच्या प्रदक्षिणा मार्गावर गारठणक पाण्याचा छातीभर खोलीचा वेढा पडला आहे त्या बर्फतुल्य पाण्यातूनदेखील प्रदक्षिणा घालता येते

हरिश्चद्रेश्वर मदिराजवळ सप्ततीर्थ किंवा सप्तस्थान नामक पुष्करणी आहे त्याच्या उत्तर दिशेकडे चौदा कोनाडे आहेत प्रत्येकात एकेक विष्णुमूर्ती आहे मात्र ठेवण वेगवेगळी पद्मपाणी, गदापाणी इत्यादी अशी वेगवेगळी नावेही त्याना आहेत

याच परिसरात एकदर ८ शिलालेख आहेत पहिला आहे हरिश्चद्रेश्वर मदिराच्या प्राकाराच्या दर्शनी भितीच्या बाहेरील प्रवेशद्वाराच्या डावीकडे. दुसरा व तिसरा केदारेश्वर लेण्याच्या मधल्या दोन खाबांवर मध्यभागी. चौथा आहे हरिश्चद्रेश्वराच्या मदिरामागील लेण्याच्या दर्शनी डाव्या खाबावर, तर पाचवा,

सहावा आणि सातवा तेथेच आहेत. आठवा मात्र हरिश्चद्रेश्वर मदिराच्या डावीकडील भितीला बाहेरील बाजूने ओट्यावरील गणेशमूर्तीच्या मागील चौकटीवर, माथ्याच्या भागात आहे पहिल्या व चौथ्या लेखात चागा-वटेश्वराचा म्हणजे योगी चागदेवाचा उल्लेख आहे.

तारामती शिखराचा माथा म्हणजे गडावरील सर्वोच्च स्थान. तेथून रोहिदास, हरिश्चद्र, कळसूबाई ही शिखरे, अलंग, मदन, कुलग, भैरव, सिधगड, शिवनेरी, हडसर, चावड, जीवधन हे दुर्ग, नानाचा अगठा व अणे माळशेज घाट आणि नाणेघाट इतका मुलुख दिसतो

गडाच्या पश्चिमेस आहे तो रौद्रभीषण असा कोकणकडा किंचितसा वाटीसारखा अतर्गोल असणारा हा कडा एकमेवाद्वितीयम असावा कर्नल साईक्सने इथे पूर्ण वर्तुळाकृती इंद्रधनुष्य म्हणजे इद्रवज्र पाहिले होते आणि हा पदार्थ विज्ञानशास्त्रीय सृष्टिचमत्कार नोंदवून ठेवला. ही घटना १८३५ मधली आहे. आजही पावसाळ्याच्या सुरवातीस सकाळी सूर्य माग व कोकणातून वर चढणारे ढग खाली व आपण मध्ये असू तर हा चमत्कार पाहता येतो

१८३६ ते १८४३ या काळात नगरच्या हॅरिसन ह्या कलेक्टरने हे ठिकाण दुसरे 'महाबळेश्वर, करण्याचे ठरवून येथील विकास करण्याचे प्रयत्न केले. पुढे मात्र इकडे कोणाचे लक्ष गेले नाही त्यामुळे येथील सुधारणा मागे पडल्या

हरिश्चद्र गडाच्या परिसरात खबी गावाजवळील सिंटीला व नेटोला मालशेज घाटाचे बोगदे, विहगम कोकण दृश्य, फोफसडी गावाजवळील कुजरगड ऊर्फ कोंबड किल्ला, पाचनई गावाजवळील कलालगड, शिरपुजे गावाजवळील भैरवगड असे अनेक किल्ले पाहण्यासारखे आहेत. तसेच ओतूर गावाच्या उत्तरेस ५-१० कि. मी. च्या टप्प्यावर चिल्हेवाडी गावच्या जवळ माडवी नदीच्या एका उपनदीच्या काठावरील दऱ्याबाईची देवराई, हळवडी डोह अशी अनेक अनगड ठिकाणेही प्रेक्षणीय आहेत

हरिश्चद्र गडाच्या पायथ्याशी खिरेश्वर गावाजवळील मैदानी प्रदेशात पावसाळा सपला की मध्य सैबेरियातून हजारो पक्षी येऊन राहतात. काही दिवस त्याचा तेथे मुक्काम असतो त्यानतर ते पुढील ठिकाणावर जातात. हरिश्चंद्रगडाचा परिसर– डोंगरकडे, शिखरे– पर्वतारोहण करणाऱ्या तरुणांना स्फूर्ती देणारा आहे प्रचड माळशेज घाट आता वाहतुकीसाठी खुला झालेला आहे त्यामुळे कोकणातून

देशावर व देशावरून कोकणात जाणाराची मोठी ये-जा वाढली आहे माळशेज घाटमाथ्यावर पर्यटन विभागाने निवासाची व विश्रातीची सोय केलेली आहे हरिश्चद्रगड आणि माळशेज घाटाच्या परिसरात दऱ्याखोऱ्यात 'शेकरू'– उडती खार हा प्राणी पाहावयास मिळतो.

*

# १. नयनरम्य भंडारदरा, रतनगड आणि शैल कळसूबाई ते त्र्यंबकगड

नगर आणि नाशिक जिल्ह्याच्या सहहद्दीवर एक आडवीतिडवी डोंगररांग पसरली आहे ही डोंगररांग हरिश्चद्रगडापासून सुरू होऊन उत्तरेकडे थेट त्र्यबकेश्वराजवळ ब्रह्मगिरीला जाऊन मिळते या ४० ते ५० कि. मी च्या दक्षिणोत्तर पट्ट्यात हरिश्चद्रगडाच्या उत्तर सीमेवर मुळा नदीचे खोरे सुरू होते हे न्हेर (नेर) पाचनई (पाचनदी) पासून सुरू होऊन पूर्वेला कोतूलपर्यंत पसरले आहे. या परिसरात साकीरवाडीचा बहिरोबा हे प्रसिद्ध देवस्थान आहे 'कठयाची यात्रा' नावाने दरवर्षी इथे मोठी जत्रा भरते

या परिसरातील दुसरे खोरे प्रवरा नदीचे. त्याला पेहर किवा डांगण असेही नाव आहे प्रवरा नदी रतनगड घाटघर डोंगररागामध्ये उगम पावते भडारदरा धरण झाल्यामुळे प्रवरा नदी त्यात विलीन झाली आहे भडारदरा धरणाच्या पायथ्याला पाटबधारे खात्याने सुदर बाग तयार केली आहे धरणातून सोडलेले पाणी रधा गावाजवळ धबधब्याच्या रूपाने प्रगट होते हाच तो प्रसिद्ध रधा फॉल. जवलच घोरपडा देवीचे जुने व पडके मदिर आहे. महादेव कोळी आदिवासींची ही एक गणदेवता समजली जाते या परिसरातील भडारदरा, शेंडी, राजूर ही प्रमुख गावे आहेत राजूर येथे सर्वोदय केंद्राचे फार जुने माध्यमिक विद्यालय व आदिवासी मुलामुलींचे वसतिगृह आहे येथे आठवडी बाजार भरतो. या भागातील डागी जनावरे प्रसिद्ध आहेत भडारदरा परिसर मात्र वैराण आणि उजाड बनला आहे नगर, नासिक जिल्ह्यात आडव्या पसरलेल्या डोंगररांगात रतनगड, घाटघर, पट्टाकिल्ला, कळसुबाई शिखर ही ठिकाणे आहेत प्रवरा नदी म्हणजे प्रवाही असणारी, धावणारी नदी ही नदी रतनगडावरील रत्नुबाईच्या गुहेत उगम पावते. श्री शकर हा तसा रानावनात राहणारा देव. त्याचे स्थानही अगदी अनगड जागी असते. अशा जागेवर पोहचल्यावर परमेश्वराचे दर्शन मिळते निर्भेळ आनद उपभोगायला मिळतो. असच एक ठिकाण म्हणजे तीर्थाची वाडी (रतनवाडीची). या वाडीत महादेवाच

नितात रमणीय देवालय आहे शिखर, सभामडप, अशा सर्व अगोपागासह चागले ८-९ मीटर उचीचे एक अतिदेखणे शैलशिल्प तिथे अजूनही उभे आहे मदिराच्या विस्तृत प्राकारात काही कोरीव शिल्पकलेचे अवशेष विखुरले आहेत मदिराला जोडून नदीची मडपी आहे मदिराची उची सुमारे चार मीटर आहे व त्यावर कोरीव कामाने नटलेले पाचसहा मीटर उचीचे शिखरही आहे मदिराचे नदीच्या विरुद्ध दिशेचे प्रवेशद्वार थेट बुद्धगयेच्या मदिराच्या प्रवेशद्वारासारखे आहे. आधारखाब आणि छतावर भरपूर कोरीव काम, यक्ष-किन्नराच्या मूर्ती, पुराणातील प्रसग याची लयलूट आहे अधिक लक्ष वेधून घेते ती समुद्रमथनाची छतपट्टी, कीर्तिमुखे, नृत्यशिल्पे, छिद्रित कोनाडे अस बरच काही देखण आहे अनतेश्वर महादेवाच्या मदिरापासून थोड्या अतरावर एक पुष्करणी आहे 'विष्णुतीर्थ' तिचे नाव साधारणपणे दहा मीटर औरसचौरस असे हे तीर्थ चारही बाजूनी बाधून काढलेले आहे त्यात अनेक कोनाडेही आहेत प्रत्येकात एकेक मूर्तीही आहे एक शेषशायी विष्णूची, एक गणपतीची, एक देवीची अन् उरलेल्या, निरनिराळी आयुध धारण केलेल्या विष्णूच्या मूर्ती आहेत जवळच वीरगळाशी साधर्म्य असणारे काही कोरीव दगडही आहेत खुद्द पुष्कर्णीतील पाण्याला फारसा उपसा नाही, पण तरीही ते उत्तम स्थितीत आहे

दीड-दोन तासात गडाच्या माथ्यावर पोहचता येते त्याआधी सुमारे पधरा मीटर उचीचा एक कडा लागतो तो चढून जाण्यास एक लोखडी शिडी लावली आहे सुमारे आठ मीटर उचीच्या या शिडीच्या माथ्यावर पाच मीटर अतर कड्यात खोदलेल्या अरुद पायऱ्यावरून पार करावे लागते मग थोडी सपाटी व त्यानतर परत पायऱ्या त्यानतर एक गणपतीची कोरीव मूर्ती असणारा दरवाजा सामोरा येतो तेथून उजवीकडची वाट रत्नादेवीच्या गुहेत नेते, तर डावीकडची गडाच्या दुसऱ्या दरवाजाकडे जाते. या दुसऱ्या दरवाज्यावर मत्स्यावतार, हनुमान, सूर्य, मगर, वेताळ, गणपती, ऋद्धिसिध्दी यांच्या रेखीव मूर्ती आणि बरेचसे कोरीव काम आहे गडाच्या माथ्यावर जावयाच्या आधी खाली मोठे गवताळ पठार आहे तेथे अनेक टाकी, इमारतीचे भग्न अवशेष व राणीचा हुडा या नावाने ओळखला जाणारा गोल बुरूज आहे. गडाच्या कातळ माथ्याभोवती प्रदक्षिणा घालता येते त्या प्रदक्षिणावाटेवरच रतनवाडीकडील दरवाज्यांची दुक्कल, कोकण दरवाजा अन् त्रिबक दरवाजा ऊर्फ साम्प्रत गावाकडील दरवाज्याची जोडगोळी आहे

गडाला एक आरपार छिद्र किंवा नेढ आहे. दीडदोन मीटर उंचीच अन् चारपाच मीटर रुंदीच हे नेढ नैसर्गिक आहे तेथून भंडारदरा जलाशय, पाबरगड, अलंगगड, मदनगड, कुलंगगड, आवढागड, पट्टा ऊर्फविश्रामगड, बितनगड, चदेरीम्हसमाळ, मलगगड असा बराच मोठा परिसर न्याहाळता येतो.

इंग्रजाचे राज्य येण्यापूर्वी रतनगड या दुर्गम स्थानाला फार महत्त्व होत. राजूर, अलंग हे घाटमाथ्यावरचे अन् सोकुली, वाडी व जुरुस्त्रोशी हे कोकणातले महाल रतनगडाच्या आधिपत्याखाली होते अलग, मदन, कुलग ही दुर्गत्रयीदेखील रतनगडच्या अधिकाऱ्याच्या आधिपत्याखाली होती

कॅप्टन गोडार्डने या किल्ल्यावर १८२० मध्ये प्रत्यक्ष ताबा मिळवून तेथेच तळ ठोकला. पण पुढे त्याचा मुक्काम हलताच पूर्वीचा किल्लेदार गोविंदराव याने रामजी भागऱ्याच्या नेतृत्वाखालील उठावात या किल्ल्याचा ताबा घेतला अर्थात हा ताबा फार काळ टिकला नाही

रतनवाडीपासून जवळच पुढे घाटमाथ्यावर घाटघर नावाचे गाव आहे ते या घाटमाथ्यावरील शेवटचे गाव तेथून पायवाटेने ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात उतरता येते. घाटावरून डोळखांब पठाराचा प्रदेशही नयनमनोहर दिसतो. घाटघर गावाजवळ चागली जागा शोधून इंग्रजानी थड हवेसाठी ६०-७० वर्षांपूर्वी एक बगला बाधलेला आहे ही वास्तू आता मोडकळीला आलेली आहे. हा परिसर निसर्गरम्य व मनाला प्रसन्न करणारा आहे या परिसरात ठाकर जमातीचे आदिवासी राहतात हे लोक अत्यत गरीब, साधे भोळे, आदरातिथ्यप्रिय आहेत भंडारदरा धरणामुळे त्याचे मूळ जीवन उद्‌ध्वस्त झालेले आहे त्याची गाणी, त्याची नृत्ये, त्यांचे खेळ हे पाहण्यासारखे आहेत आधुनिक जगातील सुधारणा त्याच्यापर्यंत अद्याप पोहचलेल्या नाहीत त्यामुळे त्याचे पारपरिक जीवनही फारसे बदलले नाही. त्यांची मुले आता शाळेत जाऊ लागली आहेत व तेही आता हिम्मत धरून बोलू लागले आहेत त्याच्यासाठी शासनाने तिथे आश्रमशाळाही काढलेली आहे

भंडारदरा धरणाच्या पलीकडील डोगरमाथ्याचा भाग थेट बारीच्या घाटापर्यंत पुढे सरकला आहे बारीच्या घाटातून नासिक जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी पश्चिमेला बारीगाव लागते त्या गावाशेजारी उच शिखर दिसते तेच कळसूबाईचे प्रसिद्ध शिखर कळसूबाई म्हणजे महाराष्ट्राचे एव्हरेस्ट सह्याद्री पर्वतातील ते सर्वोच्च शिखर १६४६ मीटर उंचीच्या कळसूबाई शिखरावर बारीगावाहून जाणे

सोयीचे आणि सोपे आहे. अदमासे ९०० मीटर अनेक टप्प्यांची चढाई करून शिखरावर पोहचता येते.

कळसूबाईवर जायला जरा लांबून दक्षिणेकडून जाणारी गुराची वाट, पूर्वेकडून नेहमीची साखळदडाची वाट आणि त्याच बाजूने पण फारशी परिचित नसलेली गोटीची वाट तसेच शिखराच्या उत्तरेडून इदोर गावातून येणारी वाट अशा अनेक वाटा आहेत

१८६० साली 'आर्चडीकन गेल' या इग्रजाने रात्री डोंगर चढून शिखरावर पदन्यास केला पण पहाटे येथून दिसलेल्या सूर्योदयाने प्रभावित होऊन त्याने 'दि किग ऑफ दि डेक्कन हिल्स' असे शिफारसपत्र शिखराला देऊन टाकले कळसूबाईच्या चहूबाजूना नजर फिरविली तर स्वच्छ वातावरणात अनेक डोंगरशिखरे अन् गडकिल्ले दिसतात उत्तरेस आहेत रामसेज आणि देहेर, त्याच्यामागील रागेत अचला, अहिवत, सप्तशृग, मार्कडा, रवळ्या-जवळ्या, धोडप, राजदेहेर, कोळधेर, चादवड ही सातमाळ्याची दुर्गसाखळी गुफलेली आहे ईशान्येस बितनगड, औंढा, आड, पट्टा ऊर्फ विश्रामगड दिसतात त्यापलीकडे आहेत अणकाई-टणकाईचे जुळे दुर्ग. पूर्वेस विस्तीर्ण मुलुख दिसतो दक्षिण दिशेला भडारदरा धरणाच्या अवतीभवती पाबर, रतनगड, हरिश्चद्रगड विसावले आहेत. पश्चिमेस अलग, मदन, कुलग हे दुर्गम दुर्ग आणि दूर कोकणात असणारे माहुली, माथेरान, पेब ऊर्फ विकटगड आहेत

या शिखराच्या नावामागे एक दतकथा प्रचलित आहे फार प्राचीन काळी कळसू नावाची महादेव कोळ्याची मुलगी पायथ्याच्या इदुरी गावात रहात होती ती अनाथ असल्याने इदुरी गावात एका शेतकऱ्याकडे कामाला राहिली परतु केर, भाडीकुडी घासण्याचे काम न सागण्याची बोली तिने मान्य करून घेतली होती. कुणीतरी ह्या अटी मोडण्यासाठी तिच्यावर खूप दडपण आणले आणि त्यामुळे रागावून ती काम सोडून निघून गेली तिला जिथे भाडी घासायला लावली ती जागा 'थाळमेळ' आणि केर काढायला लावली ती जागा 'काळदरा' या नावाने परिचित आहेत. सन्यस्त वृत्तीने राहणाऱ्या या कळसूने आपला देह जेथे त्यागला त्या शिखरालाच लोक पुढे कळसूबाई म्हणू लागले. तिचे एक छोटेसे मदिरही तिथे बांधले आहे. तेराव्या शतकात बाबाजी नावाच्या महादेव कोळयाकडे या डोंगराची व्यवस्था होती

शिखर माथ्याखालच्या टप्प्यावर एक छोटेखानी विहीर आहे. नुकतेच त्याजवळ एक पत्र्याचे खोपटेही उभारले आहे स्वर्शिया डिकसाटा म्हणजे पाढरी कवडी ही सोळाशे मीटर उचीवर वाढणारी वनस्पती इथे मिळते तिचा उपयोग कर्णरोगावर केला जातो असे म्हणतात केस्ट्रल, इडियन रॉबीन, भारद्वाज, रेड व्हेटेड बुलबुल, सातभाई, बगळे असे काही पक्षी या परिसरातील डोंगरटेकड्यात आढळतात

कळसूबाईच्या रागेत नासिक जिल्ह्यातील दीड हजार मीटर उचीपेक्षा जास्त उचीचे तीन किल्ल्याचे एक त्रिकूट त्रिशूळासारखे आकाशात झेपावले आहे ते अलगगड, कुलगगड आणि मदनगड किल्ले नगर आणि नासिकच्या बरोबर सीमारेषेवर हे दुर्ग उभे आहेत त्यावरील गुहा, तेथील टाकी यावरून ते फार फार प्राचीन गड असावेत सन १८१८ मध्ये कार्ल मॅकडॉवेलने आपल्या अधिकाऱ्याच्या सहाय्याने या किल्ल्याच्या पायऱ्यावर तोफा डागून, सुरुग लावून त्या नष्ट करून टाकल्या किल्ल्यावर एका प्रचड इमारतीचे अवशेष मोठ्या दिमाखाने अजूनही ताठ उभे हेते आता त्याची पडझड झालेली आहे दहा टाक्याचे कोडाळे मोठे लोभसवाणे होते गडाच्या माथ्यावरून पश्चिमेकडे आवढा, पट्टा (विश्रामगड) अन् बितनगड, तर उत्तरेकडे हरीष, त्रिंबक, अजनेरी आणि पूर्वेकडे सिधगड साकोरचे पठार लक्ष वेधून घेते

या परिसराला लागून उत्तरेकडे त्र्यबकगड आहे. हा गड गोदावरीच्या उगमाजवळ आहे. येथे श्रीक्षेत्र त्र्यबकेश्वर आहे त्यामागे ब्रह्मगिरी किंवा ब्रह्मशैल उभा आहे गडाच्या दरवाजाकडे जाणारी अरुद वाट, दगडी प्रवेशद्वारे व जिने ही या गडाची वैशिष्ट्ये आहेत गडमाथा पायथ्यापासून खूप उच पण शेवटचा टप्पा कातळ भितीचा आहे तो १५० मीटर उचीचा आहे. वर सपाटी अशी नाहीच पण तो किलोमीटरभर लाबीचा माथा गगाद्वार व कुशावर्त तीर्थ याना सामावून घेतो समुद्रसपाटीपासून १२९५ मीटर उचीचा दुर्गमाथा ५ शिखरांचा आहे. येथून पश्चिमेकडे हरीष, भास्कर, पूर्वेला नाशिक, उत्तरेला वाघेरा, दक्षिणेला मात्र कावनई, त्रिगतवाडी, कळसूबाई, कुलग-मदन-अलग, बितनगड, औंढा, पट्टा म्हणजे विश्रामगड अशी राग दिसते गडमाथ्याच्या पूर्व भागात ऐतिहासिक अवशेष तर पश्चिम भागात गोदातीर्थ व गौमती गगेचा उगम आहे. गडाचा उत्तर भाग दुर्गभडार या नावाने ओळखला जातो देवगिरीचा सम्राट रामचद्रदेव यादवाने

हा किल्ला जिंकल्याची नोंद आढळते १६२९ च्या सुमारास शहाजी राजानी केलेल्या उठावात त्र्यबकगड ते जुन्नर हा प्रदेश त्याच्या प्रत्यक्ष ताब्यात आला होता १८१७ च्या लढाईत दुसऱ्या बाजीरावाकडून हा किल्ला इग्रजानी मिळवला १६२९ ते १६३६ हा शहाजी राजाचा कालखड सोडला तर परक्याच्या अमलाखाली हा किल्ला होता १६७२ इ. स मध्ये तो मोरोपतानी जिंकून घेतला १६८२ मध्ये त्यावर पुन्हा मोगलाचा अमल सुरू झाला १७५१ मध्ये त्रिंबक सूर्याजी प्रभू यानी भेदनीतीने हा किल्ला बाळाजी बाजीराव प्रधान याच्या आज्ञेवरून घेतला १८५७ मध्ये महादेव कोळी व ठाकर लोकांनी इथला खजिना लुटला त्याना चिथावणी दिल्याच्या आरोपावरून वासुदेव भगवत जोगळेकर याना ब्रिटिशानी मृत्युदडाची शिक्षा दिली.

२२ एप्रिल १८१८ रोजी कर्नल मॅकडॉवेलने त्र्यबकगड ऊर्फश्रीगड घेण्याचा प्रयत्न केला त्यात त्याला अपयश आले पण २४ एप्रिल १८१८ रोजी प्रखर हल्ल्यामुळे गडकऱ्याना किल्ला गमवावा लागला त्या लढ्यात हत्तीद्वारात १३ युरोपियन व इतर चार लोकाना मरण पत्करावे लागले

नासिक जिल्ह्याच्या मधोमध सुरगाण्यापासून चादवडपर्यंत एक लाबच लाब राग पसरली आहे. शिवशाहीपासून ते अगदी पेशवाई अखेरपर्यंत अनेक घडामोडी या परिसरात घडल्या आहेत अचला, अहिवत, सप्तशृग, मार्कडा, कान्हिरा, रवळ्याजवळ्या, घोडप, कचना उर्फ कांचन, कोळधैर, इद्रई, चादवड अशी अपरिचित दुर्गमालिका याच डोगरात गुफली आहे

कडवा नदी कळसूबाईच्या डोंगरावर उगम पावते व शेणीतजवळ दारजेला येऊन मिळते दारणानदी बाहुलीच्या डोंगरावर उगम पावते या परिसरतील तिसरी नदी वैतरणा वैतरणेवर धरण बाधून धरणाचे पाणी मुबईला पुरविले जाते शिवाय वैतरणेवर वीजउत्पादनही केले जाते श्रीसमर्थ रामदास स्वामींनी स्थापन केलेल्या ११ मारुतीपैकी १ मारुती आबेवाडीजवळील कुरुग किल्ल्यावर आहे या परिसरात कावने किल्ला प्रसिद्ध आहे इगतपुरी तालुक्याचे पूर्वीचे नाव कावणे तालुका असेच होते.

*

फिरोजशाही ग्रथांत लिहिले आहे तेच किल्ले पुढे यादव राजघराण्याच्या ताब्यात आले इ सन १३२० मध्ये हे किल्ले मानदेवाच्या ताब्यात होते असा स्पष्ट उल्लेख 'ऐने अकबरी'त लिहिलेला आहे असे इतिहासतज्ज्ञ सागतात हे किल्ले अतिशय भक्कम व अवघड असून शत्रूना त्यावर कधीच सहजासहजी चाल करता आलेली नाही १२ वर्षे या किल्ल्यावरून अनेकानी मोगलाशी निकराने लढा दिला त्यामुळे येथे कोणाचा शिरकाव झाला नाही मुल्हेरचा किल्ला जेव्हा पडला तेव्हा निरसे आणि अखेरचे मराठ्याचे युद्ध सपले आणि अखेर इग्रजानी या किल्ल्याचा ताबा घेतला

नोव्हेंबर १६७० मध्ये बहादूरपूरवर शिवाजी महाराजानी यशस्वी मोहीम केल्याची बातमी कळताच चवताळलेला दाऊदखान कुरेशी दर्यापूरहून धावत आला परतु त्याचा पराभव करून साल्हेरचे परशुरामाचे स्थान महाराजानी मुक्त केले जिकलेले पृथ्वीचे दान दिल्यावर स्वत साठी सागराला मागे हटवून अपरात निर्माण करण्यासाठी श्री परशुरामानी बाण सोडला तो येथूनच, अशी आख्यायिका आहे साल्हेरवरून कोकणाकडे दृष्टी टाकल्यास समोरच्या डोगरास असलेले आरपार छिद्र हा त्या बाणाचाच प्रताप, असे तेथील स्थानिक रहिवासी सागतात परशुरामाच्या मातेचे– रेणुका देवीचे देऊळही जवळच आहे.

दीड कि मी लाब अन् १ कि मी रुदीच्या या गडाचा पश्चिमेकडील शैलकडा हरिश्चद्र गडाच्या कोकणकड्याची आठवण करून देतो याशिवाय गडावरील महत्त्वाचे स्थान म्हणजे गगासागर तलाव बडोद्याच्या गायकवाड सरकारच्या गादीमुळे ओळखल्या जाणाऱ्या गादी-पठारावर सुबक बाधणीचा अन् विस्तीर्ण अमा जलाशय म्हणजे गगासागर हिरवट छटा असणाऱ्या या पाण्याचा रग दर बारा वर्षांनी दुधी होतो. त्या वेळेस प्रत्यक्ष गगामाई तेथे अवतरली असे समजून तेथे भली मोठी जत्रा भरते

पृथ्वीदानासाठी श्रीपरशुरामाने केलेल्या यज्ञभूमीचे दर्शन आपणास गगासागराजवळील यज्ञकुड व यज्ञस्तभ यामुळे घडते

पूर्वेकडील मोरा, पश्चिमेकडील हरगड अन् मधला मुल्हेर असे हे खरे त्रिकूट आहे खुद्द मुल्हेरचे पायथ्याचा मुल्हेरमाची व वरचा बालेकिल्ला असे दोन स्वतत्र भाग आहेत

सिहगडावरील देवटाक्याच्या चवदार पाण्याशी स्पर्धा करणारा येथील मोती

# १०. साल्हेर-मुल्हेरचा ऐतिहासिक प्रदेश

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर पठारी प्रदेश भीमाशकरपासून सुरू होऊन थेट त्र्यबकेश्वरपर्यंत पसरला आहे. या पठारी प्रदेशात भीमाशकर (३४४४ फूट), जीवधन, दवड्या, हरिश्चद्रगड (४६९१ फूट), रतनगड, कळसूबाई (५४२७ फूट),त्र्यबकेश्वर, टाकेज, धोडप (४७६१ फूट) इत्यादी उच उच शिखरे आहेत ह्या शिखराच्या पूर्व-पश्चिम भागात भीमाशकर घाट, आवफे घाट, अबोली घाट, नाणेघाट, माळशेजघाट, पळूचा घाट, निसणीघाट, साद्रेघाट, चोढेमेंढेघाट, पिंपरी घाट, तळघाट, कसारा घाट. गोंदेघाट इत्यादी घाट रस्त्यानी रायगड जिल्ह्यातील कर्जत व ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर, मोखाडा इत्यादी तालुक्याना जोडलेला आहे. हरिश्चद्र गडापासून पश्चिमेकडे फुटलेली सह्याद्री शाखा अकोलनेरनजीक पठारात विलीन होते व जेऊरनजीक पुन्हा वर डोके काढते

नासिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात सह्याद्रीच्या सातमाळा पर्वतशाखांचा प्रारभ होतो. सातमाळा शाखेची चदूर शाखा हातगडापासून मनमाडपर्यत सरळ पसरलेली आहे घोडप हे ४६७१ फूट उचीचे शिखर या श्रेणीमध्ये येते. सप्तश्रृगीचे स्थानही याच श्रेणीत असून अनेक डोंगरी किल्ले या भागात आहेत त्र्यबकेश्वर ते बागलाण प्रातापर्यंत छोटे-मोठे ६३ किल्ले किंवा लढाऊ डोंगर असून त्यांच्या आश्रयाने पूर्वकाळपासून आदिवासी लोक राहत आहेत. चादूरचा प्राचीन किल्ला याच रांगेत असून तो अतिप्राचीन किल्ल्यांपैकी एक आहे तो किल्ला शतकवहान राजाने बाधला असावा इतपत मानण्याएवढा पुरावा या भागातल्या काही शिलालेखावरून व लेण्यावरून दिसून येतो. नासिक जिल्ह्याच्या वायव्य कोपऱ्यात साल्हेर (५२६३ फूट), मुल्हेर (४२७५ फूट) व हातगड हे किल्ले आहेत. त्याच्याभोवती डोगराची जणू निरगाठ आहे. पाडवांनी हे किल्ले बांधले अशी ह्या किल्ल्यासबधी दतकथा सागितली जाते. कोणतीही प्राचीन कलाकृती पाडवकालीन मानण्याची प्रथा या भागात प्रचलित आहे. परतु हे किल्ले शतकवाहनाच्या काली मयूरध्वज व ताम्रध्वज या भावांच्या ताब्यात होते असे

फिरोजशाही ग्रथात लिहिले आहे तेच किल्ले पुढे यादव राजघराण्याच्या ताब्यात आले इ सन १३२० मध्ये हे किल्ले मानदेवाच्या ताब्यात होते असा स्पष्ट उल्लेख 'ऐने अकबरी'त लिहिलेला आहे असे इतिहासतज्ज्ञ सागतात हे किल्ले अतिशय भक्कम व अवघड असून शत्रूना त्यावर कधीच सहजासहजी चाल करता आलेली नाही १२ वर्षे या किल्ल्यावरून अनेकानी मोगलाशी निकराने लढा दिला. त्यामुळे येथे कोणाचा शिरकाव झाला नाही मुल्हेरचा किल्ला जेव्हा पडला तेव्हा निरसे आणि अखेरचे मराठ्याचे युद्ध सपले आणि अखेर इग्रजानी या किल्ल्याचा ताबा घेतला

नोव्हेबर १६७० मध्ये बहादूरपूरवर शिवाजी महाराजानी यशस्वी मोहीम केल्याची बातमी कळताच चवताळलेला दाऊदखान कुरेशी दर्यापूरहून धावत आला परतु त्याचा पराभव करून साल्हेरचे परशुरामाचे स्थान महाराजानी मुक्त केले जिकलले पृथ्वीचे दान दिल्यावर स्वत साठी सागराला मागे हटवून अपरात निर्माण करण्यासाठी श्री परशुरामानी बाण सोडला तो येथूनच, अशी आख्यायिका आहे साल्हेरवरून कोकणाकडे दृष्टी टाकल्यास समोरच्या डोगरास असलेले आरपार छिद्र हा त्या बाणाचाच प्रताप, असे तेथील स्थानिक रहिवासी सागतात परशुरामाच्या मातेचे- रेणुका देवीचे देऊळही जवळच आहे

दीड कि मी लाब अन् १ कि मी रुदीच्या या गडाचा पश्चिमेकडील शैलकडा हरिश्चद्र गडाच्या कोकणकड्याची आठवण करून देतो याशिवाय गडावरील महत्त्वाचे स्थान म्हणजे गगासागर तलाव बडोद्याच्या गायकवाड सरकारच्या गादीमुळे ओळखल्या जाणाऱ्या गादी-पठारावर सुबक बाधणीचा अन् विस्तीर्ण असा जलाशय म्हणजे गगासागर हिरवट छटा असणाऱ्या या पाण्याचा रग दर बारा वर्षांनी दुधी होतो त्या वेळेस प्रत्यक्ष गगामाई तेथे अवतरली असे समजून तेथे भली मोठी जत्रा भरते

पृथ्वीदानासाठी श्रीपरशुरामाने केलेल्या यज्ञभूमीचे दर्शन आपणास गगासागराजवळील यज्ञकुड व यज्ञस्तभ यामुळे घडते

पूर्वेकडील मोरा, पश्चिमेकडील हरगड अन् मधला मुल्हेर असे हे खरे त्रिकूट आहे खुद्द मुल्हेरचे पायथ्याचा मुल्हेरमाची व वरचा बालेकिल्ला असे दोन स्वतत्र भाग आहेत

सिंहगडावरील देवटाक्याच्या चवदार पाण्याशी स्पर्धा करणारा येथील मोती

तलाव, सुबक बांधणाचा चंदनबावडी ही विहीर, श्रीराम, सोमेश्वर व गणपती यांची उत्तम मंदिरे, प्राचीन संपन्नतेच्या खुणा दाखवणारा (आता ढासळलेला) विस्तीर्ण राजवाडा अशा कितीतरी प्रेक्षणीय वास्तू मुल्हेरच्या माचीवर आजही दृष्टीस पडतात. मुल्हेर माचीवरील या राजवाड्याजवळ उंबराच्या झाडाखाली आपणास एक चिणलेला दरवाजा आढळतो

मुल्हेरच्या वरच्या किल्ल्यावर– बालेकिल्ल्यावर जाण्यास पूर्वेकडून व पश्चिमेकडून वाटा आहेत. गडावर 'भडगनाथ' हे नाथ पंथियाचे एक मंदिर आहे बराच झिजलेला परंतु अक्षरे सुस्थितीत असलेला एक शिलालेख तिथे आहे.

१८१८ च्या शेवटच्या मराठे-इंग्रज युद्धानंतरही काही वर्षे या किल्ल्यावर चार प्रचंड तोफा असल्याचे उल्लेख आढळतात. फत्तेलष्कर, रामप्रसाद, शिवप्रसाद व मार्कंडेय अशी त्यांची नावेही होती पैकी शेवटची ब्रिटिशांनी वितळवली. [illegible] नाही

मुल्हेरच्या डाव्या-उजव्या अंगाला उभे राहून शत्रूवर पाळत ठेवणारे मोरा व हरगड हे किल्लेदेखील मुल्हेरप्रमाणेच बेवारस झाले आहेत मोरा किल्ल्यावर गणपती, हनुमान व महादेवाची उद्ध्वस्त मंदिरे, काही टाकी, छोटेखानी तळे, पडिक तटबंदी व दारूखान्याची इमारत आहे वर जावयाचा रस्ता खडकात खोदून काढलेला आहे मोरा किल्ला मुल्हेरपेक्षा उंचीने अधिक हरगडाचा वर जाण्याचा रस्ता तेथील माहीतगाराखेरीज सापडू शकत नाही

नाशिकहून मुल्हेरला जाणाऱ्या (सटाणामार्गे) गाडीने मुल्हेरला येऊन मोरा-मुल्हेर-हरगड या त्रिकुटाचे दर्शन घेता येते मुल्हेरपासून जवळच असलेल्या मांगी-तुंगी या आवळ्या-जावळ्या जैन शैलशिल्पाचे मंदिरही पाहता येते. रात्री वाघांबे येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी साल्हेर या, महाराष्ट्रातील, उंचीने दुसऱ्या क्रमांकाच्या स्थानाकडे जाता येते वाघांबे खिंडीतून वर चढल्यावर डावीकडे असलेल्या सालुता किल्ल्याचे दर्शन होते सुरती पोळ मार्गानेही साल्हेरच्या गादी पठारावर जाता येते

किल्ल्याच्याप्रमाणेच लेण्यामध्येही या भागाचा भरीवपणा दिसून येतो नासिक येथील पांडव लेणी प्रसिद्ध आहेत ह्या लेण्यांवर वैदिक धर्माची जशी छाप दिसून येते, त्याचप्रमाणे बौद्ध व जैन धर्मीयांचाही उल्लेख आढळतो. नासिक परिसरातील लेण्यांचे प्रामुख्याने दोन गट पडतात. उत्तरेकडील चांभारलेणी जैन

शाखेतील असून त्यात चार लेणी प्रमुख आहेत त्यामध्ये एकही शिलालेख आढळत नाही ह्या लेणी ११व्या शतकात कोरल्या असाव्यात असा अदाज आहे दुसरा भाग दक्षिणेकडील लेण्याचा त्यात प्रमुख २४ लेणी व २७ शिलालेख आहेत. ह्या लेण्याचे खाब इराणी धर्तीचे व षटकोनी असून स्तभाच्या दरम्यानची जागा मोकळी आहे खोदीव व कोरीव काम त्यावर आढळते महादेवी बालश्री लेखही लेण्यामध्ये दिसून येतात शालीवाहन कुलातील दुसरा राजा कृष्ण याच्या अमदानीत श्रमणमहात्माने ह्या लेणी खोदविल्या शालीवाहन साम्राज्याचा सस्थापक सिमुक याचा कृष्ण हा धाकटा भाऊ यावरून क्षत्रपाच्या महाराष्ट्रातील राज्याचे जुन्नर व नासिक हे दोन भाग असावेत सध्याचा माहुलीचा डोंगर हा त्रिकुट असावा आठव्या शतकाच्या प्रारभी हरिश्चद्रवशीय भोगशक्ती याने दिलेल्या अजणेरी ताम्रपटात पूर्व त्रिकूट नामक भूभाग सागितलेला आहे तो नासिक जिल्ह्याच्या डोगराळ भागाला लागून असणारा भाग असावा

सह्याद्रीच्या ह्या मावळी प्रदेशाचे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे सह्याद्रीने येथे असख्य जलदेवताना जन्म दिला प्रवरा, दारणा, वैतरणा, गोदा यानी हा प्रदेश सुजलाम् सुफलाम् केला आहे सह्याद्रीने डोंगरपठारावर अनेक किल्ले निर्माण केले कोरीव लेण्याची सुदर मालिका उभी केली या शिल्पकलेचा अभिजात ठेवा हजारो वर्षे सह्याद्री पर्वताने आपल्या कुशीत जपून ठेवला आहे ढाक, अमरकटक, कळसूबाई, हरिश्चद्रगड, घोडप सारखी उत्तुग शिखरे सह्याद्रीवर विराजमान झालेली आहेत

साल्हेर व मुल्हेरवरून अचला, अहिवत, सप्तशृग, मार्कंड, रवळ्या, जावळ्या, घोडप, कचना, कोल धैर, राजधैर, इद्राई, चादवड अशी किल्ल्याची लाबच लाब साखळी, अकाई-टकाई, रामसेज असे अनेक किल्ले या परिसरात सहज दृष्टीस पडतात बागलाणमधील या किल्ल्याना भेट दिल्यावर तेथील इतिहासाचे स्फूर्तिदायी स्मरण होते.

*

# ११. 'ज्ञानेश्वर-तुकारामांची भक्तिभूमी'

सह्याद्रीच्या मावळांनी महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने मोठे केले आहे. येथील तीर्थक्षेत्रांनी, आणि ज्योतिर्लिंगांनी व अष्टविनायक स्थानांनी महाराष्ट्र भूमीला पुनीत केले आहे सह्याद्रीचा मावळी प्रदेश हा शिवतीर्थाचे अमृतकुंड ठरला आहे. उभ्या सह्याद्रीवर शिवाची कैलासे वसली आहेत शंकर त्याचा स्वामी आहे तेथून प्रखर वाणीचा, भावभक्तीचा व प्रचंड शक्तीचा पुरवठा आजतागायत महाराष्ट्राला होत आहे सह्याद्रीच्या मावळांनी वीरश्रीचा आणि वाणीचा डंका साऱ्या भारतभूमीवर गाजविला सह्याद्री पर्वताने असंख्य परंपरा जगविल्या आहेत इतिहासकाळात तलवार गाजविली सरंजामशाहीविरुद्ध लढा दिला. सह्याद्रीच्या मावळाचा खरा स्वभावधर्म गुलामगिरीविरुद्ध लढा, भाडवलशाहीविरुद्ध व सावकारशाहीविरुद्ध बंड, अन्याय आणि अत्याचाराची चीड, नारीची प्रतिष्ठा, 'आधी लगीन कोंडाण्याचे मग लगीन रायबाचे' ही वीराची त्यागी वृत्ती तर 'बचेंगे तो औरभी लढेंगे'. ही वीरवाणी, 'भले तरी देऊ कासेची लंगोटी, नाठाळाचे माथी देऊ काठी' ही भलीवृत्ती आणि 'अमृताबरोबर पैजा जिंकणारी माझी मराठी बोली', ही स्वभाषेची प्रतिष्ठा या महाराष्ट्र धर्माच्या अष्टांगाला प्रकर्षाने जाणवते मावळाच्या मातीने महाराष्ट्रासाठी सारे काही दिले एका कवीच्या काव्यात त्याचा उल्लेख फार चांगल्या प्रकारे आला आहे

"या मातीने दिला वारसा
कठोर छाती दगडाची।
दिली नद्यांनी ध्येयासाठी
समर्थता बलिदानाची।
पहाड डोंगर जिथे सांगती
अजिंक्यता अभिमानाची"

अशा महानतेची ही सह्याद्रीची मावळे; गोदा, भीमा, कृष्णा, कोयना, प्रवरा, दारणा, वैतरणा, इंद्रायणी, इत्यादी नद्यांच्या उगमस्थानाचा हा परिसर गोदावरीचा परिसर हा गंगाथडी परिसर प्रभूरामचंद्राच्या पदस्पर्शाने पवित्र झाला आहे.

दडकारण्याचा हा भाग, ब्रह्मगिरी, त्र्यबकेश्वर, रामकुड आणि पचवटी ही पवित्र स्थळे गगाथडीच्या मावळानी महाराष्ट्राला दिली त्र्यबकेश्वर हे एक ज्योतिर्लिंग माऊलीचे गुरू निवृत्तिनाथ येथेच समाधिस्थ झाले. त्र्यबकेश्वर सताचे गुरुस्थान सताची थोर परपरा मावळाच्या वाट्याला आली आणि त्याची सुरुवात निवृत्तिनाथाने त्र्यबकेश्वर येथे केली भीमथडीच्या व कृष्णाकाठाच्या भाविकाच्या पालख्या भक्तिभावाने आजही निवृत्तिनाथाच्या यात्रेला नियमित येतात

भीमथडीचा ज्ञानेश्वर आणि देहूचा तुकोबाराय याची पवित्र तीर्थक्षेत्रे मावळातून वाहत येणाऱ्या इद्रायणी नदीच्या काठीच वसली आहेत तुकयाची देहू म्हणजे नाणेमावळाचे भक्तिमुख. ज्ञानेशाची आळदी इद्रायणीकाठी विराजमान झाली आहे आळदी हे मराठी सस्कृतीचे भक्ती आणि ज्ञानमुख

"माझ्या मऱ्हाठीची बोलु कवतुके।
परि अमृतातेहि पैजा जिंके।
ऐसि अक्षरे रसिके मेळवीन ।।

ज्ञानेशाची ही ईर्षा फळाला आली मराठीच्या नगरीत ब्रह्मविद्येचा सुकाळ झाला देशाची, धर्माची व भाषेची सेवा झाली वारकरी पथाची ध्वजा उभ्या महाराष्ट्रात फडकू लागली विठ्ठलाच्या राऊळात सतकवी जमा झाले भक्तिभावाचे आवे लुटले मराठीला उजाळा दिला अभगरचना केली आणि वारकरी पथाचे झाड लावून मावळामधून वाहत वाहत आलेल्या पवित्र इद्रायणीच्या काठी आळदीला ते समाधिस्थ झाले. मावळात जन्मलेला, वाढलेला तुकया याहीपुढे गेला त्यानी महाराष्ट्राच्या दारात भागवत धर्माचे मदिर उभे केले आणि ज्ञानदेवांनी रचलेल्या पायावर कळस चढविला. नाणे मावळ व पवनमावळात इद्रायणीच्या काठी देहू गावात तुकोबानी पढरी आणली वारकऱ्याची पताका महाराष्ट्राला दिसेल इतकी उच केली असख्य अभगरचना केली शब्दात मोती गुफले भावनेत प्रेम आणले करणीस निर्मळता आली वाणीस तेज आले आणि तुकोबाची वाणी रत्नाची खाण ठरली सद्भावनेचे हिरे-माणिक झाले.

सह्याद्रीच्या मावळामध्ये ज्ञानबा-तुकारामाच्या नावाने टाळाचा गजर अहोरात्र ऐकू येतो. या महान सतानी सह्याद्रीच्या मावळाना भक्तिभावाचे वेड लावले खाद्यावर भागवत आणि वारकरी पथाची पताका दिली पढरीचा महिमा वाढविला आणि आषाढी-कार्तिकीचा ओघ मावळामधून चद्रभागेच्या वाळवटात पुडलिकाच्या

भेटीसाठी उभा केला आबालवृद्धामध्ये भक्तिभाव निर्माण केला भाविकाच्या दिंड्या मावळातून आळंदी, देहू, पढरी आणि निवृत्तीला आषाढी-कार्तिकीला धावू लागल्या. सह्याद्रीच्या मावळ्याना वीरत्वाबरोबर भक्तिभाव, प्रेम आणि एकात्मभाव ह्या सात्विक भावभावना सतानी निर्माण केल्या

कृष्णाकाठ अगदीच निराळा । चाफळच्या खोऱ्यात रामदासानी दासबोध रचिला. सज्जनगडावर त्यानी समाधी घेतली साऱ्या महाराष्ट्राचा त्यानी प्रवास केला राष्ट्रीय वृत्ती, जोराचा बाणा आणि शक्तीचे महत्व गावागाव पटवून दिले मावळात गावोगाव शक्तिवर्धनासाठी मारुतीची देवळे स्थापन झाली चाफळ खोऱ्यातील या सतसमर्थांनी उभ्या महाराष्ट्राला ससार करून परमार्थ करण्याचा व्यवहारी मार्ग शिकविला दासबोधाचे बोधामृत सर्वांना वाटले शिवाजीमहाराजाचा स्फूर्तिदाता, राष्ट्रीय सत समर्थ रामदास चाफळच्या खोऱ्यात कृष्णा-कोयनेच्या काठी विराजमान झाले. महाराष्ट्रातील मावळांचे आजही ते मोठे श्रद्धास्थान आहे चैत्र शु ९ ला रामजन्माचा सोहळा ही समर्थांनी महाराष्ट्रास दिलेली महान देणगी आहे सतांनी मराठीला जीवाभावाने सांभाळले महाराष्ट्राचा सर्वत्र लौकिक केला स्वाभिमानाचा झेंडा जगभर मिरविला शुद्धशीलाचा स्वभावधर्म महाराष्ट्रातील मावळ्याच्या अगी रुजविला आणि महाराष्ट्राची महापूजा कायमची बाधली स्वाभिमानाने आपल्या भूमीबद्दल बोलायचा विडा उचलला

आजहि मावळ्यामध्ये सतांच्या भूतदयेचा, वाणीचा आणि विचाराचा प्रभाव दिसतो. मावळातील मडळी साधी, भोळी, गरीब असली तरी ती अभिमानी आहे सतांच्या शिकवणीवर व परमेश्वरभक्तीवर त्याचा विश्वास आहे. परमेश्वराघरी रुजू होणारा भक्तिभाव त्याना आवडतो हरिनामाचा गजर त्याची भक्ती उजळून काढतो मावळात सोमवारी, गुरुवारी हरिनामाचा जयघोष होतो हरिनामात मग्न व्हावे, स्वार्थापासून परमार्थाकडे जावे ही त्याची प्रवृत्ती आहे अतःकरणाच्या मथनातून निघालेले अमृत म्हणजे भक्तिभाव ईश्वराला शोधणारी ही मानवी भूक आहे मावळामध्ये वारकरी पथाचा प्रभाव आहे. पाऊस असो, थडी असो, [illegible] बाजूस ठेवून भाविक वारकरी पथाचा ध्वजा खाद्यावर घेतात 'ज्ञानबा तुकाराम' आणि हरिनामाचा गजर करत करत तीर्थस्थानी सताच्या आणि विठ्ठलाच्या भेटीसाठी जातात. त्रासाची आणि कष्टाची कोणी पर्वा करत नाही. हालअपेष्टा सहन करून लोक परमेश्वरभेटीचा सुख-सोहळा कधीही

वाया जाऊ देत नाहीत सध्या मावळामध्ये वारकरी सप्रदायाची प्रचार दिंडी 'दौरा पद्धती' ने प्रचलित आहे. त्या दौऱ्याद्वारे भजन-कीर्तन केले जाते. दौरा पद्धतीमुळे वारकरी पथाची मोठी शिष्यपरपरा वाढली आहे. वारकरी पथाने या भागामध्ये भक्तिपरपरा आणि सतप्रवृत्ती वाढविली

"जे का रजले गाजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ।।
तोचि साधू ओळखावा ।
देव तेथेचि जाणावा ।।
ज्यासि आपगिता नाही ।
त्यासि धरी जो हृदयी
तुका म्हणे सागो किती ।
त्यासि भगवताची मूर्ती ।।

या व अशा सतवचनाना सामाजिक रूप देऊन वारकरी पथाने सामाजिक शक्ती निर्माण केली आहे. वैयक्तिक पुण्यापेक्षा सामाजिक पुण्याची कल्पना पुढे येऊ लागली आहे. ज्ञानोबापासून विनोबापर्यंतच्या सतपरपरा मावळाच्या भूमीत निर्माण झाल्या आहेत.

मानवतेचे मगलस्तोत्र गाणारी अनेक समाजसेवक मडळीही मावळामध्ये निर्माण झाली त्यानी मराठी देशाला, भाषेला आणि माणसाला आपल्या लेखणीवाणीने आणि सेवेने पावन केले. सुमारे ७००-८०० वर्षांपासून होऊन गेलेल्या महान सतांचा अमोल ठेवा पिढ्यानपिढ्या मराठी जनतेने जतन केला आहे सतमडळी मराठी सस्कृतीचा अमोल ठेवा आहे तुकोबाचे समतेचे विचार उदात्त व उत्तुग आहेत. ते जितके भावपूर्ण तितकेच भेदक आहेत. त्याच्या वाणीमध्ये सहजसुदरता, मधुरता आणि भावपूर्णता आढळते पढरीचे माहात्म्य ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव आणि तुकोबानी वाढविले. काशीरामेश्वरात मतभेद फार, पण पढरी समतेची माऊली आहे पढरी मोक्षाची गगा आहे आर्थिक समतावादाचा मूळ प्रणेता सनेका ख्रिस्त ज्ञानेश्वराच्या समकालीन होऊन गेला त्याने समतावादी विचार सागताना म्हटले आहे की, "उपयोगी वस्तू समाजाच्या मालकीची केल्याशिवाय लोक सुखी होणार नाहीत". तुकाराम महाराजाना पारमार्थिक समाजवाद मांडला. मानवतेच्या मूल्यावर त्यांनी जास्त भर दिला. समाजवाद शेकडो वर्षांचा जुना आहे तुकारामाच्या गाथेतही

तो आढळतो रामदासानी महाराष्ट्राला नुसता भक्तिधर्म शिकवला नाही, देशधर्म, राष्ट्रधर्म व भक्तिधर्म याची सागड त्यानी घातली त्याच्या महाराष्ट्रधर्माचे मूळ देशप्रेम व देशाभिमान हेच आहे त्याच्यात शब्दात ते पुढीलप्रमाणे सागता येईल–

"मराठा तितुका मेळवावा ।
महाराष्ट्र धर्म वाढवावा ।"
वा
"धटाशी आणावा धट ।
उद्धटाशी पाहिजे उद्धट ।
खटनटाशी खटनट ।
अगत्य करी ।।"

आणि

"मरिता मरिता मरावे"
तेणे गतीस पावावे ।
फिरोनी येता भोगावे ।
महद्भाग्ये ।।

विठ्ठलाची पढरी महाराष्ट्र सस्कृतीचे धार्मिक विद्यापीठ बनले, तर किल्ले रायगड महाराष्ट्राचे राजकेंद्र झाले "पुडलिक वरदा हरि विठ्ठल" आणि "हरहर महादेव" अशा गर्जना समर्थांच्या आनदभवनात उठून पारतत्र्याचा नाश झाला आणि स्वराज्याचा सूर्य क्षितिजावर उगवला महाराष्ट्राला आध्यात्मिक अधिष्ठान जर लाभले नसते तर हिदवी स्वराज्याची मुहूर्तमेढ कधीच रोवली गेली नसती. या सतपरपरेमुळे, सामाजिक नीतीच्या आत्मोद्धाराच्या व आध्यात्मिक तत्त्वज्ञानामुळे मावळचे नीतिधैर्य आजही कायम आहे आणि कायम राहील असा विश्वास आहे.

*

# १२. सह्याद्रीच्या शाहीरी खुणा

[library stamp]

कोणतीही कला ही वाहत्या नदीसारखी असते लहानशा ओढ्याचे खळखळते पाणी जवळच्या नदीशी मिळून एकरूप होते समुदायासाठी खेळल्या जाणाऱ्या सर्व कला या अशाच पद्धतीने विशाल होत आल्या आहेत शाहीरी, पोवाड्याची परपरा व तमाशा ही महाराष्ट्रात जन्मलेली अस्सल मराठी कला आहे लावणी शब्दाच्या अर्थाचा वेधही 'लापनिका' या शब्दापर्यन्त जाऊन पोहोचतो पण लावणीचे घराणे भागवत कवीच्या विराण्या व गवळणी याच्याशीच सबधित असावे असे वाटते सामान्य जनापर्यन्त पोहचता पोहचता या गवळणी व विरहिण्या आध्यात्म विसरल्या असाव्यात. नाथाच्या गवळणी 'डोळे मोडीत राधा चाले' या चालीवर चालत आल्या आहेत यावरून त्याचे स्वरूप स्पष्ट होते

शाहीरीसबधी जुना उल्लेख शके ११००च्या सुमारास सापडतो. त्यानतर त्याचा उल्लेख शहाजीच्या काळापर्यन्त सापडत नाही पण शिवाजीच्या काळापासून शाहीरी बाणा प्रामुख्याने दिसून येतो प्रत्येक मराठी सरदाराच्या पदरी त्याचे गुणगान गाण्यासाठी 'भाट किवा शाहीर' असत शहाजीराजावर रचलेल्या एका मराठी कवितेत 'आरे शाहीरा जा' असा उल्लेख आढळतो. त्या काळी शिवाजी महाराजानी शाहीराना राजाश्रय दिला होता तीच परपरा आजपर्यन्तच्या अनेक सस्थानिक घराण्यात दिसत होती मराठ्याची खरी गाणी म्हणून ओळखली जाणारी कविता शिवकालात प्रथम जन्माला आली. तलवारीच्या खणखणाटात, घोड्याच्या टापाच्या आवाजात, ढोलकी, सबळ व डफ इत्यादी वाद्याच्या तालात काव्य गाणारा नवा वर्ग निर्माण झाला व पोवाडे हा काव्यप्रकार रूढ झाला

सर्वांत जुना पोवाडा गाणारा व कवनकर्ता शाहीर अज्ञानदास ओळखला जातो 'अफझलखानाचा वध' हा पोवाडा त्याने रचून शिवाजी महाराजाकडून एक घोडा व चादीचा कडा बक्षीस मिळविला त्याने प्रथम गणाला, शारदेला नमन करून शिवाजीराजे, जिजाईला नमन केले आहे. त्या पोवाड्यात किल्ल्यांची वर्णने व अफझलखानाच्या वधाचे वर्णन यथोचितपणे केले आहे पोवाड्यातील काही

ओळीवरून हे स्पष्ट होते

"गड आहे रोहडा ।
जावळी प्रतापगडमंडन ।
मकरदगड वाझोट ।
सिंहगडवृंदावन ।
पुरंदरचे चांगुलपण ।
सोन्याची सुवेळा आहे.
राजगड संगिण ।
कोंडाण्यापासून तोरणवार्ता ।
कोरेखाली घाटमाथा ।
तुंग आणि तिकोना
विसापूर लोहगड झुलता ।
गडराहेरीची व्यवस्था ।
तीन पायऱ्या सोन्याचा तक्ता ।
दुसरा प्रतापगड पाहता ।
अवघड दिसे घाट माथा ।।"

यानंतर मावळ प्रांतात उदयाला आलेला दुसरा शाहीर तुलशीदास त्याने 'तानाजी मालुसरा' हा पोवाडा लिहून गायला, त्याबद्दल त्याला एक शेर वजनाचा तोडा ब [illegible] मिळाला त्याच पोवाड्यामध्ये .'बारा मावळे पुण्याखाली । बारा मावळे जुन्नरख [illegible]' असा उल्लेख आहे पोवाड्यामध्ये तानाजीचे व शेलारमामाचे वर्णन केले असून त्या वेळच्या हालचालींवर शाहिराने प्रकाश टाकला आहे

"माझ्या शेलार तू मामा ।
आली सिंहगडाची कामगिरी ।।"
"लाखोटा हातात घेतला ।
ज्याने एका लखोट्याचे बारा बारा लखोटे केले ।।"
"धाडीले कागददोऱ्याला ।
मोठमोठ्या सरदाराला ।।"

असा उल्लेख आहे

त्या काळी मराठा सरदारावर शिवाजीराजाचे वजन होते. सरदारामध्ये देखील

शिवाजीमहाराजाना मदत करण्याची कार्यतत्परता होती हा लखोटा १२ हजार फौजेला पोहोचल्यावर दसपटीचे मोकाशी, उमरठ्याचे शिरके, नदविचे सावत, वडघरचे नाईक, सिलमयाचे ठाकूर इ सरदार तानाजीला मदतीस धावून आले सिहगडचे वर्णनही शाहीराने केलेले आहे हा गड त्रिकोणी असून त्यात १८०० पठाण आहेत किल्ल्याची लाबी दीड मैल आहे किल्लेदार उदयभानू बलवान आहे. दीड गाय, दीड शेळी व सव्वामण तादळाचे त्याचे भोजन आहे क्षणात जो पहार वाकवितो, इत्यादी माहिती काव्यामध्ये दिली आहे व शेवटी 'शूरमर्दाचा पोवाड शूर मर्दानी ऐकावा' असा मार्मिक शेरा मारलेला आहे

या शाहीरानतर पुणे प्रातात अनेक शाहीर होऊन गेले सभाजीच्या पदरी 'मोहनलाल व मोतीराम' हे दोन शाहीर होते त्यानतर रमाबाईचा पोवाडा रचणारा शाहीर अज्ञात, त्रिंबक दाभाड्याचा पोवाडा रचणारा शाहीर मल्हारदास, खडकीची व अष्ट्याची लढाई वर्णन करणारा शाहीर रत्ना केरू, आनदराव धुळाप्पाचा कवणकर्ता भिकू बाळा, दत्ताजी जाधवाचा पोवाडा लिहिणारा अज्ञान यमाजी व उमाजी नाईकाचा पोवाडा रचणारा जीरखान इत्यादी शाहीर मडळींनी पुणे प्रातात शाहीरी कवणाची परपरा उभी केली व कायम ठेवली पोवाड्याच्या कवणावरून त्याना बक्षिसे व इनाम भेटत असे, असा इतिहासात उल्लेख आहे. काही शाहीर काव्यरचना सरदाराना खूष ठेवण्यासाठी रचत असत व गात असत

पेशवेकालीन शाहीराना बराच मोठा राजाश्रय मिळाला माधवराव पेशव्यानी व दुसऱ्या बाजीरावानी शाहीराकडून कवने, शाहीरी लिहून घेतली त्याचा शाहीर गुणूहैबतीला राजाश्रय होता होनाजी बाळाला सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत कोंडणपूरचे कुरण इनाम म्हणून दिले होते

## पुणे भागातील शाहीरी लावणी

पुणे प्रातात पेशवेकालीन शाहीरानी शृगारिक काव्यरचना अधिक केल्या आहेत. शृगारिक काव्यात कवी राम जोशी यानी मोठा मान पटकाविला त्यांना पेशव्याकडून इनामे देण्यात आली आपल्या 'चिमा' नायकिणीच्या सतत सहवासामुळे त्याची काव्यदेवता सतत जागृत राहिली. 'इष्काची तलवार असली पेशवा नित्य लढवी' असे त्याने आपल्या काव्यात वर्णिले आहे

"सुंदरा मनामधी भरली,

जरा नाही ठरली,
हवेलीत शिरली
मोत्याचा भाग ।।"

ही लावणी सर्वश्रुतच आहे त्यानतर नाव घेण्याजोगा लावणीकार होनाजी बाळा (१७९० ते १८१८) हा मूळ पुरदर तालुक्यातील त्याचा आजा सातप्पा मोठा लावणीकार होता व चुलता बाळा ऊर्फ बाळा बहिरू हा उत्तम फडकरी होता बहिरू हा बाळाचा दोस्त 'आस्त्री प्रलयगता तुझी ग बुध नाही कामाची' ही उत्कृष्ट लावणी बाळा बहिरूचीच आहे या फडामध्ये बाळा करजकर, रामा अद्र, विठू अद्र, काशीराम धोंडूराम, सदाशिव पाडू, भवानी बापू, भाऊ त्रिंबक इत्यादी गाणारे फडकरी होते सगनभाऊबरोबर त्याचे नेहमी सामने होत या सामन्याचे पर्यवसान पुढे गुडानी त्याच्यावर हल्ला करून खून करण्यात झाले युवतीवर्णनामध्ये राम जोशीसारखीच त्याची ऐट असे

"गोल तुझा शरीराचा डौल
वर गोरा रग नवती कवली नरम
ओठ पवळे तुझ्या
नासाग्री झोक नथनीचा कबर
बारीकशी बुद
छाती तुझी रुद
सडक बांधा नाजूक देहीचा ।।"

-- सुदर युवतीचे हे मोहक वर्णन आहे अमर भूपाळी या चित्रपटात गाजलेले गाणे--

"लटपट लटपट तुझ चालण
मोठ्या नखऱ्याच
बोलण ग मजुळ मैनेच ।।"

हेही होनाजीच्या सौदर्यसृष्टीची साक्ष देणारे कवन आहे.

सगनभाऊ हा शाहीरदेखील पुणे प्रातात गाजला. त्याचा गुरू नाथसिधी. जातीने हा मुसलमान असला तरी 'लावणी करावी सगनभाऊने व गाऊन दाखवावी रामा गोंधळ्याने' अशी म्हण त्या काळी रूढ होती सगनभाऊ प्रतिगधर्वासारखाच वाटे सारे पुणे शहर त्याच्यावर लुब्ध होत असे रामा गोंधळ्याला तो फार मानत देई.

'नित्य रामा गाई जसा पट्ट्याचा मोहरा' असे त्याचे वर्णन सगनभाऊने केले आहे. इ स १८१८ पर्यंत सगनभाऊ पुण्यातच गात असे. पुढे रामा बडोद्यास गेल्यावर सगनभाऊ सातार्‍याला गेला मार्मिक, भेदक व शृंगारिक अशा तीनही प्रकारच्या लावण्या त्यानी केल्या सगनभाऊ होनाजीला प्रश्न करतो,

"नावडीची साखर आळणी
असे का हो कुडे पावडे ।
पाहिले नाही रविने
केले कविने कसे काय हे कोडे ।
सगनभाऊ म्हणे होनाजी बाळा
उत्तर द्यावे रोकडे ।।"

पुण्यात त्या वेळी गवळ्याचा फड (होनाजी बाळा) व रावळाचा फड (सगनभाऊ) असे दोन परस्परविरोधी फड होते

पेशवेकालीन शाहीरतुरा म्हणून प्रभाकर शाहीराची पुणे प्रांताला ओळख होती तो मूळ नासिक जिल्ह्यातील गगापूर या गावचा राहणारा पुण्यात आल्यावर गुणुहेबतीच्या फडातील गुणूहैबती, महादबा सुतार, गुणिराज गधार याच्याशी त्याची ओळख झाली प्रभाकर शाहीर फारच मधुर कवने करीत असे प्रभाकराबद्दल दुसऱ्या शाहीरानी लिहिले आहे–

"किती प्रभाकराचे कवन मधुर दिलदारी ।
भरी अर्थ यमक अन्य मधि रगकरारी ।।
प्रभाकर गातसे दिल खुलती ।।
प्रभाकराची कविता अमृतासमान"

प्रभाकर शाहीराला पेशव्याकडून इनाम व बक्षिसे मिळत गुणूहैबती व प्रभाकर याना राजाश्रय होता प्रभाकराच्या वाणीची लोक नेहमी वाहवा करीत

"प्रभाकराची वाणी ।
शुद्ध आधी वाणी ।
अर्थ खूब छानी ।"

असे एका कवनामध्ये शाहीर प्रभाकरासबधी लिहिले आहे स्त्रीसौंदर्याची वर्णने रेखाटण्यात तर शाहीर स्पर्धाच करत असत

स्त्रियाची भडक वर्णने करण्यास शेवटचा बाजीराव बराच कारणीभूत झाला

अशा वर्णनाना त्याचे नेहमी प्रोत्साहन मिळत असे. वेकटनरसी काचनीला तीन दिवसात बाजीरावाने २६००० रुपये दिले असा उल्लेख जुन्या कागदपत्रात सापडतो (२४ जानेवारी १८०२)

प्रभाकर समकालीन गुणुहैबती हा मोठा रचनाकार होऊन गेला. त्याने अध्यात्माधारित अनेक प्रश्न उभे करून शाहीराची दाणादाण केली त्याच्या प्रश्नाचा एक नमुना

"आम्ही एक सुदरी पाहिली
मुखे नवसे तेरा।
शीर उराला उर शीराला,
शास्त्री पाहे कविश्वरा।
जिच्या कमरेला छपत्र हात
पाय तिनशे खाद्याला।
सर्व अगाला एकच डोके,
नाके तिनशे खाद्याला।
गाल घोट्याला, कान ओठाला,
दात हाताच्या आगठ्याला।
ध्यानि धरवेना,
स्मरणि पाहवेना,
बुद्धिमद येथे अगोचर।
नार येवढी सागून द्यावी
कविराया मज लवकर।।
सद्‌गुरुला पुसून येई
देई पदाचे उत्तर
कविराज हैबती गातो
भेदगुण गभीर
तुरेवाल्याचे कान कापले
वैरी पळती दूरदूर।।"

*

# १३. शिवनेरीची शाहिरी परंपरा

शिवनेरीवर शिवरायाचा जन्म झाला तसाच शिवनेरीच्या आसमताने चागल्या शाहीराना जन्म दिला आणि 'शाहीराच्या देशा कर्त्यामर्दाच्या देशा' ही कविराज राम गणेश गडकरी याची उक्ती खरी केली जुन्नर, शिवनेर, भीमनेर हा शाहीरांचा प्रदेश शाहीरी कवनाचे चाहते दोन भागात विशेष प्रसिद्ध आहेत १) जुन्नरी २) वाईदेशी (वाई-सातार्‍याकडील) शाहीर आणि तमासगीर यांच्या गाण्याची चिकित्सा करण्यासाठी या भागात त्याची कवने गातात ढोलकी व भेदीक लावण्यामध्ये ज्याप्रमाणे वाई-सातार्‍याकडील मडळींनी आपले स्थान साभाळले आहे, त्याप्रमाणे बैठकीच्या लावणीत जुन्नरी लावणीचे स्थान कायम आहे. जुन्नरी लावणीपेक्षा वरचढ लावणी दिसून येत नाही दृश्य व श्राव्य हे लावणीचे दोन प्रकार त्या दोन्हीही प्रकाराच्या लावण्या जुन्नरच्या परिसरात आजही गायल्या जातात

घाटमाथ्यावर व मावळी प्रदेशात बैठकींनी गाणे आणि बैठकीच्या लावण्याची आजही पद्धत आहे गायन फक्त पुरुष मडळीच करतात आजही बैठकीतनीळवती, जयवती, भीम-अर्जुनाची लावणी, ठकाई मावशीची लावणी, रामायणाची लावणी, तुर्‍याची लावणी, मोहना बटान, प्याद्याची लावणी, काही रसभरित ठुबर्‍या, काही खटके, त्याबरोबर भेदीक इत्यादी गाणी गायली जातात अर्थात गाण्याची झलक, वाद्य वाजविण्याची पद्धती व झिलकरी ह्या पद्धती जुन्याच कायम आहेत शिवनेरीची शाहिरी दीड-दोनशे वर्षांपूर्वी रचली गेली व गायली गेली. शाहीराची चरित्रे मात्र आज उपलब्ध नाहीत त्याच्या कवणामध्ये सहजगत्या सापडलेल्या पुराव्यावरूनच त्याच्यासबधी थोडीफार माहिती मिळते त्याची काही कवने मनोविश्लेषणात्मक आहेत ज्ञानी लोकाप्रमाणे किंवा पहिलवान लोकांप्रमाणे शाहीराचीही निश्चित परपरा असते कोणातरी ज्ञानी पुरुषाला गुरू मानून त्याला प्रथम वदन करण्याची व त्यानतर गायन करण्याची एक खास प्रथा शाहीरी परपरेत आहे. वदन सामान्यपणे गणाच्या सुरुवातीला किंवा शेवटी असते.

## उतारवयात आध्यात्मिक काव्य

जुन्नर प्रातात शिवनेरीचे फड सोडून गगाथडीचा शाहीर परशुरामाचा एक फड होता शाहीर परशुराम मूळ सिन्नर तालुक्यातील वावी या गावचा राहणारा कवीमध्ये जसे मोरोपत तसेच शाहीरात परशुराम शाहीर असा त्याचा लौकिक होता. त्याचा 'देश परिस्थितीचा पोवाडा' तत्कालीन समाज परिस्थितीचे चित्र दर्शवितो परशुराम देणग्या स्वीकारत असे, पण कोणताही राजाश्रय त्याने स्वीकारला नाही त्याने होळकर, जानकोजी शिंदे व सयाजीराव गायकवाड यांचे पोवाडे रचले त्याच्या फडामध्ये भवानी तेली, बापू भराडी, चाभार गोदेकर इत्यादी गायक मडळी होती त्यानीच शाहीर परशुरामाच्या कवनाना चाली दिल्या गगाथडीकाठी दुसरा गाजलेला फड अनतफदीचा त्याचे मूळ नाव घोलप आणि राहणारा सगमनेरचा त्याच्यासबधी लोक असे सागतात की, फदीबुवाच्या कृपेने त्याला स्फूर्ती मिळाली व काव्यरचना सुरू केली पुढे लावण्याची रचना करून त्याने तमाशाचा फड उभा केला त्याच्या जोडीला फदी, रतनफदी व राघवफदी ही सहकारी मडळी होती तारुण्यात त्याने शृगारिक काव्य रचले पण वृद्धवयात त्याने आध्यात्मिक काव्याची रचना केली त्याचा काळ सवाई माधवरावांच्या वेळेस होता रावबाजीचे वेळी त्याच्याकडून 'माधव निधन' हे ६ अध्यायांचे व ३५९ ओव्यांचे काव्य पेशव्यांनी लिहून घेतले अनतफदीबद्दल होनाजीने चागेल उद्‌गार काढले आहेत

"फदी अनत कवनाचा सागर ।।
समोर गाता कोणी टिकेना ।।"

फदी आनदी, छदी, वरदी ब्राह्मण, त्याला गुरुकृपा होती, असेही होनाजीने उद्‌गार काढलेले आहेत

युवतीवर्णनात अनतफदीही काही कमी नव्हते.
धन्य तुझे लावण्य प्रीतीचे बाण
जैसे जनानी ।
खरे सांगशील कधी तृप्त होईल
गे आमची मननी ।

असे त्यानी एका लावणीमध्ये म्हटले आहे.

## शिवनेरीची खास परपरा

शिवनेरीच्या परिसरातील शाहीरी फार जुनी आहे. जुन्नरच्या परिसरात अनेक शाहीर होऊन गेले. त्यांची परपरा अजून चालू आहे त्यामध्ये जुना व कवनरचनेत श्रेष्ठ बहिरू मल्हारीचा फड त्यातला कवन रचणारा गोविंदराव हा जुन्नरचा असून तो साळी जातीचा होता त्याचा पणतू हल्ली हयात आहे. मल्हारीचा फड त्या काळी फार नावाजलेला होता जुन्नर प्रात सोडला तरी पुणे प्रांत, मुबई व मराठवाड्यापर्यंत त्याचा लौकिक होता १८७४ मध्ये रचलेल्या एका मुजऱ्यात देऊळगावच्या सत नागू शाहीराचा शिष्य नारुबापू याने मोठ्या भक्तिभावनेने ह्या जोडीचा उल्लेख केलेला आहे बहिरू मल्हारी हा मूळचा पुण्याचा होनाजीचा चुलता बाळा याचा तो सहकारी होता पुढे गोविंदरावच्या फडात गेला बाळाचा बाप सतप्पा हा उत्तम लावणीकार होता त्याचा काळ नानासाहेब व माधवराव पेशवे याच्या राजवटीमधील गोविंदराव हा 'वरदी' शाहीर नावाने ओळखला जाई (परशुराम हाही वरदी शाहीर होता) नाणेघाट'द्वारे गोविदराव व बहिरू मल्हारीच्या फडाचे मुबईशी कायम जाणे असे गोविंदरावची आज जवळजवळ २५० कवने उपलब्ध असून ७० कवने खड्या बोलीत म्हणजे उर्दूमिश्रित आहेत खड्या बोलीमुळे मुबईतील मराठेतर मडळीवर त्याची चागली छाप होती. पुणे प्रातात हिंदीचा प्रभाव होता बरीच वर्षे मुसलमान आमदानीच्या वर्चस्वामुळे व वेल्हेच्या नबाबामुळे जुन्नरला मुसलपानाची वस्ती बरीच आहे या सुमारास प्रभाकर शाहीराचा शिष्य गगा हैवती हाही मुबईला फड गाजवीत असे धनिकाची स्तुतिकवने गाण्यात त्याला बरे वाटे परतु बहिरू व गोविंदरावची लोकप्रियता याला मिळविता आली नाही गोविदरावच्या लावणीची झलक काही औरच होती

"राजीद्र रूपतेजीद्र,
तुझा मुखचद्र
उगवला अरुण
स्वरुपाची फाकली प्रभा
जशी सुप्रभा
देखिली दुरुन"

– त्याप्रमाणे गोविंदरावची खडी बोलीही प्रभावी होती

सर्वांमुखी तो महाराज।
जली अस्थली भरून उरला उरला
तोही कुठे राहीला।

जबाब सवाल बे रोकडा / स्त्रियाचे वर्णन करण्यात शाहीराचा हात कोण धरणार? त्याच्या उपमा, उत्प्रेक्षा, रूपक इत्यादीमुळे कवनाला मोठा रग येतो पुढील कवनावरून गोविंदरावाच्या स्त्रीसौंदर्यविषयक दृष्टीची कल्पना येते.

वय वर्षं उमर पधराची,
कोरचद्राची, चढती कळा सुदरा
बत्तिस लक्षणी
सुलक्षणी चतुर आवला ।। १।।
सुकुमार, तनुसुरग सदा खुशरग,
वर्ण सावळा कवळी काया लसलसी,
उगवला शशी,
उदयाचलावर निळी कि पिताबरी
मान सातिरी
बारिकगळा बोलशी बोल अनुमोल
जशी कोकीळा

इ इ या कवनातील रचना उत्कृष्ट आहे डौल सुदर आहे रामजोशींच्या 'सुदरा मनामधी भरली जरा नाही ठरली, हवेलीत शिरली, मोत्याचा भाग' ह्या कवनाशी त्याची तुलना करता येईल

'गोविंदरावाचे छेल बटाऊ आख्यान' शाहीराना फार आवडते. त्यातील जीवाशिवाची भेट बुद्धीत होते. अज्ञानामुळे हे एकमेकाला जाणू शकत नाहीत ब्रह्मानदाशिवाय बुद्धीही हे जाणू शकत नाही सर्वांकडे (मोहाकडे) पाठ फिरविल्याशिवाय ब्रह्मानद मिळणार कसा? त्याशिवाय 'मोहना बटाव आख्यान' हे तर जुन्नेर, पारनेर, अकोलनेर, सगनेर इत्यादी भागात फार मोठ्या [illegible] जात असे. आज या भागात म्हटले जाणारे 'बटाव आख्यान' व गोविंदरावांचे मुळ 'बटाव आख्यान' यात थोडा फरक झाला आहे. पण मूळ विषय मात्र बदललेला नाही. "कोणी एक सुदर पुरुष पाणवठ्यावरून जात असताना एका स्त्रीला दिसतो. आपल्याशी त्याने मैत्री करावी अशी इच्छा ती कळविते व सासूला थाप मारून एका

मदिरामध्ये सत्कारासाठी जाते. व भोजनोत्तर ते दोघे रममाण होतात. सकाळी पती येतो प्रियकराला ती बागेत पाठविते, पण त्याला सशय येऊन त्या प्रियकराचा तो खून करतो -तिला दुःख आवरेना, तेव्हा तीही त्याबरोबर देहत्याग करते."

"ओतिव स्वरुप तेजस्वी चद्रमा जसा,
कोण देश, कुठल रहिवासी
सख्यानो पुसा ।।धृ ।।
"शृगार करी मोहनी
कळी खुलली गुला-गुलाबाची तन
बागातील खिरणी
मूर्तिमत कनकाची
कोमल नवी तरणी
साडी नेसून भरजरीची ।।

अशी सुरेख वर्णने या दीर्घ कवनात आढळतात कवनातील शृगार फारच मोहक असा आहे

गोविंदरावाच्या कवनात बहिरू, बापू, रामभाऊ, जैदेव, भिया, मल्हारी राघू, यमाजी सतु, व शिवराम या सहकाऱ्याची नावे आढळतात शिवनेरीच्या परिसरात दुसरा फड दुलारखमाचा बहिरु मल्हारीला समकालीन, पण विरोधी नव्हे दुला-रखमा ही नावे या भागात विशेषतः मावळ भागात सर्रास आढळतात. कदाचित हे शाहीर घाटमाथ्यावरील मावळीशाहीर असावेत त्याचेही फड मुबईत गाजत असत त्याचप्रमाणे ठकूजी, उमाजी, यमाजी ही नावे येथील लोकामध्ये व भागात प्रचलित आहेत. दुला देवभक्त होता त्याचे आध्यात्मिक ज्ञान चागले होते त्याच्या कवनाचा नमुना-

ग छबकडे कर वचनाचा मान
दे सल्ला एकदा नको
करु अवमान ।।धृ।।
तू दो डोळ्याची मुरबत धर काही
जाईल उद्या अब्याची सराई ।।

हा एक स्त्रीलपटाचा काव्यनमुना दुलारखमाने रचला आहे. तसेच पोटी फळाची वांछा असलेल्या एका स्त्रीचे मनोगतही त्यानी कवनात चांगल्या प्रकारे वर्णिले आहे

"सुख असता दुःख मोठे,
पोटी फळ नाही ।। धृ।।
मजपरिस धाकट्या मुली
अगदीच होत्या लहान
पर वरकरणी होत्या
तेव्हा मज आले न्हाण
त्या लेकुरवाळ्या
खेळविती गोजिरवाणा
कधी मजला हरी पावेल
देईल मुल तान्हा" ।। १।।

याशिवाय महमदवाडीचा शाहीर मोतीराम हाही याच भागातील होता. त्याचा शिष्य विठ्ठल विष्णू ऊर्फ बीरक्षेत्री यानेही कवने रचली

सातवेमासी डोहाळे जेवण
केले सईबाई
या रगमहाली पाट रागुळ्या
आणिली रोषनाई
इष्टमित्र गणगोत पक्तिला
व्याही जावई
नानापरीची फळेफळावळे
आणिली सईबाई

## शाहीरी कलेचा आजचा वारसा

जुन्या शाहीरांची परपरा आज जुन्नर विभागात चागल्या प्रकारे चालू आहे गोविंदराव साळ्याची परपरा कै. दगडोबा साळी, दत्तोबा तांबे याच्या घराण्यानी चालविली त्याच्या हयातीत त्यांनी उत्कृष्ट काव्यरचना केली ती काव्यरचना पुस्तकरूपाने प्रसिद्धही झालेली आहे कै दगडू साळ्यानतर श्री दत्तोबा तांबे, शिरोलीकर यानी ही परपरा वाढविली आणि दिल्लीपर्यन्त नाव कमविले. शिवनेरीच्या भागात नाव घेण्यासारखा मोठा तमासगीर म्हणजे भाऊ-बापू नारायणगावकर यानी महाराष्ट्राच्या अभिजात ग्रामीण कलेचे रेखीव अग

दिल्लीश्वराना दाखवून सुवर्णपदकाचा मान मिळविला महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यात एकेकाळी भाऊ-बापूच्या तमाशाचे वेड इतके होते की त्याचे वर्णन करणे कठीण आहे त्याची परपरा त्याची मुलगी नृत्यगायिका विठाबाई या गुणवान कलावतीकडे आहे या भागात कै भागू माळी (निरगुडेकर) व त्याचा मुलगा नागू यानीही तमाशा कलेची परपरा चालविली त्याशिवाय कै हरिभाऊ वडगावकर, सखाराम शिन्दे, हडसरकर, सोंगाड्या रखमाजी सागडे हडसरकर ही गुणी व कलावत माणसे शिवनेरीच्या कुशीत जन्माला आली मुबई व महाराष्ट्र गाजविणारी बरीच मडळी या भीमथडीच्या व शिवनेरीच्या परिसरात अग्रेसर आहेत त्यामध्ये उमा चाडोलीकर आनदा चाडोलीकर, शकर अवसरीकर खडू शिवणेकर, हसाबाई काळे, कै. कोकाटे आणि मडळी अनेकानी शाहीरीचा वारसा चालविला

जुन्नर घाटमाथ्यावर आदिवासी भागात शाहिरी आणि तमाशाची परपरा निमगिरीचे गोविदराव सावळे व धोंडीबा सुतार यानी टिकविली आदिवासी समाजातील जुने शाहिर दुलारखमा, गणु यमाजी याची जुनी परपरा कायम ठेवून पठ्ठे बापूरावानी नवी परपरा सुरू केली याच्याच समकालीन किवा अगोदर जुन्या गाण्याची परपरा 'धागडी'च्या तमासगिरानी मूळनथी (अकोलनगर) मध्ये कायम ठेवली होती तमाशा ही कला अस्सल मराठी कला आहे महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा तो ठेवा आहे महाराष्ट्र शासन या कला पुनरुज्जीवित करीत आहे काळ बदलत चालला आहे. पठ्ठेबापूरावानी 'नामचद पवळा' तमाशात नाचविली त्यामुळे तमाशाची दिशा बदलून तमाशाला पूर्वीपेक्षा रेखीवपणा आणि अतीव गोडी निर्माण झाली यापुढे समाजस्थितीबरोबर तमाशात बदल होऊन या कलेचा विकास होणे जरुरीचे आहे दत्तोबाचा झाशीची राणी, तुकाराम खेडकराचा गवळ्याची रभा, भाऊबापूचा चद्रमोहन, शकर अवसरीकराचा हरिश्चद्र राजा, हरिभाऊ वडगावकरचा सावळ्या कुभार इत्यादी जुने वग जाऊन नवीन वगाना चालना मिळणे आवश्यक आहे तमाशा कलेसाठी नवीन नवीन वाङ्मय निर्माण होणे जरुरीचे आहे खेड्यापाड्यात अलिखित असलेली गाणी एकत्र करून महाराष्ट्राच्या या कलेची सेवा करणे अगत्याचे आहे तमाशाकलेची सेवा करणारी मडळी गरीब समाजातील आहेत बहुजनसमाजाची त्याने आपल्या कलेद्वारे सेवा केली आहे त्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून त्याना आर्थिक सवलती व वृद्धापकाळी सरकारने मानधन दिले पाहिजे

*

# १४. सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरील आदिवासी समाज

लोणावळा, खडाळा, राजमाची, ढाक, भीमाशकर ही पठारी प्रदेशाची दक्षिणेकडील हद्द तेथून उत्तरेकडील शिखरे तुटक व स्वतत्र आहेत. या प्रदेशात 'महादेव कोळी, ठाकर, कातकरी, कोकणा, भिल्ल' ह्या आदिवासी जमातीची वस्ती आहे हे समाज डोंगर-दऱ्याखोऱ्यात राहत असल्याने व सपर्काची साधने या भागात दुर्मिळ असल्याने बाह्य जगाच्या सपर्कापासून हे समाज फार काळापासून दूर राहिले आहेत "हा सर्व समाज देवाला भिणारा, प्रामाणिक व खरे बोलणारा आहे डावपेच, फसवेगिरी त्याला अवगत नाही आदरातिथ्य करण्यात तो नेहमी पुढे असतो दुसऱ्याना मदत करण्याची प्रवृत्ती त्याच्यामध्ये आहे तो लोभी नाही त्याच्याकडे सग्राहक वृत्ती नाही त्याला उद्याची विशेष चिंता नाही. परमेश्वरावर हवाला ठेवून हा समाज दिवस काढतो आहे निसर्ग हाच त्याचा आधार आहे सुखदुःखाचे दिवस तो परमेश्वरावर हवाला ठेवून काढतो धान्याच्या सुगीला तो अधिक आनदी असतो तो अपार कष्ट करतो आपल्या कष्टाने शेती पिकवून तो पोट भरतो "

महादेव कोळी व भिल्ल कोणत्याही राजवटीशी समरस झाले नाहीत. राज्यकर्त्यांना त्याच्या बडखोरीचा सतत उपद्रव झाला "राज्यकर्त्यांविरुद्ध जो बड करतो तो दडपशाहीला तोड देण्यास तयार असतो." या न्यायाने महादेव कोळ्यावर व भिल्लांवर जुलूम, जबरदस्ती, कैद, फाशी असे सारे प्रकार झाले पण ते हार गेले नाहीत कारण ह्या जमाती परपरागत स्वातत्र्यप्रिय, शूर व लढवय्या होत्या

लोणावळ्यापासून उत्तरेकडील घाटमाथ्यावर व घाटपायथ्याशी महादेव कोळी व ठाकर जमातीची दाट वस्ती आहे त्याच्या 'भौगोलिक सलगतेमुळे व सास्कृतिक वेगळेपणामुळे' त्याचा प्रदेश वेगळा वाटतो सह्याद्रीची सरासरी उची ३००० फूट असली तरी सह्याद्रीमधील अति उच्च शिखरे, उदा भीमाशकर, कळसूबाई, हरिश्चद्रगड, ढाक, त्रिबकेश्वर इत्यादींच्या परिसरात व पठारावर त्यांची वस्ती गावोगाव पसरली आहे सह्याद्रीच्या ह्या उच शिखरावर त्याची देवस्थाने व कुलक्षेत्रे आहेत. महादेवाच्या परमभक्तीचे महादेव कोळी प्रतीक मानले आहेत आजही बारा

ज्योतिर्लिंगांपैकी दोन ज्योतिर्लिंगे भीमाशंकर व त्रिंबकेश्वर ही महादेव कोळी जमातीच्या प्रादेशिक विभागात विराजमान झालेली आहेत. महादेव कोळी जमातीची वस्ती असणाऱ्या प्रदेशात प्रत्येकी ८ ते १० कि मीटर अंतरावर महादेवाचे स्वयंभू मंदिर आहे. त्यांचे हक्कदार महादेव कोळी जमातीचेच लोक आहेत. काही [illegible] हक्क पेशव्याच्या कारकीर्दीत ब्राह्मणाकडे देण्यात आले महादेव कोळी स्वतःला वाल्मीकी व रामाच्या वंशाचे मानतात रामचरित्रातील अनेक पवित्र ठिकाणे या प्रदेशातील स्थानाशी निगडित आहेत.

महादेव कोळी लोकांच्या उत्पत्तीसंबंधी बरेच तर्क आहेत प्राचीन वाङ्मयात वारंवार उल्लेख आलेले निषाद किंवा किरात हे महादेव कोळी असावेत, असा काहींचा तर्क आहे. कारण वाजसेनीय संहितेप्रमाणे “किरात हे दरीत (गुहात) राहत आणि पर्वताच्या दरडीवर किराताची मुलगी (कैरातिक) औषधे खणीत असे,” अशा अथर्ववेदातील उल्लेखावरून किरात लोक गिरिकंदरात राहत होते व त्यांचा मुख्य धंदा ‘पारध करणे, शिकार करणे हा होता.

इतिहासकार राजवाडे यांच्या मते ‘महादेव कोळी’ जमातीचे लोक पुरातन कोलवंशाचे असावेत. काहींच्या मते महादेव डोंगर हे महादेव कोळी जमातीचे मूळ वसतिस्थान आहे. फार प्राचीन काळी आर्यांच्या त्रासाला कंटाळून त्यांनी सह्याद्रीच्या डोंगराळ भागात वसाहत केली असावी असेही काहींचे मत आहे. डॉ इरावती कर्वे यांच्या महाराष्ट्रातील वंशीय अभ्यासानुसार महादेव कोळी हे वन्य टोळ्यांच्या वंशाचेच लोक आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात गावोगाव आढळणारी ‘कोळी’ ही जात मात्र महादेव कोळी जमातीहून भिन्न आहे.

कळसूबाई हे सह्याद्री पर्वतामधील सर्वांत उंच (५४२७ फूट) शिखर आहे ‘आर्चडीन गेल’ याने १८६० साली रात्रीचा प्रवास करून हे शिखर गाठले सुप्रभाती याने सभोवार पाहिले तेव्हा ‘खरोखर दक्षिणेकडील पर्वतांचा हा राजा आहे’ असे उद्गार काढले. कळसूबाईच्या उत्तरेला बीतनगड व दक्षिणेस अलंगकुलंग हे किल्ले आहेत. दक्षिणेकडील पायथ्याशी रतनगडावर प्रवरेचा व उत्तरेकडील हरिश्चंद्र गडावर मुळा आणि काळू नदीचा उगम झाला आहे. कळसूबाईसंबंधी एक दंतकथा नेहमीच सांगण्यात येते “कळसू ही एका महादेव कोळ्याची मुलगी होती. ती फिरत फिरत इंदुरे या शिखरपायथ्याच्या गावाजवळ आली व एके ठिकाणी कामाला राहिली. परंतु भांडी घासणार नाही ही तिची अट होती. एके दिवशी तिला

भांडी घासण्याचे काम सागण्यात आले हे काम करणार नाही म्हणून ती रुसून पर्वतावर गेली व मरेपर्यंत ती तेथेच कदमुळे खाऊन राहिली " ती ज्या ठिकाणी काम करत होती त्या जागेला 'थाळे-मेळ' म्हणतात व शेती करत असलेल्या जागेला 'काळदरा' असे नाव आहे 'कळसूबाई' ही महादेव कोळ्याची कुलदैवता मानण्यात येते.

ठाकर ही दुसरी आदिवासी जमात महादेव कोळी जमातीप्रमाणेच ती भीमाशकरपासून थेट नासिकपर्यंत विखुरली आहे तिचे मूळ वसतिस्थान नासिक मानले जाते इगतपुरीच्या एका ठाकराजवळ सापडलेल्या ताम्रपटावरून ही जमात ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात नासिक जिल्ह्यात राहत होती कपिलेश्वराच्या पूजेसाठी 'गोपराष्ट्र' जिल्ह्यातील बालेगावच्या ठाकराला चालुक्य घराण्यातील एका राजाने वर्षासन दिल्याचा उल्लेखही त्या लेखात आहे पूर्वी नासिक-त्र्यबकेश्वराच्या भागाला 'गोपराष्ट्र' म्हणत असत पण आज तरी त्याच्या गाण्यातील अर्थावरून 'महालदश' म्हणजे नाशिक-त्र्यबकेश्वर भाग हेच त्याचे मूळ मानावे लागते.

नासिक जिल्ह्यातील उत्तर भागात घाटमाथ्यावर आणि कोकण प्रदेशात (पश्चिम वाहिनी) कोकणा ही आदिवासी जमात आहे ती मूळची कोकणातील असावी दुष्काळामुळे हे लोक ठाणे जिल्ह्यातून घाटावर नासिक जिल्ह्यात आले असावेत पेठ, सुरगाणा, कळवण, बागलान भागात त्याची वस्ती प्रामुख्याने आहे

, फार प्राचीन काळापासून ह्या आदिवासी जमाती या भागात राहत आलेल्या आहेत परतु त्याना सामाजिक, आर्थिक किंवा राजकीय स्थैर्य कधीच लाभले नाही याउलट त्याच्या अज्ञानाचा, दुर्बलतेचा, गरिबीचाच फायदा इतरांनी घेतला त्याच्या चागल्या जमिनी काढून घेतल्या, त्यांना कर्जबाजारी केले व दुसरेच लोक त्याच्या जमिनीचे मालक झाले

महादेव कोळी ही जमात इतिहासात अनेक वेळा प्रसिद्धीस आली जुन्नर प्राताखाली येणाऱ्या बारा मावळाच्या प्रदेशात (अदरमावळ, ढाकचे पठार, भीमाशकर पठार, भामनेर, भीमनेर, घोडनेर, मीननेर, जुन्नेर, कुकडनेर, बारागाव खोरे, हिरवे पठार, कोपरे माडवे पठार), तसेच नगर जिल्ह्याच्या मुळा, प्रवरा, डागण, अकोलनेर भागात, इगतपुरी, घोटी, त्र्यबक भागात महादेव कोळी लोकाची लोकवस्ती मोठ्या प्रमाणात दिसून येते

उत्तर हिंदुस्थानात मुसलमानांच्या स्वाऱ्या यशस्वी झाल्यावर त्यानी आपले

लक्ष दक्षिण हिंदुस्थानकडे वळविले त्या वेळी इकडे देवगिरीचे यादव राज्य करीत होते महाराष्ट्रातही मुसलमानी स्वाऱ्यानी धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली त्या वेळी मुसलमानाच्या त्रासाला कटाळून जुन्नेर, भीमनेर, घोडनेर, अकोलनेर मूळनेर, इगतपुरी, त्र्यबक या भागातील काही महादेव कोळी कुटुबे सह्याद्री घाट उतरून कोकणात गेली व त्यानी सघटितपणे आपले राज्य 'जव्हार' येथे स्थापन केले जव्हारच्या राज्यासबधी अनेक दतकथा सागतात. पण एवढे मात्र खरे की, जायबा नावाच्या एका कर्तबगार पुढाऱ्याने त्याच्या गुरूच्या सागण्यावरून मोठ्या युक्तीने हे राज्य वारली लोकापासून मिळविले जव्हारचे मुकणे हे राजघराणे मूळ मुकणी या गावचे हे गाव इगतपुरी तालुक्यात आहे त्याच्या गावाच्या नावावरून त्याना 'मुकणे' हे आडनाव पडले आहे. मुकणी गावातील काही कुटुबे जुन्नर भागात हिरडी गावात स्थायिक झाली आहेत मुकणे घराण्याशी त्याचा सबध असल्याचे दिसते १३४७ मध्ये जायबाला दिल्लीच्या बादशहा मुबारक खिलजीने 'राजा' ही पदवी बहाल करून कोकणचा कारभार त्याच्याकडे दिला त्या वेळची सर्वच राज्ये विजयनगरच्या किवा गोवळकोंड्याच्या राज्याचे वर्चस्व मान्य करीत जव्हारच्या राज्याचा विस्तार बराच वाढला होता, परतु १५६९ मध्ये पोर्तुगीजाशी वैर वाढल्यामुळे जव्हारकराना माघार घ्यावी लागली त्या वेळी 'दीव, दमण, वाझे, दरीला, नवे उबरगाव' ही प्रमुख ठाणी होती व त्यावर जव्हारच्या राजाचे वर्चस्व होते महादेव कोळी लोकाच्या शूरत्वाची व सघटितपणाची चुणूक बादशहाला कळली होती त्यामुळेच सन १४४३ मध्ये महादेव कोळ्याच्या ताब्यात असलेला शिवनेरी किल्ला मलिकउल् तुजार या बहामनी सरदाराने काढून घेतला

श्री छत्रपती शिवाजी महाराज लहानाचे मोठे शिवनेरीवर झाले या भागातील मावळी लोकांची चुणूक त्यानी ओळखली होती त्याच्या एकजुटीचा फायदा स्वराज्यस्थापनेसाठी करता येईल, असे महाराजाना वाटले असावे १६५० मध्ये शिवाजी महाराज २० वर्षाचे असताना जुन्नरशेजारच्या महादेव कोळी मावळ्याना त्यानी एकीचे आणि लढ्याचे प्रोत्साहन दिले महाराजासाठी मावळ्यानी व महादेव कोळ्यानी मोठी एकजूट उभी केली आयुष्याच्या सुरवातीसच छत्रपतीनी जुन्नर प्रातातील महादेव कोळी लोकाना व मावळ्याना आपलेसे केले आणि त्यानतर उभ्या सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात त्यानी मावळे वीर उभे केले 'शिवाजी महाराजाचा हा पहिला प्रयत्न होता ' महादेव कोळ्याच्या ह्या एकजुटीमुळे व उठावामुळे बादशहाने

चिडून हजारो महादेव कोळी लोकाना पकडून त्यांची मुडकी उडविली. त्यांचे शिरकाण केले व त्याचा एक चौथरा, (चबुतरा) बाधला त्या वेळी महादेव कोळ्याचा नायक खेमी (खेमा) नावाचा महादेव कोळी मावळा होता बादशहाने त्याचेही शिरकाण करून त्यालाही या चबुतऱ्यात गाडले या चबुतऱ्याला 'काळा चबुतरा' असे म्हणतात तो जुन्नर येथे आहे महाराजाच्या शब्दाचे मोल जाणून महादेव कोळ्यानी बादशहाला शरण न जाता येथे शूराचे मरण पत्करले परतु इतिहासाने मात्र महादेव कोळ्याच्या या पराक्रमाची दखल घेतली नाही. हे महादेव कोळ्याचे मोठे दुर्दैव। महादेव कोळ्याच्या या एकजुटीचा उपयोग महाराजानी पुढे स्वराज्याची स्थापना करण्याच्या कामी करून घेतला १६५६ व १६५७ साली महाराजानी जुन्नर लुटले आणि ३ लाख ११ हजार होन, २२० घोडे व मौल्यवान चीजवस्तू मिळवून आणल्या त्या वेळी महादेव कोळ्याच्या मदतीचा व एकजुटीचा महाराजांना चागलाच उपयोग झाला सुरत लुटण्याच्या मोहिमेत जव्हारच्या राजाने देखील अनेक महादेव कोळीवीर शिवाजी महाराजाबरोबर मोहिमेवर पाठविले होते. महाराजानी सुरत लुटले तो मार्ग जुन्नर ते जव्हार असाच होता

शिवनेरी किल्ला इ स १७१६ पर्यन्त मोगलाच्या ताब्यात होता तो १७१६ मध्ये शाहूमहाराजाना स्वराज्य सनदेच्या हक्काने मिळाला त्यानतर पेशव्यांचे आधिपत्य या किल्ल्यावर आले परतु पेशव्यानी धोरणे बदलली नाहीत पेशव्यांनी इ स १७४१-४२ दरम्यान कुर्गकिल्ला महादेव कोळ्याच्या ताब्यात होता तो काढून घेतला सुरगाना प्रातातील १४ महल व त्यातील किल्ले महादेव कोळ्याच्या ताब्यात होते ते १७५०-५१ मध्ये खालसा करण्यात आले इ स १७६० ते १७९९ ह्या काळात कोळ्याच्या हातात आलेली सत्ता पेशव्यांनी क्रमाक्रमाने काढून घेतली याच सुमारास पेशव्याना प्रतिउत्तर देण्यासाठी जावजी नावाच्या महादेव कोळी नायकाने पुन्हा सघटना स्थापन केली व शिवनेरीच्या दऱ्याखोऱ्यातून महादेव कोळी बाधवाना एकत्रित केले. पण दुर्दैवाने शिवनेरीचा त्या वेळचा किल्लेदार रामजी सावत यानी जावजीसह ७ प्रमुख महादेव कोळी नायकाना पकडून शिवनेरीवरून त्याचा कडेलोट केला महादेव कोळी समाजाला ही गोष्ट पसत पडली नाही पुणे-नगर मार्गावर १७६२ मध्ये महादेव कोळी लोकानी असहकार व बड पुकारले. त्यामुळे पेशव्यांना माघार घ्यावी लागली. पेशव्याच्या या पराभवामुळे शिवनेरी किल्ला पुन्हा मोगलांच्या ताब्यात गेला

इ स १७६० ते १७९० च्या काळात महादेव कोळ्याच्या बडखोरीचा वारवार उल्लेख सापडतो त्याच्या बडखोरात भागरे, बाबळे, बोकड, पिचड, केगले, याचा प्रामुख्याने उल्लेख आहे या लोकाना पुढे पेशव्यानी आपलेसे केले व त्याना जहागिऱ्या, इनामदाऱ्या दिल्या १७७६-७७ मध्ये सवाई माधवरावानी जाबजी बाबळ्याचे हक्क मोडून त्याला खाडे, भागरे, पिचड याच्याबरोबर काम करण्यास भाग पाडले. खोडे आणि भागरे हे पत्तीकराना सहाय्यक म्हणून त्रिबकेश्वरच्या किल्ल्याचे काम पाहत होते १९वे शतक निघाल्याबरोबर इग्रजाची घोडदौड वाढली. २१ मे १८१८ साली मे एल्ड्रिच बाजीरावाचा पाठलाग करीत जुन्नरला आला त्याचा सुगावा लागताच शिवनेरीचा किल्लेदार आण्णा पत्रीकर याने पलायन करून हडसर किल्ल्याचा आश्रय घेतला व इग्रजाना शिवनेरीचा ताबा दिला इग्रजाचे राज्य आले, पण त्यामुळे जनता शात झाली नाही. ठिकठिकाणी उठाव होत राहिले जुन्नरसभोवतालच्या महादेव कोळी लोकानी पुन्हा उठाव केला आणि इग्रजाना सळो की पळो करून सोडले सरकारी यत्रणा खिळखिळी केली. या बडाचे नेतृत्व १८३० मध्ये भाऊ खारे, चिमणाजी दरबारे व जाधव यानी केले आपण पेशव्याच्या नावानी राज्य घेत आहोत असे त्यानी जाहीर केले कपनी सरकारविरुद्ध ते भाडत व लढत होते आणि त्याचा धुमचक्का पोलिसाबरोबर चालू होता घोडेगाव येथे क्रान्तिकारकाविरुद्ध पोलिसाना मदत मिळाली त्या वेळी २ प्रमुख नेत्यासह ५४ महादेव कोळी बडखोराना प्राणास मुकावे लागले या वेळी रामचद्र गणेश गोरे व अनेक महादेव कोळ्याना फाशी देण्यात आले हे लोण सर्वत्र पसरले उत्तर पुणे व नगर जिल्ह्यात राधोजी भागरे आणि बापू भागरे याच्या नेतृत्वाखाली उठाव सुरू झाला. राघुजी भागरे हा अकोलनरातील महादवे कोळी लोकाचा नायक होता १८३८ मध्ये रतनगड व सनगर किल्ल्याच्या परिसरात त्याने बड उभारले अनेक महादेव कोळी कुटुबानी त्यांना मदत पुरविली प्रत्येक गावचे लोक त्याच्या साथीला बडात सामील झाले इग्रजांनी कॅ. मॅकिनटॉश नावाच्या अधिकाऱ्याला हे बड मोडण्यासाठी अहमदनगरवरून पाठविले. राघोजीचे लोक दऱ्याखोऱ्यात असल्यामुळे राघोजी इग्रजांच्या हाती येईना. पोलिसाच्या तुकड्या सारख्या त्याच्या पाठीमागे लावल्या होत्या पण तो वाऱ्यासारखा पलायन करी, निसटून जाई, त्यामुळे चिडून पोलिसानी त्याच्या वृद्ध आईचा भयानक आणि अमानूष छळ केला कॅ. मॅकिनटॉश त्रासून गेला गावोगावात त्याने विचारपूस केली. पण कोणीच त्याला काही सागेना. उलट

महादेव कोळी लोकाचे म्हणणे प्रथम ऐकून घ्या, असेच लोक सागत परतु बडखोर प्रथम बीनशर्त शरण आल्याशिवाय काहीच ऐकणार नाही या भूमिकेमुळे त्याला यश आले नाही तेवढ्या कालावधीत त्याने सर्व अवघड खिडी, घाट, दऱ्या, रस्ते, जगले याची माहिती मिळविली व घाटावरील सर्व मार्ग रोखून धरले महाप्रयत्नाने बडखोराची सारी गुपिते बाहेर काढली त्याला उत्तर म्हणून बडखोरानी इग्रजाची नीट गावे लुटली त्याची रसद लुटली पण पुढे इग्रजाच्या धाकाने व भयाने काही लोक उलटले ८० लोकाना पकडून नगरच्या तुरुगात त्यांनी कैद केले. तरीदेखिल राघोजी इग्रजाशी सामना देण्यास सिद्ध झाला. परतु फदफितुरीमुळे राघोजीचा उजवा हात समजला जाणारा बापूजी भागरे याचा घात झाला राघोजीला पकडण्यासाठी ५००० रुपयाचे बक्षीस जाहीर केले हात त्यामुळे परिस्थिती बिघडली. वेपातर करून राघोजी आपल्या टोळीसह इग्रजाच्या तावडीतून निसटला. साधूच्या वेषात असताना त्याला पुढे कोकणात (घाटाखाली) पकडण्यात आले आणि तारीख २-५-१८४८ मध्ये ठाण्याच्या तुरुगात फाशी दिले राघोजी खरोखर वीर पुरुष होता "फाशी देण्यापक्षा मला तलवारीने किंवा बदुकीने एकदम वीर पुरुषासारखे मरण येऊ द्या" असे त्याने कपनी सरकारला सांगितले होते. कपनी सरकारने मात्र ते ऐकले नाही

राघोजी भागरेचे बड सपल्यावर इग्रजानी या भागातील महादेव कोळी लोकाची स्वतत्र पलटन उभी करण्याचे ठरविले १८५७ साल जवळ आले होते देशात अनेक ठिकाणी स्वातत्र्यलढ्याची पुकार झाल्याने इग्रजांना हादरा बसला होता या परिस्थितीला तोड देण्यासाठी भिल्ल आणि महादेव कोळी लोकाच्या पलटणी इग्रजानी उभ्या केल्या अहमदनगर जिल्ह्यातील अकोलनेर विभागात एक हजार लढवय्या महादेव कोळ्याची पलटण इग्रजांनी उभी केली या पलटणीचे नेतृत्व राघोजी भागरेचा भाऊ रामजी भांगरे याच्याकडे देण्यात आले होते १८५७ चे बड इग्रजानी मोडून काढल्यानतर भिल्ल व महादेव कोळ्याच्या पलटणीही इग्रजानी हळूहळू कमी केल्या आणि पलटणीतील जवानाना पोलिस दलात समाविष्ट करून घेण्यात आले

राघोजी भांगरे याच्याकडून स्फूर्ती घेऊन १८७३ साली आबेगाव तालुक्यातील जाभोरी गावच्या होनाजी केंगले याने इग्रजाच्या विरुद्ध आणि सावकाराच्या विरुद्ध बड पुकारले परतु हे बड फार काळ चालले नाही होनाजी केंगले याला इग्रजानी पकडून फाशी दिली त्यानतर रामा किरवा, बाळू पिचड, ढवळा भागरे, रामा मोरे, हैबती खाडे, सखाराम सातपुते, भागू येंदा, सत्तू मराडी आणि कोंडाजी नवले यांनी

सावकाराच्या विरुद्ध जवळजवळ ५० वर्षे चळवळी चालविल्या या भागातील सावकारशाही कमी करण्यासाठी त्यानी या प्रदेशातील आदिवासी समाजाला जागृत केले, सघटित केले आणि या भागातील सावकार आणि जमीनदार वर्ग या प्रदेशातून बाहेर काढला

स्वातत्र्यापूर्वीचा हा काळ होता. राष्ट्रीय चळवळी सर्वत्र पसरलेल्या होत्या या राष्ट्रीय चळवळीचे आदिवासींवर देखील अनेक ठिकाणी परिणाम होत होते १९३० साली असहकाराची चळवळ सर्व देशात पसरली जगलावरील हक्कासाठी आदिवासीनी सर्वत्र जगल सत्याग्रह केले. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व आदिवासी जमाती जागृत झाल्या अनेक ठिकाणी आदिवासीनी त्याच्यापरीने जगल सत्याग्रह यशस्वी केले नाशिक जिल्ह्यातील चाणकापूरचा जगल सत्याग्रह हा त्यामध्ये विशेष प्रसिद्धीला आला नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण बागलान तालुक्यात या सत्याग्रहाने उग्र रूप धारण केले होते सत्याग्रहात आदिवासीनी भाग घेऊन भिलवाड येथील व सप्तशृगीनजीकच्या डागरावर झालेले सत्याग्रह यशस्वी केले 'रानचराई देऊ नये, दडपशाहीला उलथून पाडावे सरकारी नोकराना सहकार्य देऊ नये जगलचे कायदे काढून टाकावेत' अशा अर्थाचा प्रचार गावोगाव करण्यात आला पिराजी सयाजी गावीत (देवतगाव), काळू सोमा कुवर (पळसदर गाव) दावल बागुलबारे (देशगाव), सखाराम ठाकरे (चिचपाडा), दामू वाघमारे (आमश्वर) इ आदिवासी तरुणानी लोकामध्ये जागृती निर्माण केली व १८-१०-३० च्या सत्याग्रहाची वर्दी गावोगाव दिली ढोल, नगारे वाजवून आणि आरोळ्या देऊन लोकाना इशारे देण्यात आले या प्रचाराचा एवढा परिणाम झाला की, ९/१० हजार आदिवासी बाधव चणकापूर गावाजवळील तलावानजीकच्या टेकडीवर भाले, कुऱ्हाडी, तिरकामठे घेऊन सुसज्ज होऊन जमले हा लढा महात्माजीच्या अहिसात्मक व शाततेच्या मार्गानेच होता पण इग्रजाशी लढावयास जावयाचे या भावनेने आदिवासी सर्व तयारीनिशी सज्ज झाले इग्रज सरकारला ते आव्हानच होते पोलिसानी व सैन्याने डोगराभोवती वेढा टाकला पण लोकानी त्याला दाद दिली नाही पोलिसानी हवेत बार उडविले, पण भोळ्या आदिवासीना असे वाटले की, "गोळ्या आपल्याला लागतच नाहीत, आपल्यावर देवाची कृपा आहे." पण जेव्हा पोलिसानी प्रत्यक्ष जमावावर गोळ्या झाडण्यास सुरुवात केली, तेव्हा लोक सैरावैरा पळू लागले काहीच्या पोटात, कोणाच्या छातीवर, तर कोणाच्या पायाला गोळ्या

लागल्या लोक मरून पडू लागले त्यामुळे लोक [illegible]
काही लोक चेगरले, काही तलावात पडले अशा तऱ्हेने दीड दिवस चाललेली लढाई ११ वाजता सपली अदाजे १०० पर्यंत लोक मारले गेले. काही लोकाना सक्तमजुरीची सजा झाली अशा तऱ्हेने चणकापूर हे गाव आदिवासीचे स्फूर्तिस्थान बनले महाराष्ट्राचे राज्यपाल श्री प्रकाशजी यांनी १९६२ मध्ये चणकापूरच्या या आदिवासी स्मारकाचे उद्घाटन केले

हा लढा यशस्वी होवो अगर न होवो पण त्यामुळे आदिवासी जनतेची सर्वत्र दखल घेण्यात आली आदिवासींचा अशत· वगळलेला व पूर्णत· वगळलेला प्रदेश अलग ठेवावा या विचाराने पुन्हा जोर धरला व पुढे सन १९३६ च्या कायद्यान्वये मुबई इलाख्यातील 'पचमहाल, पूर्व व पश्चिम खानदेश, नासिक आणि ठाणे जिल्ह्याना अशतः वगळलेल्या प्रदेशाला मान्यता देण्यात आली ' मुबई कौन्सिलचे एक सभासद श्री सोळकी याच्या अध्यक्षतेखाली आदिवासींची पाहणी करण्यासाठी एक समिती नेमली या समितीच्या शिफारशीनुसार पुढे आदिवासी विकासासाठी 'विशेष निधी' उभारण्यात आला व ठाणे, कुलाबा, नासिक या जिल्ह्यातील आदिवासीच्या विकासासाठी एक खास अधिकारी नेमण्यात आला त्याचा इतरत्रही बराच परिणाम झाला पुणे जिल्ह्याचा जुन्नर आंबेगाव भाग, अकोला तालुका (नगर जिल्हा) व नासिक जिल्ह्यात आदिवासींसाठी वसतिगृहे व सामाजिक मडळे स्थापन झाली दादासाहेब बीडकर यांनी १९३७ मध्ये डाग सेवा मडळ तर भाऊसाहेब हिरे यानी १९४५ मधे 'आदिवासी सेवा समिती, नासिक' स्थापन केली. पुणे जिल्ह्यातील आदिवासीमधे ही समाजजागृती फार उशिरा झाली जुन्नर तालुक्यात दवड्या डोगराच्या कुशीत लपलेल्या निमगिरी गावात सन १९५४ साली बोकड गुरुजीनी 'आदिवासी शिक्षण सस्था,' या नावाने नवी शैक्षणिक सस्था सुरू केली व पुणे जिल्ह्यातील डोगरा-दऱ्या-खोऱ्यातील आदिवासींच्या शैक्षणिक कार्याला सुरुवात केली

*

# १५. वनश्रीने नटलेला सह्य पर्वत

सह्याद्री पर्वताच्या रागातून उगम पावून पठारावरून व मावळाच्या दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या नद्या आणि हिरवीगार वनराई यामुळे मावळांची रचना मोठी मनोवेधक वनली आहे पश्चिम किनाऱ्याला समातर व दक्षिणोत्तर जाणारा सह्यगिरी महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर सातपुड्याला जाऊन मिळतो दोन महान तपस्वी एकमेकाचे या ठिकाणी स्वागत करतात सह्याद्रीच्या अनेक शाखा मावळाचा व पठाराचा छद करीत थेट पूर्वेकड गेलेल्या आहेत कोल्हापूरपासून अजिठ्यापर्यंत अशा रागा पसरलेल्या आहेत डोंगराच्या रागाना वेगवेगळ्या नावानी ओळखले जाते त्यात सर्वांत मोठी राग सातमाळ पर्वताची आहे एकापेक्षा एक मोठ्या सात पर्वताच्या रागा नाशिकच्या पश्चिम भागात सप्तश्रृगीपासून सुरू होऊन महाराष्ट्राच्या पूर्व सीमेपर्यंत गेलेल्या आहेत मराठवाड्यात ही पर्वतमाळ सुप्रसिद्ध अजिंठ्याचे डोगर या नावाने ओळखली जाते याच ठिकाणी भारतीय शिल्पकलेच्या सौंदर्याचा अप्रतिम आविष्कार अजिठ्याच्या लेण्यात झालेला आहे सह्याद्री पर्वताची दुसरी राग नासिक आणि नगरच्या जिल्ह्यातील पठारातून व मावळातून फुटून मराठवाड्याच्या मध्य व दक्षिण भागात जाते तीच बालेघाटाची राग होय हाच तो गगाथडीचा मुलुख. गगाथडीला सताची गगा वाहिली. सत निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, एकनाथ याच्या पदस्पर्शाने हा प्रदेश पुनित झाला आहे गगाथडीच्या शाहीराची 'बालेघाटी लावणी' एकेकाळी फार गाजली त्या लावण्याची गोडी आजही अवीट आहे तिसरी पर्वतराग हरिश्चद्र गडाच्या सलग घाटमाथ्यापासून सुरू होऊन रायरेश्वराच्या पठारात जाऊन विलीन होते. घाटमाथ्याचा व पठाराचा भाग अवघड कड्याचा आणि सुळक्याचा आहे महाराष्ट्राचे अनेक खदेवीर याच भूमीत जन्मले, वाढले, लढले आणि विजयी झाले महाराष्ट्र भूमीला जलदानाने पावन करणाऱ्या सुजलाम सुफलाम करणाऱ्या दारणा, गोदा, प्रवरा, भीमा, भामा, घोड, इद्रायणी, कृष्णा, कोयना, इत्यादी लहान-मोठ्या नद्या सह्याद्रीच्या गिरिकुशीत उगम पावल्या आहेत मावळातून आणि पठारावरून

वाहताना ह्या नद्या अल्लड बालिकेचे रूप धारण करतात पुढे त्याची गती सथ होत जाते मानवी जीवनासारखा पोक्तपणा त्याच्यात निर्माण होतो 'वरुण राजा व बळी राजा' हीच मावळातील लोकाची आशास्थाने पावसाळा आला की झरे खळखळू लागतात घुगुरवाळे वाजावेत, तसा त्याचा आवाज सर्वत्र घुमू लागतो बालकवीच्या 'जा हासत खेळत बाळ निर्झरा आनदाने गात' या काव्यपक्तीची आठवण दाटून येते रानकिडे किरकिर करून वनराईला साथ देतात ओढ्या-नाल्यात शेतात डराव डराव आवाज करून बेडके प्रशात रात्री रान उठवून देतात लहान लहान बालिका आईवडिलाच्या अगाखाद्यावरून पहुडाव्यात त्याप्रमाणे सह्याद्रीच्या घाटमाथ्यावरून नद्या, नाले मावळी प्रदेशातून कधी दौडत, कधी रागत, कधी घिरट्या, कधी वळणे घेत घेत सागर भेटीच्या उत्कठतेने भागीरथी विलीन होतात.

मावळ प्रदेश वृक्ष-वेलीनी गजबजलेला आहे मावळाच्या वनवैभवाने महाराष्ट्राच्या सृष्टिसौदर्यात मोलाची भर पडली आहे सृष्टिसौदर्याचे हे विलोभनीय रूप केवळ कल्पनेने चाखता येणार नाही मह्याद्रीच्या मावळ भागाची सफर केल्याशिवाय डोळ्याची पारणी फिटणार नाहीत सप्तश्रृगी, त्र्यबकेश्वर, टाकेज, भडारदरा, कळसूबाई, हरिश्चद्रगड, देडिया, नाणेघाट, भीमाशकर, कुसऱ्याचे पठार, आहुपे पठार, रामदरा, तात्याबाचो बैठक, काळदरा, भणभणी, राजमाची, खडाळा, लोहगड, रोहिडेश्वर, राजगड, जावळीचे खोरे, प्रतापगड, महाबळेश्वर, कोयना परिसर, पन्हाळा, राधानगरी अशी कितीतरी ठिकाणे सागता येतील येथील थडगार वाऱ्यानी, वृक्षवेलीनी, बहारदार सौदर्याने कोण बरे मत्रमुग्ध होणार नाही। महाराष्ट्राचे 'अजन काचन करवदीच्या काटेरी देशा' हे कवी गोविदाग्रजानी केलेले वर्णन किती यथार्थ आहे हे सह्याद्रीच्या फेरफटक्यानीच लक्षात येईल

सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर आणि मावळामध्ये शभरपासून अडीचशे इचापर्यंत पाऊस पडतो चार महिने ओढे-नाले तुडुब वाहतात भरपूर पाऊस पडतो. तेथील झाडी हिरवीगार आहे येथील वृक्षवेलीना बहर आला म्हणजे स्वर्गातील सौंदर्य सृष्टीवर उतरते त्र्यबकेश्वरपासून अबोली घाटापर्यंतच्या पठारी आणि मावळी प्रदेशात बाराही महिने हिरवीगार रानराई दिसते लहान वृक्षांपासून भरपूर उचीचे वृक्षराज या भागात भरपूर दिसतात वनस्पतिशास्त्रज्ञांच्या मताप्रमाणे या भागात दोनशेहून अधिक वनस्पतींच्या जाती आढळतात त्यांत असाणा, कर्णिकर, साग,

सावर (साईर), पळस, पागारा, हिरडा, बेहडा, ऐन, अजन, चार, बिबा, लिंब, शिसम, जाभूळ, उबरी, करवदी, वनजाई, कुसर, शिकेकाई, खाजकुयली, कारवी, धायटी, रामेठा, कुसरघेवडे, तोरणी, रोहीण आवळा, किंजळ, तिवस, बाबू, खैर, आबा, घाटबोर, कोशिंब, मोहवा, करज, अर्जुनसादडा, काकड, शिमटी, कागळूण, कणेरी, नाना, चिंच, अडसूळ, कराबू, चिल्लार, शिद, शेद्री, सुरगी, कुभा, कुई, वारग, रुई, पिपळ, वड, बहावा (बाह्य), हदगा, काळकुडा, पाढरी, अबळ, कोहबळ, ताबळ, पिंपर, पायर, टेंभूर्णी, धावडा, इत्यादी झाडाचा समावेश होतो यातील काही झाडे मोठी, काही लहान आकाराची आहेत जगलात निरनिराळ्या वेली भरपूर आढळतात हिरव्यागार वेलीमध्ये प्रामुख्याने मोरवेल, कावळी, पिठाणे, हळदावेली, चावे, डोळेफोड, भोवरा, याचा समावेश होतो काही जगली वनस्पतीचा व वेलीचा या प्रदेशातील लोक भाजीपाला म्हणून उपयोग करतात चाव्याचे देठ, कुरडू, बरकी, कडुकादा, रान करदळी, मेकी, गोमेठी, करटुली, चिचुरडे, चाव्याचा बार, कुसरा, साईरघोडे, भोकरे, वाघोटी, कोवळी उबरे इत्यादीचा त्यात समावेश आहे

भौगोलिक दृष्ट्या येथील जगल विभागाचे निरनिराळे विभाग पडतात. कोल्हापूर जिल्ह्याच्या फोडा व अबोली घाटापासून साताऱ्यापर्यंत पानगळीच्या झाडाचा प्रदेश लागतो त्यात प्रामुख्याने साग, ऐन, नाना, किंजळ, अजन, जाभूळ, धावडा, खैर, हिरडा, बेहडा याचा अतर्भाव होतो सातारा ते पुणे जिल्ह्यातील नाणेमावळपर्यंत बाराही महिने हिरव्यागार जगलाचा प्रदेश लागतो. मावळ तालुक्याच्या अदर मावळापासून खेड, आबेगाव, जुन्नरपर्यंतच्या मावळी प्रदेशात पुन्हा पानगळीच्या जगलाना सुरुवात होते आबा, नाना, ऐन, धावडा, हिरडा, बेहडा, जांभूळ हे वृक्ष या घाटमावळाच्या प्रदेशात आढळतात पुणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील नगर आणि नासिक जिल्ह्यातील सह्याद्रीचे घाटमाथे व मावळे जगलासाठी चागले प्रसिद्ध आहेत पेठ, सुरगाणा, कळवण, बागलाण हा प्रदेश कोकण समजला जातो या भागात सागाच्या वृक्षाची वने आहेत सागाशिवाय ऐन, हेड, कळब, धावडाही इकडे विपुल प्रमाणात आढळतो

मावळातील जगले म्हणजे मावळाचे मूर्तिमत सृष्टिसौंदर्य बहारदार पाने, फुले, फळे पाहिली की, माणसाचे मन प्रसन्न व आनदित होते निसर्गाच्या रमणीय शोभेचा माणसाच्या मनाला विरगुळा वाटतो पण सध्या चागले झाड दिसले की ते

तोडले जाते इमारतीसाठी तर अशा झाडाचा वापर केला जातोच, परंतु सरपणासाठीही झाडाची तोड सर्रास केली जाते झाडाची तूट थांबविणे व नवीन झाडाची वाढ करणे याची आज मावळ भागात फार आवश्यकता आहे सागाच्या झाडाबरोबरच इमारतीसाठी, अवजारासाठी, गाड्या व फर्निचर बनविण्यासाठी ऐन, बीजा, नाना, कळब, तिवस, हळदू, धावडा, जाभूळ वगैरे झाडाच्या लाकडांचा उपयोग होतो. जळाऊ लाकडासाठी चिच, आबा, किंजळ, कारव यांसारख्या हलक्या प्रतीच्या लाकडाचा उपयोग करण्यात येतो ऐन, खैर, शिसम, हिरडा, पळस यासारख्या झाडापासून उत्तम प्रतीचा कोळसा पाडण्यात येतो आबा, चिंच, बाभूळ, कडूलिंब, साग, मोहबा, हदगा, शेवगा, कवठ इत्यादी झाडापासून मध व मेण मिळते आग्या कुसुम, पळस, बोर, घाटबोर, बाभूळ, वड, नादरूक, पिंपळ, ऐन या झाडापासून लाखेचे उत्पन्न निघते कुसुम, निब, कोशिब, मोहवा, करज वगैरे झाडाच्या बियापासून तेल मिळू शकते या तेलाचा औषधासाठी व साबण बनविण्यासाठी उपयोग होतो लाब धाग्याचा वाख काढण्यासाठी शेंदरी, वारग, भेकळ, कादोळ, धामण, पळस, कुभा, रुई, घायपात, भोरलीमाड, रामेथा, पायर ही झाडे उपयोगी पडतात तरवड, चिल्लार, बाभूळ, ऐन, अर्जुनसादडा, कादळ, बहावा, असाना, नाना या झाडाच्या सालीचा कातडी कमावण्यासाठी उपयोग होतो बाभूळ, बिबा, पळस, शिमयी, नाना, पाढरुक, कणेरी, ताबडी सावर, शेवगा, धावडा, भिवर, रोहणखैर, चार, हिरडा, अबा इत्यादी झाडांपासून डिंक, चिकट कागद, मिठाई व औषधे तयार करण्यासाठी त्याचा उपयोग होतो, तर खैर व शिसमच्या झाडांपासून काताचे मोठे उत्पन्न मिळते हिरडा हे मावळातील मोठे आर्थिक उत्पन्न देणारे झाड आहे हिरड्यापासून उत्तम प्रकारचे टॅनिन मिळते कोल्हापूर, सातारा, पुणे जिल्ह्यातील जगलात हिरड्याची झाडे आहेत विशेष उत्पन्न पुणे जिल्ह्यातील आबेगाव, जुन्नर, खेड, भोर, वेल्हे महाल भागात व अकोले (अहमदनगर) तालुक्याच्या पश्चिम भागात आढळते या जगलात दरवर्षी हजारो टन हिरडा मिळतो हिरड्यात टॅनिन नावाचे द्रव्य ३० टक्के असते हिरड्यापासून रग व औषधे बनविली जातात हा रग रेशीम व सूत रगविण्यासाठी वापरला जातो. हिरड्यापासून शाईदेखील बनविली जाते औषधी वनस्पतींमध्ये हिरडा, बेहडा, आवळा ही प्रमुख झाडे आहेत. अनेक आजारावर रामबाण औषध म्हणून समजले जाणारे सुप्रसिद्ध त्रिफळा चूर्ण हे या झाडांच्या फळापासून बनवितात.

सृष्टिसौंदर्याच्या बाबतीत झाडांची निवड करणे कठीण आहे. हिरव्या पानानी, फुलाफळानी बहरलेले प्रत्येक झाड आपापल्या परीने निसर्गाची व धरणीमातेची शोभा खुलवीत असते वैशाख महिन्यात लाल रगाच्या फुलानी वनराई बहरून जाते हिरव्या रानावर केशरी रगाची किमया पसरविणारा पळस, पागरा, लालगर्द रगाची छाया पसरविणारी सावर व झाडाना वेळोवेळी येणारा मोहर यामुळे मावळाच्या सौदर्याची शोभा वाढते

वनराईबरोबरच विविध पक्षी आणि प्राणी हेही मावळ प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे त्यात बिबळ्या, भालू, रानमाजर, टोपीवाले, माकड, चित्ता, हरीण, रोही, शेकू, रानडुक्कर सायळ, भेकर, तरस हे प्राणी तर मोर, लाडोर, तितर, पावशा, चडोल इत्यादी पक्षी मावळात ठिकठिकाणी आढळतात मावळातील जगलसपत्ती, तसेच पक्षी आणि प्राणिसपत्तीची जोपासना होणे जरुरीचे आहे मावळाच्या सौदर्याचा व उत्पन्नाचा मोठा वाटा वनराईत आहे झाडाची तूट थाबवून तुती, चिंच, शेवगा, भेंडी, गुलमोहर विलायती बाभूळ इत्यादी झाडाची लागवडही त्या भागात वाढविली पाहिजे गावाच्या शिवारात जर लहानसे जगल असेल तर गावाचे कितीतरी प्रश्न सुटू शकतात सरपणाची गरज भागते, इमारतीसाठी लाकूड पैदा होते जनावरासाठी चारा पैदा होतो जमिनीचा ओलावा टिकून राहतो जेथे पिकांची लागवड होऊ शकत नाही अशा जागा झाडे लावण्यासाठी उपयोगी पडतील झाडाची होणारी तोड थाबली नाही, तर मावळ भागातील जमीन कालान्तराने उजाड होईल, खडकाळ बनेल मावळातील वनराई वाचली तर सह्याद्री वाचेल. सह्याद्रीचा जिवतपणा आता फक्त वृक्ष-वेलींमध्ये व उरल्यासुरल्या वनराईत आहे. वृक्षवेलींचे हिरवेगार आच्छादन यापुढे मावळांनीच टिकविले पाहिजे

*

# १६. सह्याद्रीच्या डोंगर-दऱ्याखोऱ्यातील पशुपक्षी

सह्याद्री पर्वताच्या पूर्व-पश्चिम उतारावर राहणाऱ्या लोकाचे जीवन मोठ्या प्रमाणावर येथील वनावर अवलबून आहे कृष्णा, कोयना, वारणा, पचगगा, भीमा, गोदावरी, प्रवरा, वैतरणा इत्यादी महत्त्वाच्या नद्या पश्चिम घाटातूनच उगम पावतात या नद्यावर ठिकठिकाणी झालेल्या धरणामुळे सह्याद्रीच्या पायथ्याशी असणाऱ्या लोकाचे जीवन या नद्याशी निगडित आहे. मानवी जीवनाप्रमाणेच सह्याद्रीतील जगलाच्या आश्रयाने राहणाऱ्या प्राण्याचे सरक्षण व सवर्धन हेही निगडित आहे

अनेक नैसर्गिक अडचणींमुळे सह्याद्री घाटातील व पठारावरील लोकाचा विकास झालेला नाही गेल्या काही दशकामध्ये धरणामुळे, रस्त्यामुळे, अनिर्बंध गुरेचराई व जगलतोड, अवैध शिकारी, जगलाला लावण्यात आलेल्या आगी, फिरपाळीची शेती अशा अनेक कारणामुळे आतापर्यंत पश्चिम घाटातील नैसर्गिक सपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे विशेषत· येथील समृद्ध जगलसपत्तीचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास झालेला आहे भविष्यकाळात हे जर आपण थाबविले नाही, तर नद्याना येणाऱ्या पुरामुळे डोगरावरील मातीची धूप होऊन येथील धरणे गाळाने भरतील व त्यामुळे होणाऱ्या प्रचड नुकसानीस व अनेक आपत्तीस तोंड द्यावे लागेल

सह्याद्री पर्वताच्या दऱ्याखोऱ्यात मागील काही दशकामध्ये झालेल्या प्रचड अवैध शिकारीमुळे येथील जगली प्राण्याची सख्या फारच कमी झालेली आहे जगलाचे आरोग्य हे जगलातील प्राण्याशी आणि पक्ष्याशी निगडित आहे मावळातील पक्ष्याच्या 'सवयी आणि सोयी' हा निरीक्षणासाठी चागला विषय आहे

सह्याद्रीच्या जगल परिसरात अनेक पक्षी आढळतात त्या साऱ्या पक्ष्यात प्रथम नजरेत भरणारा पक्षी म्हणजे खेडेगावच्या भाषेत त्याला 'झुडप्या पक्षी' म्हणतात हे पक्षी नेहमी जोडीने फिरतात नर आणि मादी वेगवेगळी दिसतात नर हा काळा-पाढरा असतो तर मादी तपकिरी रगाची असते दुसरा डोळ्यात भरणारा पक्षी म्हणजे कवड्या परीट. डोळ्याजवळील पाढरे आणि काळे पट्टे यामुळे तो फार सुरेख

दिसतो सह्याद्रीच्या मावळी प्रदेशात खाटिक पक्षीही आढळतात दिवसभर थकून गेल्यामुळे हे पक्षी ओढ्याजवळच्या झुडुपात बसून रात्रीची विश्राती घेण्याच्या तयारीत असतात पिवळ्या गळ्याच्या चिमण्या सध्याकाळ होईपर्यंत शेताच्या मध्यावर आलेल्या झाडावर जोराजोराने चिवचिवाट करीत असतात त्याच्या जोडीला शिपाई बुलबुल, निळा खडक कस्तुरा हे पक्षी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने काळ्याशार खडकावर आपले शरीर हलवीत डौलाने डोलत असतात.

सकाळच्या प्रहरी आढळणारे पक्षी म्हणजे 'खेरभूतिया ससाणा व राखी पारधी' हे दोन्हीही पक्षी शिकारी पक्ष्यात मोडतात सह्याद्रीच्या गवताळ प्रदेशात तऱ्हेतऱ्हेच्या चडोल पक्ष्याचे दर्शन होते. त्यात छोटा चडोल आणि शेडीधारी चडोल प्रामुख्याने दिसतात ह्या पक्ष्याच्या हालचाली आणि आवाज मधुर असतो ते एखाद्या दगडावरून अथवा मातीच्या ढिगावरून सरळ हवेत उड्डाण करतात आणि गात गात उच उच जातात इतके उच जातात की, दुर्बिणीमधूनही दिसू शकत नाहीत कित्येक वेळी ते इतक्या उचीवर १० मिनिटेही राहतात सथपणे पख हलवीत आणि स्पष्ट व मधुर आवाजात लकेर घेत ते तरगनात त्याची वरून खाली येण्याची पद्धतीही पाहण्यासारखी असते ते टप्प्याटप्प्याने खाली येतात प्रत्येक टप्प्यात थोडा वेळ पख हलवतात व शेवटी जमिनीवर उतरताना एखाद्या जेट विमानासारखे खाली झेपावतात

दुपारची निवात वेळ पाहून ओढ्याच्या अगर नदीच्या काठी चडोल, राखी पारधी आणि इतर पक्षी झाडाझुडपात परतलेले असतात झुळझुळणाऱ्या निर्झराबरोबरच त्याचा चिवचिवाट चालूच असतो वसत ऋतूच्या आगमनाबरोबर मैना ज्याप्रमाणे गातात तसेच गाणे गाणारे दयाळ पक्षीही सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात आढळतात पावसाळ्यात व हिवाळ्यात लाल गुल्म टिटवीच्या जोड्या नदीच्या काठावर आपले पाय पाण्यात भिजवत पाण्याशी एकरूप झालेल्या असतात आणि अनेक लहान टिटव्या पाण्याच्या कडेला असलेल्या खडकावरून इकडे-तिकडे उडत असतात चारी बाजूनी कबुतराचे घुमणे कानावर येत असते तर लहान तपकिरी रगाचे नाचण पक्षी तडफेने माशा पकडण्यात गर्कझालेले असतात.

भल्या पहाटे ऐकलेली प्रार्थना मनाला आल्हाद देते तद्वतच पहाटेच्या सुमाराच्या पक्ष्याचे चीत्कार आणि उड्डाण विलोभनीय असते. क्षणभर आपण सारे विसरून स्वरमय होतो. जगलातील प्रत्येक पक्षी ह्या वेळी बोलका बनतो आणि

त्यामुळे सारा आसमत त्या पक्ष्याच्या चिवचिवाटाने व कर्णमधुर आवाजाने भरून गेलेला असतो खारीक, कोतवाल आणि रानटी बडबड्या या पक्ष्याचा कर्कश आवाजसुद्धा अशा सगीताच्या मेळाव्यात बेमालूमपणे मिसळून गेलेला असतो सह्याद्रीच्या वनराईतील शेकडो बहुरूपी पक्ष्याचा सथ आणि सतत चाललेला कलकलाट त्याच्या सगीताला एक सहजसुदर पार्श्वभूमी तयार करीत असतो त्यात विशेष सुदर असे गाणे ऐकू येत असते टिपक्या बडबड्या पक्ष्याचे. या पक्ष्याचा आवाज कल्पनातीत गोड असतो आणि हे पक्षी झुडुपातून भरारी मारताना लाब ताना मारतात

पक्षी म्हटला की तो झाडे व पाणी ह्याच्या आश्रयाने राहणारा ह्या पक्ष्यातील काही पक्षी माणसाच्या खाद्योपयोगाचे असल्याने त्यांची शिकार होते शिकारीच्या कामामुळेच पक्ष्याच्या सवयी, खाद्ये, त्याची वसतिस्थाने व त्याची सर्वांची माहिती गोळा केल्यावर असे लक्षात येते की, मनुष्याला ज्याप्रमाणे निसर्गाचा विचार करून आपली घरे, राहणी व खाद्यपेये ठरवावी लागतात, त्याचप्रमाणे पशुपक्ष्यासही वागावे लागते, असा अनुभव येतो त्यापैकी 'पक्ष्याची घरटी व काही सवयी' याबाबतची थोडीफार माहिती देता येईल ती काही वाचकास पक्ष्याच्या अपरिचितपणामुळे अतिशयोक्तीची वाटण्याचा सभव असला तरी पक्षिपरिचितास ही माहिती उपयुक्त असल्याची खात्री पटेल

सह्याद्रीतील पक्ष्याच्या घरट्याबाबत विचार करता याचे वर्गीकरण विविध प्रकारात करता येईल शिवाय ज्याच्या घरट्याचा कधीच ठावठिकाणा लागत नाही त्याचाही एक वेगळा प्रकार आहेच.

कोबडी हा पाळीव पक्षी व कोकिळा हा जगली पक्षी ह्यास आपले घरटे कधीच बांधता येत नाही त्यामुळे कोबडीला माणसेच घरटे करून देतात, तर कोकिळा ही कावळ्याच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन त्याच्या घरट्यात आपली अडी घालून पळून जाते. बिचारा कावळा त्याच्या घरट्यात आपल्या पिल्लाबरोबर कोकिळेचीही पिल्ले लहानची मोठी करतो व ती ओळखू आल्यावरच चोच मारून त्यास घालवून देतो

बगळा, होली, नीळहोली, जळाट, पाणडोसला, लगड्या व पीठउबळी इत्यादी पक्षी हे आपली अडी उबविण्यापुरती कशीतरी घरटी करतात. फक्त अडी पडू नयेत ह्यासाठी आडव्या-तिडव्या काड्या गोळा करून हे पक्षी आपले काम भागवितात.

ह्या सर्वांत बगळा हा तर इतका आळशी पक्षी आहे की, अंडी ठेवण्यासाठी लागणाऱ्या काड्याही तो दुसऱ्या बगळ्याच्या घरट्यातून हळूच लांबविण्याचा प्रयत्न करतो. कारण सामूहिक जननकार्य फक्त बगळे हे पक्षीच करू शकतात त्याचीच अनेक घरटी ही एकाच झाडावर व अगदीच शेजारी शेजारी असू शकतात इतर सर्व पक्षी हे आपली घरटी निरनिराळ्या ठिकाणी करतात बगळ्याचा हा ऐदीपणा व चोरटी वृत्ती ह्यांमुळे शेजारच्या घरट्यातील अंडी व पिल्लही खाली पडून त्यांचा नाश होतो ह्याच प्रसग त्याच्यावरही येतो पण त्याची त्याला कल्पना व फिकीरही नसते. त्यामुळे बगळ्याची एकूण अंड्याहून फारच थोडी प्रजा वाढते

कावळा, ससाणा आळ्या गिधाड मोरगा घार, खोकाड कोंकणघार, हारड इत्यादी पक्षी हे आपली घरटी खूपच काटक्या जमवून ती मजबूत करून अंडी घालतात पर्जन्यकाळापूर्वीच ह्याची पिल्ले मोठी होऊन निघून जातात ह्यातील कावळा हा पक्षी मात्र पर्जन्यकाळ अगदी समीप आल्यावर अंडी घालीत असल्याने त्याची पिले पावसाच्या झडीने भिजत भिजत वाढतात कावळ्याच्या घरटे बनविण्याच्या कामावरून पर्जन्यकाळ समीप आल्याचे शेतकरी समजतात

पोपट माळुकी, चिल्लार, कोकुस, भेनस व तिग्गा हे पक्षी आपली घरटी झाडाच्या पोकळीत करतात ह्याच्या प्रजोत्पादनाचा काल हा पावसाळ्याची सुरुवात हा असतो त्यामुळेच ते झाडाच्या पोकळीत आपली घरटी करतात पोकळीत घरटी असल्याने त्याची पिल्ले सुरक्षित वाढतात

सुगरण, पाणशिल्या, चुही, गोधड्या, इत्यादी पक्षी आपली घरटी बनविण्यासाठी अगदी बारीक तंतू गोळा करून घरटी करतात त्यात सुगरणीचे कौशल्य व गोधड्याचा बडेजाव दर्शविल्याशिवाय राहत नाहीत गोधड्याचे घरटे हे गोधडीप्रमाणे जाड व मऊ असल्याने त्यात मायलेकरे मोठ्या आरामात राहतात

मोर, कोकतर, लावरु, तितर, उरगा, भोगाळ्या रानकोंबडी, टिटवी, अबूलण्या, कक, दडुल्या हे पक्षी आपली घरटी जमिनीवर करतात ह्यात मोर हा पक्षी मोठ्या पर्जन्य काळानंतर व इतर सारे पक्षी हे पर्जन्यकालापूर्वीच अंडी घालतात ह्याची घरटी ही विशेष कौशल्याची नसतात, तरी पण बारीक काड्या, तंतू इत्यादीवर थोडी फार सोय करून पिल्ले सुखरूप झोप घेतील अशी सोय सर्वांनी केलेली असतेच

पिरवीट, काळचिटी, पारिवा, दपी हे पक्षी आपली घरटी जमिनीतील बिळात

करतात मात्र पारवा हा कड्याच्या कपारीत अगर घराच्या भिंतीत उच जागी घरटे करता पर्जन्यकाळाच्या सुरुवातीला हे पक्षी अडी घालतात

हळदून, फेशा, डोंगरफेशा, गायकवाडा, भिंगराज बानोळी, खाक्षा, किहड इत्यादी पक्ष्याची घरटी ही झाडाच्या डहाळींवर असून ती सर्व मोकळ्या तोंडाची असतात पर्जन्यकाळपूर्वीच्या उन्हान गुदमरून न जाता मोकळी हवा मिळावी म्हणून ही सोय बरी असते

झोंक्यापावरी व लिटूक हे छोटे पक्षी पर्जन्यकाळानंतर आपली घरटी हिरव्या गवतात करतात

इटोली हा पक्षी झाडाच्या एकाच ठिकाणी फुटलेल्या अनेक लहान लहान फांद्याच्या जागी गवताच भल मोठ घरट बनवितो त घरटे त्या पक्ष्याच्या आकाराच्या मानाने फारच मोठ दिसत ह घरटे गवताच्या पानाचे बनविलेले असते पर्जन्यकाळानंतर हे घरटे तो तयार करून प्रजात्पादन करतो

काकडकुभाऱ्या म्हणजेच भारद्वाज हा पक्षी पर्जन्यकाळातच प्रजोत्पादन करणारा असल्यान तो आपल घरट ह झाडाच्या पानाच बनवितो ते घरटे अशा जागी असते की ते बघण्यासाठी त्या जागी अनेक काटक्या फुटलेल्या असून त्याच्या पानात ह्याचे घरट लावून सहसा दिसणार नाही अशी खबरदारी तो घेतो पिल्ले मोठी होईपर्यन्त ते लक्षात येणे अवघड असते

गाभोळी, गवळण हे पक्षी खडकाचे कडे, पूल अशा ठिकाणी मातीने घरटी बनवितात जननकाल हा पर्जन्यकाळ असल्याने त त्यासाठी आडोशाचा आधार घेतात व पावसाच्या पाण्यापासून घरट्याचा बचाव करतात गाभोळी हा पक्षी कधी कधी घराच्या आधारानेही आपल घरट तयार करतो

घुबड, भुईखोकर श्रावण इत्यादी पक्षी हे कडेकपारीत आपली घरटी करतात तो पर्जन्यकाळ असतो

पाणकोंबडी, लोल्या, पाणकबूतर इत्यादी जलनिवासी विहग हे आपली अडी तळी, मगेवर इत्यादी ठिकाणी पाण्यावर पसरणाऱ्या वेलीत आपली घरटी तयार करून प्रजोत्पादन करीत असतात

कोवा हा पक्षी नदी, नाले, ओढे किंवा अन्य ठिकाणच्या पाण्याशेजारी असणाऱ्या झाडावरील वेलीत आपले घरटे तयार करतो. पर्जन्यकाळ हा ह्याच्या प्रजोत्पादनाचा काळ असतो हा पक्षी पाण्यापासून फार दूर कधीच राहात नाही

चिमणी व कबूतर हे पक्षी लोकवस्तीच्या आधाराने आपली घरटी तयार करतात ह्याचे प्रजोत्पादन सदान्‌कदाही चालूच असते

काच्या, टासल्या, करकोचा व चिमणगागोडा हे प्रतिवर्षीचे प्रवासी पक्षी आणि फगलफणी, झोरी, साळभोरडा इत्यादी स्थानिक पक्षी ह्याच्या घरट्याचा ठावठिकाणा कोणासच ठाऊक नाही प्रवासी पक्षी हे दरसाल त्याच्या ठराविक वेळी दुसरीकडे निघून जात असल्याने त्याच अवधीत ते तिकडे प्रजोत्पादन करीत असतील असे मानले तरी येथील स्थानिक पक्ष्याच्या घरट्याचा पत्ता लागू नये हे एक आश्चर्यच आहे

भेनस हा पक्षी पोकळात घरटे करून अडी उबविण्यासाठी बसतो त्या वेळी नर पक्षी अड्यावर बसलेल्या मादीच्या मानेभोवती चिखलाचा लप चढवून पोकळाच सर्व छिद्र बद करून तिची फक्त मान बाहेर राहील अशा व्यवस्थेनतर तिच्या चारापाण्याची तो पिल्ले उडेपर्यन्त रोज दखल घेतो मात्र हे काम करीत असता तो तिच्याजवळून ज्या दिशेकडे गेला असेल त्याच दिशेकडून जर परत आला नाही तर ती चाऱ्याचा स्वीकार करीत नाही अशा वेळी तिच्या खूप रावण्या तो करतो तेव्हा कोठे ती चारा घेते

पीरवीट हा पक्षी बिळात ७ वेळा अडी घालतो आणि पहिल्या ६ खेपाची पिल्ले बाहेर न काढता त्याचे पालनपोषण सातव्या खेपेची पिल्ले मोठी होईपर्यन्त करून नंतर एकदम ७ पिढ्याची पिल्ले बिळातून बाहेर काढतो ह्या काळात त्याचे बीळ उकरून पाहता काही पूर्ण वाढ झालेली, काही अर्धवट वाढीची, काही कोवळी तर काही अडी असा प्रकार दृष्टीस पडतो

भिंगराज हा पक्षी एखादे अतिसरळ झाड पाहून त्यावर आपले घरटे करतो ह्या झाडावर मनुष्य अगर सर्प चढू नये म्हणून ९-१० फुटापर्यन्त त्याची वरील साल चोच व नखे ह्यानी सोलून त चोपडे करून टाकतो आणि रात्रदिवस जागता पहारा करून आसपास फिरकणारे कावळे आणि इतर पक्षी ह्याच्यावर हल्ले करीत असतो जवळ इतर पक्षी, जनावरे किवा माणूस येताच आरडाओरड करीत सुटतो त्यावरून जवळच कोठेतरी भिंगराजचे घरटे आहे असे समजतात

भारद्वाज हा पक्षी सर्पभक्षक आहे त्यामुळे तो आपल्या पिल्लाकरिता जिवत सर्प धरून आणून त्याच्या घरट्यात ठेवतो त्या सर्पाच्या पाठीचा मणका अर्ध्या अधिक भागाकडे डोक्याच्या बाजूने मोडलेला असल्याने त्याना अर्धेअधिक

निर्जीव झालेले शरीर हालविता येत नाही त्यामुळे ते सर्प नुसतेच पडून राहतात त्यांवर काकडकुभाऱ्याची पिल्लेही त्यांना भूक लागेल तेव्हा ताव मारतात अशा ठिकाणी चुकून मनुष्य गेल्यास मोठे धोकादायक असते. कारण ते मरणोन्मुख सर्प त्या पिल्लास नाही, तरी मनुष्यास स्वभावधर्मानुसार दंश करतात

कोषा या पक्ष्याची पिल्ले ही झाडावरील घरट्यातून केव्हा व कशी खाली आणली जातात हे समजत नाही, पण ती खाली आल्यावर समुदायाने फिरतात मनुष्याची चाहूल लागताच ती जागच्याजागी भुईसपाट होऊन लपून बसतात. इतकेच नव्हे, तर शेजारी पाण्याचे डबके असल्यास त्यातही ती बुडून बसू शकतात

असे हे सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील पक्षी येथील सृष्टिसौंदर्यात भर घालतात व सर्वांचा आनंद द्विगुणित करतात.

*

REFBK-0026138